म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २५८

REFBK-0003284

संगीत

# भावबंधन नाटकावरील टीका

प्रस्तावनालेखक

प्रो. स. प. सबनीस. एम. ए. (कँटब) एफ्. आर. इ. एस्.

REFBK-0003284

लेखक व प्रकाशक

वामन हरी घारपुरे, बी. ए. एस. टी. सी.

एजंट्स

(१) बाँबे बुकडेपो, मुंबई.

(२) विश्वनाथ गणेश आणि मंडळी,

पुणें शहर.

१९२७ ] * * * [ किं. १० आणे

प्रकाशकः- वामन हरी घारपुरे, बी. ए. एस्. टी. सी.
१४३, बुधवार पेठ, पुणें शहर.

मुद्रकः- वामन वासुदेव अतीतकर, बी. ए.
समर्थभारत छापखाना, ३२५, सदाशिव पेठ, पुणें शहर.

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| गडकरी यांचें अल्प चरित्र | | १ |
| त्यांचें वाङ्मय | | ३ |

**नाटकावरील टीका**

| | | | पृष्ठांक |
| --- | --- | --- | --- |
| १. | कल्पनेचा उगम व नामकरण | | ९ |
| २. | संविधानक | (१) संविधानकचर्चा | ११ |
| | | (२) मुख्य कथानक | १२ |
| | | (३) पहिलें उपकथानक | १६ |
| | | (४) दुसरें उपकथानक | २२ |
| | | (५) कथानकांचा परस्परांशीं संबंध | २४ |
| ३. | स्वभावविवेचन | (१) घनश्याम | २८ |
| | | (२) घनश्यामाची तुलना | ३४ |
| | | (३) लतिका | ३८ |
| | | (४) प्रभाकर | ४२ |
| | | (५) मालती व मनोहर | ४५ |
| | | (६) धनेश्वर व धुंडिराज | ४८ |
| ४. | रसपरिपोष | | ५१ |
| ५. | नाट्यरचना | | ५५ |
| | | अंक १ ला | ५६ |
| | | अंक २ रा | ५८ |
| | | अंक ३ रा | ६० |
| | | अंक ४ था | ६४ |
| | | अंक ५ वा | ६७ |
| ६. | नाटकाचें साध्य | | ६८ |
| ७. | भावबंधनाचें गुणदोषविवेचन | | |
| | | (१) भावबंधनाचें वैशिष्ट्य | ७१ |
| | | (२) भावबंधनाचे दोष | ७४ |
| | | (३) ,, गुण | ७७ |

# अभिप्राय

रा. वा. ह. घारपुरे, बी. ए., यांनीं लिहिलेली ‘ संगीत भावबंधनावरील टीका, ’ मीं वाचिली. रा. घारपुरे गडकऱ्यांचे [illegible]ते आहेत, अंधभक्त नाहींत ही गोष्ट या टीकेवरून स्पष्ट दिसून येते. प्रस्तुत टीके[illegible]ंत भावबंधन नाटकाचा सर्वांगीण परामर्श घेतला आहे. गडकऱ्यांच्या भाटांचा [illegible] स्तुतिपाठ चालू असतां त्यांशीं विसंवादी सूर काढण्याचें थोडेसें धैर्य रा. घारपुरे यांनीं दाखविलें याबद्दल ते प्रशंसेला पात्र आहेत. रा. भावे यांनीं गडकऱ्यांच्या विनोदाचें स्वरूप मार्मिक रीतीनें उघड करून दाखविण्याचा केलेला मर्दानी प्रयत्न वीरवृत्ति महाराष्ट्राला आवडेल असा आहे. तसाच भावबंधनापुरता प्रस्तुतचा मवाळ प्रयत्नही गडकरी वाङ्मयाला उपकारक होईल असें वाटतें. नाट्यरचनाकौशल्याची गडकरी यांनीं विशेष पर्वा केली नाहीं असें रा. घारपुरे यांनीं टीकालेखाच्या पांचव्या पृष्ठावर म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. रा. गडकरी यांचें चरित्र लिहिण्याचा मोह रा. घारपुरे यांनीं बराचसा आवरला व मि. हडसन् या टीकाकाराचें एक वचन देऊन गडकरी चारित्र्याची बोळवण केली हें बरें केलें. कारण, गडकऱ्यांच्या कृतींवर प्रकाश पाडण्यासारखें गडकऱ्यांच्या चरित्रांत उदार, उदात्त व उद्बोधक असें कांहीं असल्याचा गडकऱ्यांच्या भाटांनाही अद्यापि शोध लागलेला दिसत नाहीं. तेव्हां गडकरी कसे होते याचा उठाठेव न करतां गडकऱ्यांची वाङ्मयरूप प्रजा कशी आहे, याचीच चिकित्सा टीकाकारांनीं करावी हें योग्य आहे. याच मार्गानें रा. घारपुरे गेले आहेत. रा. घारपुरे यांचें विवेचन कांहीं ठिकाणीं मला पटलें नाहीं. तथापि त्यांचा प्रयत्न एकंदरींत अभिनंदनीय आहे. त्यांची भाषा प्रौढ व वृत्ति समंजस आहे. मार्मिकपणा, बहुश्रुतपणा, व वाङ्मयप्रेम हे गुण या लेखांत प्रकट झाले आहेत. हा निबंध भावबंधनाच्या वाचकांनीं व अभ्यासकांनीं मननपूर्वक वाचण्यासारखा आहे.

ता. २६।३।१९२७ }
पुणें शहर. }

लक्ष्मणशास्त्री लेले
प्रो. न्यू. पूना कॉलेज.

# प्रस्तावना

रा. घारपुरे यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेली परंतु घाईघाईनें छापलेली 'संगीत भावबंधन नाटकावरील टीका' वाचकांच्या पुढें ठेवण्यांत येत आहे. वास्तविक रीत्या अशा पुस्तकाला प्रस्तावनेची फारशी जरूर नाहीं. टीकाकारांचें एकमत कधींहि होत नसल्यानें असें पुस्तक प्रसिद्ध होण्याचा अवकाश कीं अनेकजण त्यांतील गुणदोष दाखविण्यास पुढें येतात. पुस्तकहि सारासार ग्रहण करण्यास समर्थ अशा प्रौढ विद्यार्थ्यांकरितां मुख्यत्वें असल्यानें प्रस्तावनेची मध्यस्थी टाळतां येण्यासारखी होती. प्रस्तावना लिहिण्यास तयार होणें याचें कारण आमचा अधिकार हें नसून आपलेपणामुळें रा. घारपुरे यांच्याबाहेर न वागणें हें होय.

भाषेचें सौन्दर्य, भावनांचें उत्कटत्व, मनाला गुदगुल्या करणाऱ्या कोट्यांची विपुलता व प्रसंगांची चित्तवेधकता यांमुळें गडकऱ्यांचीं सर्वच नाटकें वाचनीय व लोकप्रिय झालीं आहेत. पण पहिल्या प्रतीचें नाटक म्हणजे कलेची परिसीमा गांठणाऱ्या ताजमहालासारखें असावयास पाहिजे. त्यांत सर्व कांहीं प्रमाणशीर पाहिजे, नकशी कितीहि सुबक असली तरी एकहि फूल जास्त काढण्यांत आलेलें असतां कामा नये, असा संयम दाखवून जें नाटक लिहिलेलें असतें. त्यांतील कोणतेंहि वाक्य गाळावयाचें म्हटलें तर इमारतीला भगदाड पाडावें तशी स्थिति होते; हा शब्द काढून तो घालावयाचा म्हटलें तर बेढब प्रकार दिसूं लागतो. शाकुंतल नाटक या कसोटीला उतरेल. अत्युत्कट सौंदर्याच्या किंवा भव्यतेच्या पुढें आपण थक्क होऊन जातों व तोंडांतून शब्द बाहेर पडेनासा होतो; यासाठीं कालिदासानें, शकुंतला जेव्हां दुष्यंताच्या दृष्टीस पडली, तेव्हां त्याला भवभूतीच्या माधवाप्रमाणें भाराभर श्लोक म्हणावयास लाविलें नाहीं.

सौभद्रांत सनातनत्व व विश्वात्मकत्व कमी असलें तरी कलेचा हा संयम व स्वाभाविकत्व आहे. गडकऱ्यांचीं नाटकें रचाईच्या दृष्टीनें सदोष होण्याचें मुख्य कारण हें आहे कीं आपल्यापेक्षां आपल्या कार्याचें महत्व त्यांना जास्त वाटलें नाहीं, व ते स्वतःला विसरूं शकले नाहींत. सुंदर शब्द किंवा शब्दसमूह त्यांना सुचावयाची खोटी कीं त्यांना नाटकांत स्थळ मिळावयाचेंच. यामुळें कित्येक वेळां अनवश्यक शब्दविस्तार होतो. रा. घारपुरे यांनीं 'नाट्यरचना' या सदराखालीं कांहीं सबंध प्रवेश गाळून टाकावयास हरकत नाहीं असें दाखविलें आहे.

नाटकांतील अनेक प्रसंग अस्वाभाविक व त्या प्रसंगांची जुळणीहि कशी सदोष झाली आहे हें रा. घारपुरे यांनीं पुढें स्पष्ट करून दाखविलें आहे. बदमाषांनीं केलेल्या गुन्ह्यांचीं व ते शोधून काढणाऱ्या गुप्त पोलिसांच्या कौशल्याचीं इतकीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत कीं आपल्या बदमाषाला गडकऱ्यांनीं इतका बावळट बनविला या गोष्टीचें समर्थन करण्यास सवडच नाहीं. धनेश्वराचे खोटे कागद श्मशानांत पुरावयाचे कशाला ? त्याच्या लांड्यालबाड्यांचे पुरावे नाहींसे करून फायदा काय ? 'तुझ्याकडे हे कसे आले ?' असें घनःश्यामाला विचारणार कोण ? व विचारलें तरी धनेश्वराचा मुनीम म्हणून त्याला वाटेल तितकीं समर्पक उत्तरें देतां आलीं असतीं. मनोहराला श्मशानांत पाठवून त्याला नेमकीच जागा उकरावयाला लावण्यांत गडकऱ्यांनीं कलेच्या दृष्टीनें उतावळी केली आहे. पूर्वींच्या नाटकांतून संविधानकाचे दुवे जुळेनासे झाले कीं, पिशाच्चराक्षसादिकांकडे धाव घेत असत तशांपैकीं हा प्रकार दिसतो. प्रभाकरानें बिंदूवर प्रेम करण्याचा आव आणून लतिकेच्या मनांत असूया उत्पन्न करूं पाहणें किंवा लतिकेनें त्याच उद्देशानें कामण्णावर प्रेम करण्याची बतावणी करणें या दोनहि गोष्टी अगदींच अप्रयोजक वाटतात.

तथापि कारागिरीच्या दृष्टीनें भावबंधन हें नाटक एकच प्यालाच्या खालोखाल उत्तम आहे. 'एकच प्याला' सर्वांत उत्तम होण्याचें कारण तें नाटक

ध्येयवादी आहे आणि ध्येय व नाटककार यांचें तादात्म्य झालें आहे हें होय. नाटककाराला दारूचे भयंकर परिणाम जाणवले होते असें अगदीं स्पष्ट होतें; 'दारू' म्हटल्याबरोबर त्याच्या जिवाचा थरकांप होत असला पाहिजे. ध्येयवादी नाटककाराच्या चित्ताची इतकी खळबळ जेव्हां उडते तेव्हां त्याची कृति मनुष्यांना गुंग करून टाकण्यास समर्थ होते. भावबंधन उत्तम होण्याचें कारण तें निव्वळ करमणूक म्हणून लिहिलें आहे हें होय. शाकुंतलाचा वैराग्यपर अर्थ लावणारे जसे कांहीं टीकाकार निघाले, त्याप्रमाणें भावबंधनालाहि असे कांहीं तीक्ष्ण कर्णेंद्रियाचे टीकाकार लाभले आहेत व त्यांना भावबंधनांत नीतितत्त्वांचा डिंडिम वाजविलेला ऐकूं येऊं लागला आहे. पण भावबंधनांत गडकऱ्यांचें खरें व्यक्तित्व प्रतिबिंबित झालें आहे. आयुष्यांतील निराशांचा व आपत्तींचा क्षणिक विसर पाडण्यासाठीं आपल्या हास्यप्रवण वृत्तीचा आश्रय करण्यास ते अगदीं आतुर असत. ते जसे सहजासहजीं बोलत असत, तसें त्यांनीं नाटक लिहिलें आहे. कथानक नुसतें नांवाला आहे, व कोट्यांची माळ गुंफणें व तास दोन तास सात्त्विक करमणूक करणें हा मुख्य उद्देश सफल झाला आहे.

संविधानकाच्या संबंधानें आणखी एका मुद्द्याचा विचार करावयास पाहिजे. त्याची फोड करितांना रा. घारपुरे यांनीं घनश्याम नायक ठरविला आहे, व याचें समर्थन त्यांनीं शक्य तितक्या चांगल्या रीतीनें केलें आहे. तथापि हें त्यांचें म्हणणें सर्वांना संमत होण्यासारखें नाहीं. नायक-नायिका होण्याला पात्रांच्या अंगीं विशेष कर्तृत्व असावें लागतें असें म्हणण्याचा त्यांचा रोख दिसतो. पण या पद्धतीनें आथेल्लोला नाकांत वेसण घातलेल्या अस्वलाप्रमाणें ओढीत नेणारा अयागो आथेल्लो नाटकाचा नायक ठरेल. दुसरी गोष्ट म्हणजे अनीतीचीं कृत्यें करण्यांत बुद्धीची कितीही कसरत किंवा कर्तृत्व दिसलें तरी त्यांचें कौतुक करण्यास मानवी मन तयार होत नाहीं. नाटकाच्या नांवावरूनहि लतिका-प्रभाकर व मालती-मनोहर या सुशील जोडप्यांचें 'भावबंधन'

हाच मुख्य विषय ठरत असून घनश्यामाच्या लटपटी केवळ त्यांच्या मार्गांतील विघ्नें या दृष्टीनें केव्हांहि गौणच राहणार.

पात्रांच्या स्वभावविकासाची रा. घारपुरे यांनीं मोठी मार्मिक मीमांसा केली आहे असें वाचकांना आढळून येईल. त्यांतल्या त्यांत घनश्यामाच्या बाबतींतलें त्यांचें म्हणणें विशेष समर्पक वाटण्यासारखें आहे. पुष्कळांना असें वाटत असतें कीं वाईट मनुष्यें स्वभावतः दुष्ट असतात, पण अनेक वेळां हा परिस्थितीचा परिणाम असतो. एवढा उदार व शूर कर्ण, पण त्याच्या मनांत सुद्धां द्रौपदीनें स्वयंवर-मंडपांत केलेला अपमान शल्यासारखा बोंचत राहिला व दुःशासनानें द्रौपदीला सभेंत ओढीत आणिलें तेव्हां मर्मभेदक शब्दांनीं त्या पूर्व अपमानाचें उट्टें काढण्यांत त्याला कमीपणा वाटला नाहीं. मग घनश्याम तर काय बोलून-चालून अगदीं साधारण प्रतीचा मनुष्य. तेव्हां तो विनाकारण केलेल्या अपमानाचा सूड घेण्यास-कांहीं दुष्कृत्यें करून सुद्धां-कां कंबर बांधणार नाहीं? अशा रीतीनें प्रसंगांचा साहजिक परिणाम स्वभावावर घडलेला दाखविण्यांत नाटककाराचें खरें कौशल्य असतें. असेंच कौशल्य लतिकेवर कोसळलेल्या संकटांनीं तिच्या स्वभावावर झालेला परिणाम दाखविण्यांत प्रकट झालें आहे. जी अविचारानें वाटेल ते बोलावयाची, तिला आपल्या या दुर्गुणानें किती अनर्थ होऊं शकतात हें कळून येतें, व तिच्या स्वभावांत क्रांति होते.

नाटकांत हास्याचा परिपोष मुख्यत्वेंकरून झाला आहे. परंतु गड-कऱ्यांना हास्यरसासाठीं विनोदापेक्षां कोटिबाजपणाचा आश्रय करणें जास्त आवडे. कित्येक ठिकाणीं बहारीचा विनोद कसा साधला आहे हें रा. घारपुरे यांनीं दाखविलें आहे. पण त्यांनीं सांगितल्याप्रमाणें काळेपणावर किंवा कुरूप-पणावर केलेल्या कोट्या उच्च दर्जाचा विनोद या सदराखालीं जाऊं शकत नाहींत. विनोदाचा उद्देश जगांतील सर्व व्यक्तींकडे सानुकंप दृष्टीनें पहावयास शिकवावयाचा असतो. शारीरिक व्यंगांची टर उडविण्यानें ही गोष्ट कशी साध्य

होईल ? त्यांतूनहि काळ्या माणसानें स्नान केल्यावर किंवा त्याला घाम आल्या वर शाई किंवा रंग तयार होतो असल्या शिळ्या कोट्या अगदींच टाळावयास हव्या. त्याचप्रमाणें विनोदाला मार्क ट्वेनी बाष्कळपणाचा विटाळहि फारसा होऊं देतां उपयोगी नाहीं; याचा अचरट अतिशयोक्तिवर भर असतो. विनोदाच्या बाबतींत अस्वाभाविकपणाही टाळला पाहिजे. जें हास्यरसोत्पादक भाषण किंवा वर्णन एखाद्या पात्राकडून करविलेलें असतें, तें करण्याची पात्रता त्या मनुष्याच्या अंगीं असावयास पाहिजे. इंदुबिंदूंच्या तोंडीं घातलेल्या कोट्या या दृष्टीनें अस्थानीं आहेत. आमच्या विनोदप्रवृत्त लेखकांनीं मराठी भाषेंत विनोदी ठरलेल्या आणि मार्क ट्वेन, डिकन्स असल्या ठरीव लेखकांच्या पुस्तकांच्या वाचनावर संतुष्ट न राहतां अनेक अभिजात विनोदाच्या पुस्तकांचें परिशीलन करावयास हवें.

ग्रंथकर्तृत्वाच्या क्षेत्रांत रा. घारपुरे यांनीं जें पहिलें पाऊल टाकिलें आहे, त्यावरून तेथें त्यांची सदैव प्रगति होत राहील अशी आशा करावयास हरकत नाहीं.

**रा. प. सबनीस**

# प्रो. द. वा. पोतदार बी. ए. यांचा अभिप्राय.

रा. वा. ह. घारपुरे यांनीं लिहिलेली गडकरीकृत भावबंधन नाटकावरील टीका मी वाचून पाहिली. गडकऱ्यांच्या कृतींवर प्रसिद्ध होणारा हा तिसरा स्वतंत्र टीकाग्रंथ होय यावरूनच गडकऱ्यांच्या वाक्प्रभुत्वाची कल्पना कोणासहि सहज होईल. तरुणांच्या मनांत गडकऱ्यांनीं स्वभाषाप्रेमाच्या उंच लाटा उठविल्या यांत संशय नाहीं. हें त्यांनीं जें 'भावबंधन' केलें त्यामुळेंच टीकाकार पुढें सरसावून त्यांच्या कृतींचीं परीक्षणें प्रसिद्ध करीत आहेत.

रा. घारपुरे यांनीं आपल्या या टीकाग्रंथांत संविधानक, पात्रें, नाट्यवस्तु वगैरेंचा निरनिराळ्या परिच्छेदांत विचार केला असून ग्रंथकाराचे दोष दिसले ते देखील दाखविण्यास कमी केलें नाहीं. रा. घारपुरे यांचा हा प्रयत्न निःसंशय अभिनंदनीय आहे आणि स्वतंत्र असें टीकाशास्त्र जरी मराठी नाटककारांनीं निर्माण केल्याचें त्यांचें मत आम्हांस ग्राह्य नसलें तरी त्यांनीं केलेली चर्चा उद्बोधक आहे यांत संशय नाहीं. रा. घारपुरे यांनीं ज्या अंगांचा विचार या टीकेंत केला आहे त्याजपेक्षां निराळीं अंगें टीकेसाठीं घेऊन भावबंधनाचा परामर्ष घेणें अवश्य आहे; तथापि घेतला आहे तेवढाहि परामर्ष नीटपणें लक्ष्यांत घेतल्यास गडकऱ्यांच्या भावबंधन नाटकाचें मर्म अधिक लक्ष्यांत येऊन त्या कृतीचा रसास्वादहि घेण्यास चांगलें साहाय्य होईल असें मला वाटतें.

चैत्र शु. २ शके १८४९<br>पुणें शहर

दत्तो वामन पोतदार

# आभार

वाङ्मयांत नाट्य हें लोकशिक्षणाचें एक परिणामकारक अंग आहे. ह्याच दृष्टीनें पाहिलें असतां प्रत्येक नाटकांत कांहीं तरी हातीं लागेल, ह्यांत कोणाचाही मतभेद नाहीं. अभ्यासकाला इतकेंच पाहावयाचें असतें कीं, ही गोष्ट कोणकोणत्या साधनांनीं व गुणावगुणांनीं साध्य झाली आहे, व तिचे परिणाम सामान्य जनसमूहावर कोणकोणते होतात. प्रत्यक्ष नाटककारांची व माझी कधींच गांठ पडलेली नसल्यानें त्यांच्या चहात्यांवर अगर इतरांवर न विसंबतां त्यांच्या वाङ्मयापत्यांकडूनच मी त्यांची बेताबाताची ओळख करून घेतली असल्यानें माझ्या विधानांत कदाचित् कमजास्तपणा आढळेल. आजपर्यंत कै. गडकऱ्यांच्या वाङ्मयमहोदधींत बुचकळ्या मारून त्यांच्या अनेक चहात्यांनीं अनेक तऱ्हांचीं रत्नें त्यांतून काढलीं त्या मानानें माझा हा प्रयत्न अपूर्ण आहे ह्याची जाणीव मला आहे. मराठी नाट्यरचनेचा अभ्यास करून तो रसिकांपुढें परीक्षणार्थ ठेवावा ह्याच उद्देशानें मी हा प्रयत्न केला आहे, व त्या दृष्टीनें रसिक त्याकडे पाहातील अशी आशा आहे.

ह्या अभ्यासाला प्रवृत्त करण्यास कारण रा. रा. त्र्यंबक सीताराम कारखाननीस, महाराष्ट्र नाटक मंडळीचे माजी मालक व त्याची दिशा दाखविणारे न्यू पूना कॉलेजांतील प्रो. लागू व रा. रा. केशव त्र्यंबक दाते, महाराष्ट्र नाटक मंडळीचे सध्यांचे चालक हे होत, हें येथें आभारपूर्वक मी नमूद करितों. रा.रा. कारखानिसांच्या "राजाच्या बंडा"वरच पहिल्यानें मी प्रो. श्री. नी. चाफेकरांचे अध्यक्षतेखालीं टीका वाचली व ती ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झाली; आतां निरनिराळ्या कारणांनीं सर्वतोमुखी झालेल्या कै. गडकऱ्यांच्या "भावबंधना"वर टीका लिहिली आहे. मात्र कै. गडकऱ्यांच्या "कवींच्या कारखान्यां"तला उपहास पत्करूनसुद्धां मला माझे मित्र रा. रा. विश्वनाथ गणेश ताम्हणकर यांचे आभार मानल्याखेरीज गत्यंतर नाहीं. त्यांचा जर आग्रह नसता तर माझ्या

हातून कांहींच झालें नसतें. पाश्चात्य व पौर्वात्य वाङ्मयक्षेत्रांत अविश्रांत संचार केलेल्यांचें मार्गदर्शकत्व हें पुस्तक छापून होईपर्यंत मला मुळींच न. लाभल्यानें राहिलेली अपूर्णता, प्रो. सबनिसांनीं प्रस्तावनेंत व प्रो. लेले व पोतदार यांनीं आपल्या अभिप्रायांत, आत्मीय भावनेनें दिग्दर्शित करून भरून काढली आहे. ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. छापण्याची घाई झाल्यानें शुद्धलेखनाच्या व शब्द कांहीं वेळां मागें पुढें झाल्याच्या चुका राहिल्या आहेत, त्यांबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

पुणें, १४३ बुधवार,
ता. ४ एप्रिल १९२७

वामन हरी घारपुरे

---

॥ श्री ॥

# संगीत भावबंधन-नाटकावरील टीका

## (१) कै० राम गणेश गडकरी यांचें अल्प चरित्र.

प्रतिभाशाली कवी गोविंदाग्रज, हास्यरसांत बुडवून टाकणारे विनोदी लेखक बालकराम व वाचक–प्रेक्षकांना कल्पनांच्या भराऱ्यांनीं व विनोदी प्रसंगांनीं आकर्षून टाकणारे नाटककार राम गणेश गडकरी, हे एका अप्रसिद्ध व गरीब कुळांत जन्मले असले तरी आपल्या मातृभाषेला नानाविध लेखनालंकारांनीं सजवून तिच्याबरोबरच आपल्या कुळालाही त्यांनीं कीर्तिसंपन्न केलें आहे. प्रथित-कुलपरंपरेला आपल्या कर्तृत्वानें उजळा दिला काय आणि अप्रसिद्ध कुलाला कीर्तीनें भूषविलें काय, वरवर पहाणाराला दोन्ही गोष्टी सारख्याच तेजाळ दिसतात. परंतु पहिलीपेक्षां दुसरी गोष्ट निःसंशय अधिक कौतुकास्पद व अभिमानास्पद असून त्या स्थितींतल्या माणसांना मार्गदर्शक असते. प्रतिकूल परिस्थितींत साधनांची जमवाजमव करून उन्नतीला पोहोंचणारा जबरदस्त महत्वाकांक्षी व कर्तृत्ववान् असतो. म्हणूनच अशा माणसाचें चरित्र अधिक उद्बोधक असतें. परंतु दुर्दैवानें, कै. गडकरी यांच्या ग्रंथांचें मर्म समजावून सांगणारें व वाचनीय असें चरित्र आपणांस उपलब्ध नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर व त्यांचे निरनिराळे ग्रंथ छापले गेले त्या वेळीं प्रसिद्ध झालेलीं चरित्रें केवळ त्रोटक व अभ्यासकांची तहान न भागविणारीं आहेत.

कै. राम गणेश गडकरी यांचा जन्म गुजराथेंत नवसारी येथें इ. स. १८८५ सालीं झाला. ज्या वेळीं भाषेचे व आचारविचारांचे संस्कार व्हावयाचे असतात त्या वेळीं ते गुजराथी वातावरणांत झाले. ज्यांनीं आपल्या मराठी

भाषाप्रभुत्वानें मोठमोठ्या मराठी साहित्यभक्तांना तोंडांत बोट घालावयास लाविलें त्या गडकऱ्यांच्या जिव्हेंतून पहिले गुजराथी बोल बाहेर पडले. इतकेंच नव्हे तर पांचव्या अगर सहाव्या वर्षीं लिहिलेलें पहिलें नाटकही त्याच भाषेंत त्यांनीं लिहिलें असें रा. रा. कमतनूरकरांनीं म्हटलें आहे. त्यांचें शिक्षण नवसारी व महाराष्ट्रांत कर्जत येथें थोडें फार झालें. बाकीचें पुण्यास झालें. त्यांचे वडील अल्पवयांतच वारले. अनेक आपत्तींपैकीं लहान वयांत पोरकेपणा येणें ही अत्यंत भयंकर आपत्ति होय. लहान रोपट्याची जितक्या काळजीनें व जिव्हाळ्यानें जोपासना करावी लागते, त्यापेक्षां जास्त काळजी व जिव्हाळा लहान मुलाला वाढविण्यास लागतात. शारीरिक विकासाबरोबर मानसिक विकास योग्य तऱ्हेनें झाला असला तरच दया, प्रेम, धैर्य, निर्भयता, कर्तव्यबुद्धि, ध्येयसिद्धीचा प्रयत्न व आत्मविश्वास हे गुण वाढून तो सुसंस्कृत व शीलवान् बनतो. कै० गडकऱ्यांचा स्वभाव अत्यंत हट्टी व द्वड होता ह्याचें प्रतिबिंब त्यांच्या नाटकांत व काव्यांत दिसून येतें. फारशी अनुकूल परिस्थिती नसतां प्रीव्हियसपर्यंतचा अभ्यास त्यांनीं नेटानें केला व त्यांतही संस्कृत व गणित विषयांत त्यांनीं प्राविण्य संपादिलें. हाही हट्टी स्वभावाचाच सुपरिणाम होय असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा प्रकारच्या या विद्यालाभाच्या मार्गांत ज्यांनीं ज्यांनीं त्यांना उत्तेजन दिलें व सहानुभूति दाखविली त्यांचे, गडकरी किती ऋणी असत व त्यांचा किती आदरानें उल्लेख करीत हें त्यांच्या ‘ प्रेमसंन्यास ’ व ‘ पुण्य प्रभाव ’ ह्या नाटकांच्या प्रस्तावनांवरून सुद्धां दिसून येतें. गडकऱ्यांना प्रीव्हियस परिक्षेंत अपयश आल्यानंतर ‘ ज्ञानप्रकाश ’ व ‘ न्यू इंग्लिश स्कूल ’ मध्यें कांहीं दिवस नोकरी करून त्यांनीं ‘ किर्लोस्कर संगीत मंडळींत ’ शिक्षकाची नोकरी पत्करली. ह्याच ठिकाणीं त्यांची व श्रीयुत श्री. कृ. कोल्हटकर यांची गांठ पडली असें म्हणतात. ‘ किर्लोस्कर मंडळींत ’ आल्यानंतर त्यांचा व रंगभूमीचा प्रत्यक्ष परिचय झाला. होतकरू नाटककारांचीं नाटकें व इतर महत्वाचें नाट्यवाङ्मय

वाचावयास मिळाल्यानें ह्या प्रतिभाशाली व बुद्धिमान् 'गडकरी मास्तरांना' आपलें खरेंखुरें कर्तव्यक्षेत्र सांपडलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या काव्याच्या प्रसिद्धीकरणाबरोबरच काव्य, नाट्य व विनोदी वाङ्मयांचा व्यासंग सुरू झाल्यानें त्यांच्या स्फूर्तीला व कर्तृत्वाला वाव सांपडला. 'किर्लोस्कर मंडळीचे' मालक श्री. मुजूमदार प्रसिद्ध करीत असलेल्या 'रंगभूमी' मासिकांत लेख लिहावयास त्यांनीं सुरवात केली. श्री. कोल्हटकरांच्या नाटकांतील 'सुंदर उतारें', 'वेड्यांचा बाजार' हें अपूर्ण नाटक, व इतर कित्येक लेख त्यांनीं लिहिलें. 'वेड्यांचा बाजार' हें नाटक त्या वेळीं प्रसिद्ध होणाऱ्या नाट्यग्रंथावर थोड्या फार प्रमाणांत टीकात्मकच होतें असें 'बाळाभाऊ' ह्या पात्राच्या तोंडच्या कित्येक भाषणांवरून दिसून येतें. ह्याच वेळीं आपण नाटककार व्हावें अशी महत्वाकांक्षा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली असावी. ती फलद्रूप व्हावयास मात्र आणखी सहासात वर्षांचा काल जावा लागला व यशस्वी नाटककार अशी प्रसिद्धी मात्र त्यांना त्यांच्या 'पुण्य-प्रभावा'नें दिली. बाकीचीं तीन नाटकें त्यांच्या मृत्युनंतर प्रसिद्धीस आलीं व तीं पाहाण्याची व वाचण्याची उत्सुकता वाढतच गेली. 'राजसंन्यास' हें अपूर्ण नाटक रंगभूमीवर आणण्याचा व तें पाहाण्याचा मोह मराठी रसिकांना आवरला नाहीं हेंच त्यांच्या यशाचें गमक आहे.

## (२) कै० गडकऱ्यांचें वाङ्मय

कवी या नात्यानें त्यांची प्रसिद्धी बऱ्याच आधींपासून होती. त्यांची पहिली कविता सन १८९६ सालांत ह्मणजे त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षीं रचलेली आहे. त्यांच्या काव्यांत व नाटकांत एक मोठा फरक आढळतो. तो हाच कीं, काव्यांत ते काव्य लिहावयास शिकत आहेत असें मुळींच दिसून येत नाहीं. अगदीं १९०१ सालीं लिहिलेली, 'नदीस पूर आलेला पाहून' ह्या कवितेपासून तर अखेरच्या कवितेपर्यंत त्यांच्या कवित्वाची साक्ष पटते. परंतु नाटकांचें तसें नाहीं. 'वेड्यांचा बाजार' लिहिणारा नाटककार

नाट्यलेखनाचे धडे घेत होता असें दिसतें. प्रि. भाटे यांनीं 'प्रेमसंन्यासाच्या' प्रस्तावनेंत "प्रेमसंन्यास प्रतिपच्चंद्राप्रमाणें," "पुण्य-प्रभाव चतुर्थीच्या चंद्राप्रमाणें," "एकच प्याला अष्टमीच्या चंद्राप्रमाणें," "भावबंधन द्वादशीच्या चंद्राप्रमाणें" व "राजसंन्यास पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें", अशा वाढत्या कलांच्या उपमा दिल्या आहेत. शेवटच्या ऐतिहासिक नाटकाखेरीज बाकीचीं काल्पनिक आहेत. परंतु सर्वच नाटकांत कल्पनांच्या स्वैर विहाराला भाषाप्रभुत्वाची जोड मिळाल्यानें नाट्यरचनाकौशल्याची फारशी पर्वा न करितां त्यांना मराठी रंगभूमी काबीज करितां आली. त्यांच्या नाटकांतील विनोदांत अभिनय व कोटिक्रम असल्यानें आबाल-वृद्धांना, सुशिक्षितांना तसाच अक्षरशत्रूंनां व हंसतमुखांपासून तर गंभीरवृत्तीच्या नानाफडणविसांपर्यंत सर्वांना हंसवून तो पोट दुखावयास लावणारा आहे. अनुप्रास व श्लेष हे त्यांचे अत्यंत आवडते अलंकार आहेत असें, "रावणाच्या दहा तोंडांवर रामबाण औषध मिळालें, पण हें तोंड असाध्य आहे;" "पांच अंक मोजण्याच्या आंत तुझ्या दृष्टीस पडेल कीं ही कॉमेडी आहे ह्मणून" (भा. बं.); "बेवकूब बाप, नालायक नवरा, मातीमोलाचा माणूस, दीडदमडीचा दारूबाज" (ए. प्या.) इत्यादि अनेक उदाहरणांवरून दिसून येतें. कोट्या, अलंकार, कल्पना व विनोद यांनीं चमत्कृती उत्पन्न करावयाची हा त्यांचा प्रयत्न विशेषतः दिसून येतो, व हाच त्यांच्या नाटकांचा विशेष होय. हास्य, करुण, वत्सल व शृंगार हे रस त्यांच्या नाटकांत आहेत. श्री. खाडीलकरांच्या नाटकांत नेमक्या प्रवेशांवर बोट ठेवून जसे शृंगाराचे उत्तम नमुने ह्मणून दाखवितां येतील तसें प्रस्तुत नाटककारांच्या नाटकांत दाखवितां येत नाहीं. 'प्रेमसंन्यासांतील' जयंत–लीला, आणि सुशिला–विद्याधर यांचे प्रवेश करुणरसालाच मुख्यतः पोषक होतात. 'पुण्यप्रभावांतील' कालिंदी–वृंदावन व भूपाल–वसुंधरा ह्यांचे प्रवेश म्हणजे परस्परांच्या बुद्धिवैभवाच्या शर्यतीचे मासले आहेत असें वाटतें. शारीरिक

सौन्दर्याच्या जोरावर ते एकमेकांस आकर्षण करीत नसून मानसिक सौन्दर्यानें आकर्षित आहेत. तेच धैर्यधर–भामिनी अगर कच–देवयानी घ्या. आपल्या परवानगीशिवाय सर्व सैनिक व नोकरचाकर निघून गेले व वनमालेचा वरचष्मा होत चालला म्हणून वरवर अवसान अणणारा धैर्यधर तिला रागानें हांका मारतो, परंतु तिचा मंजूळ व कोमल आवाज कानीं पडतांच रागाचा आविर्भाव चटसारा गुंडाळून ठेवतो. शारीरिक सौन्दर्य व सर्वसाधारण सद्-गुण ह्यांपेक्षां बौद्धिक सामर्थ्य व सौंदर्य देवयानींत असतें तर 'विद्याहरण' निराळ्याच तऱ्हेनें रंगलें असतें. फक्त 'राजसंन्यासांत' तुळशी–संभाजीचा व रायाजी- शिवांगीच्या प्रवेशाचा कांहीं भाग माल श्रृंगाररसाचे नमुने आहेत. त्या नाटकांत बौद्धिक सौंदर्यापेक्षां शारीरिक सौंदर्यावर व विचारांपेक्षां विकारा-वर जास्त मदार असल्यामुळें त्यांत शृंगार, वीर व करुण रसाचे उत्कट नमुने पुष्कळ सांपडले असते, पण—

"आई, तुला विकायची म्हणजे काय ग?" ह्या रोहिदासाच्या वाक्यांतला करुण रस 'भावबंधनांतील' दुःखानें भारावलेल्या धुंडीराजाला त्याच्या धाकट्या दोन मुली, 'बाबा मी तुमची लाडकी ना हो? आणि मी हो बाबा?" असें विचारतात त्या वेळीं प्रतीत होतो व शोक रसांत अज्ञ बालकांच्या वत्सलतेचा ओलावा दोन्ही ठिकाणीं नजरेस पडतो. पातिव्रत्य-रक्षणार्थ दीनाराला, ठार करण्याकरितां धैर्यानें पुढें करून मग रिकाम्या पाळण्याला झोंके देणारी वसुंधरा, दीनाराच्या ठिकाणी चेतनाचा बळी देऊन मग स्मशानगीतें गाणारी कालिंदी, हीं करुणरसाचीं उत्तम उदाहरणें होत. सुशिलेचें लीलेबद्दल, वसुंधरेचें युवराज व दीनाराबद्दल, मालतीचें व धुंडीराजाचें धाकट्या मुलींबद्दल व सावाजीचें येसूबाई–संभाजीबद्दलचें वात्सल्य मनाला चटका लावणारें आहे. हास्यविनोदाबद्दल तर बोलावयासच नको. प्रसंग गंभीर असला तरी कोट्यांचा मारा 'भावबंधनांत' तरी पाहावयास सांपडतो.

कांहीं विशिष्ट हेतूनें नाटय,काव्य व विनोदी लेख त्यांनीं लिहिले आहेत. साहजिकच अशा कृति थोडया कृत्रिम वाटतात. सहजस्फूर्त काव्यांपेक्षां त्यांची योग्यता कदाचित् कमी असेल. परंतु अशी सहेतुक कृती लेखकाच्या एखाद्या ध्येय-प्रेरकतेची साक्ष देते. समाजांतील अचरट व पदोपदीं नडणाऱ्या चालीरीतींचें प्रदर्शन करण्याकरितां 'वेड्यांचा बाजार' भरविला आहे. पुनर्विवाहाचे समर्थनार्थ त्यांनीं 'प्रेमसंन्यास' केला. यांतील जयंताच्या व लीलेच्या निष्फळ प्रेमासारख्या कविता 'वाग्वैजयंतीं'त किती तरी गुंफिल्या आहेत. समाजाच्या रूढीवर यासारखेच ओढलेले तडाखे 'स्मशानगीत', 'दसरा' या काव्यांत सांपडतात. पतिव्रतांचें तेज 'पुण्यप्रभावांत' डोळे दिपवून वृंदावनासारख्या 'दुष्कर्मयोग्याला' खालीं पाहावयास लावतें. मद्यपानाचा शेवट 'एकच प्याला' दाखवितो. 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी! राज्य-उपभोग म्हणजे 'राज्यसंन्यास'. सामान्य संसारी माणूस 'विक्रांत' लादलेलें ओझें आयुष्यभर वाहून अखेरीस स्वकर्तृत्वाची खूण ("नाहीं म्हणावयास चार पोरावाळांखेरीज") न ठेवतां मुकाट्यानें परलोकीं कसा प्रयाण करतो हें 'मूकनायक' स्पष्ट करतो. 'ठकीचें लग्न' वधूवरपक्षांच्या अचरट अपेक्षा काय असतात तें दाखवितें. 'प्रो. कोटिवुद्धे' आकाशांतील अनंत तारकांचें व ग्रहांचें ज्ञान अगाध विद्वतापूर्ण शब्दांत आपल्या रडक्या तान्ह्या बाळाला सांगतात परंतु व्यर्थ. ह्या अप्रबुद्धाचें आपलें एकच टाहोरूप उत्तर आहे. त्याला ज्योतिष, भूगर्भ, रसायन वगैरे शास्त्रांचें पांडित्य काय होय! शेवटीं त्याची चिमुकली, परकर नेसलेली ताई येऊन 'हर्रर्र, भुर्रर्र, काऊ, चिऊ,' वगैरे अर्थहीन व अशुद्ध शब्दप्रयोगांनीं त्याला उगा करते. हें पाहून प्रोफेसरसाहेब जगताच्या अज्ञानाची व 'अज्ञान हेंच सुख' या तत्वाची कींव करतात. जिज्ञासू जगाचा, प्रथम पांगुळगाड्याच्या सहाय्यानें विद्येचा मार्ग आक्रमण करण्याचा हा प्रयत्न, विद्वानांना उपहासास्पद कसा वाटतो हें

दाखविलें, परंतु ह्या उपहासांतच ‘ बाळकरामांनीं ’ अशा अहंमन्यांचा उपहास केला आहे.

कल्पनेच्या भराऱ्या, अनुप्रासांची रेलचेल, चमत्कृतिपूर्ण कोटिक्रम याप्रमाणेंच मनांत असलेली गोष्ट वेधडक घडवून आणावयाची हाही एक गडकऱ्यांचा विशेष आहे. परंतु त्याची जमा दोषांतच केली पाहिजे. दुमनचें प्रेत छिन्नभिन्न करण्याचा अमानुषपणा, मनोरमेचा खून जयंताकडून झाल्याचा आरोप लादण्याकरितां, कमलाकराकडून त्यांनीं करविला आहे. ‘पुण्यप्रभावांत’ कंकण प्रत्यक्ष वृंदावनाला सांगतो कीं, “महाराज, आपल्या एकनिष्ठ सेवकाच्या ठिकाणीं बाईसाहेबांची निष्ठा थोडी चळली आहे.” ‘राजसंन्यासां’त तुळशी दौलतरावाचा वेधडक त्याग करिते. भाषेंत नवीन शब्द-प्रयोग, पुष्कळदां अनुप्रासाकरितां, व निरनिराळ्या चालीरीतींचा उल्लेख हेहि महत्वाचे विशेष होत. बऱ्याच दिवसांनीं मोरेश्वर भेटणार म्हणून धुंडीराज म्हणतो, “तसें पाहिलें तर आतां परातींत तेल घालून देवळांतच त्याची गांठ घेतली पाहिजे.”(भावबंधन) बऱ्याच वर्षांनंतर शहाजीराजे जेव्हां शिवाजीस भेटावयास आले, तेव्हां त्यांची तुळजापुरास देवीच्या मंदिरांत काशाच्या ताटांत तूप घालून त्यांत एकमेकांचें मुखावलोकन करून भेट झाली असा उल्लेख बखरींतून आढळतो. तोच अर्थ ह्या धुंडीराजाच्या वाक्यांत आहे.

कर्त्याच्या ग्रंथांची गोडी लागल्यानंतर त्यांत दिसून येणाऱ्या त्याच्या प्रतिबिंबापलीकडे असलेल्या प्रत्यक्ष त्याच्या व्यक्तित्वाबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे तो समाजांत कसा वागतो, मित्रांशीं कसा बोलतो, त्याच्या इच्छा, आकांक्षा काय आहेत, त्याचें यशापयश, त्याचा अभ्यास व अवलोकन त्याच्या आवडीनावडी, कामाच्या पद्धती व कोणत्या परिस्थितींत त्यानें ग्रंथ लिहिले वगैरेबद्दलचीं अवांतर माहिती आपणांस त्याच्या चरित्रावरून कळते. कै. गडकरी यांचें संभाषण म्हणजे “कोटिबाजपणा व विनोद यांचा चमचमीत मसाला” भरलेले व त्यामुळें “बुद्धि-जिव्हेला पक्वान्नासारखें अवीट वाटणारे व

हास्याचा पूर आणणारें असल्यानें तें भाषण एक प्रकारचें विश्रांतिस्थानच होऊन बसत असें" असें श्री. न. चिं. केळकरांप्रमाणेंच त्यांचा सहवास घडलेल्या मित्रांकडून ऐकावयास मिळतें. त्यांच्या आयुष्यांत "जयंताची" प्रेमनिराशा, "ईश्वराची" सात्विकता, "सुधाकराची" व्यसनाधीनता व त्यांतून सुटण्याकरितां धडपड व "घनःश्यामाची" निरपेक्ष, व हेतुशून्य, शुद्ध दयेची पिपासा, कितपत होती हें दाखविणारें ग्रंथकर्त्याचें चरित्र त्याच्या ग्रंथावर टीका या दृष्टीनें उपयोगी पडत असेल तेवढेंच आपणांस जरूरीचें आहे.* परंतु असा प्रमाणभूत ग्रंथ अगर माहिती आपणांस उपलब्ध होईपर्यंत ह्या बाबतींत केसांचे पापुद्रे काढीत बसणाऱ्या तर्कांच्या सहाय्यानें काव्यांत व नाटकांत आढळून येणाऱ्या गोष्टींचें वाभाडे काढीत न बसणेंच बरें. गडकरी सन १९१९ च्या जानेवारींत अल्प वयांतच मृत्यू पावले.

---

*हडसन ह्मणतो, In our study of the personal life in literature we shall of course be greatly helped by the judicious use of a good biography. Our interest in the writings of any great author being once aroused, the desire will inevitably be stimulated to learn something of the man himself, as a man, beyond that which his work reveals to us. We shall be curious to see him in the social surroundings in which he lived and in his daily converse with his fellows; to know the chief facts of his outward history–his ambitious struggles, successes, failures, and the connection of his books with these; the way in which and the conditions under which such books were written; his intellectual habits and methods of work. ह्यांत ग्रंथकर्त्याच्या चरित्राचें सामान्य विवेचन आहे. परंतु पुढें तो स्पष्ट ह्मणतोः—

Distinguishing, as we must, between the reading of a biography simply as a piece of literature, which is one thing and the reading of it in connection with and as a commentary upon an author's writings which is another, we shall in the latter case welcome and utilise everything that really brings us into more intimate relationships with the genius and essential character of the man with whom we have to deal."

# नाटकावरील टीका.

## —: १ कल्पनेचा उगम व नामकरण :—

(१) कल्पनेचा जन्म

आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला शेवटचा प्रवेश लिहून 'भावबंधनांत' आपलें जीवन ओतून रोगग्रस्त जड शरीर टाकून जणूं काय के. वा. गडकऱ्यांनीं ह्या वाङ्मय कृतींतच नवा जन्म घेतला. त्यांच्या मृत्यूनंतर सुमारें दीड पावणेदोन वर्षांनीं हें नाटक श्रीयुत श्री. कृ. कोल्हटकरांच्या पद्यांसह व प्रस्तावनेसह प्रसिद्ध झालें. " संगीत सहचारिणी " हें श्री. कोल्हटकरांचें नाटक बसविलें जात असतां मुंबईस तें त्यांच्या वाचनांत आलें. अशाच प्रकारचें आनंदपर्यवसायी व हास्यरसपूर्ण नाटक आपण लिहावें असा विचार येऊन त्यांनीं हें 'भावबंधनाचें' कथानक मनांत जुळविलें. त्या वेळीं कोणीसे स्नेही त्यांना कांहीं विचारीत असतां, "थांब रे, एक दुष्ट मनुष्य, दोन म्हातारे व दोन पोरींना छळतो आहे." अशा प्रकारें भावी नाटकांतील प्रसंग डोळ्यापुढें उभे करीत होते वगैरे गोष्टी त्यांच्या मृत्यूनंतर 'मनोरंजन' आणि इतर मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'सहचारिणी' प्रमाणें 'भावबंधन' हें 'light comedy' म्हणून लिहिण्याचा त्यांचा विचार होता असें म्हणतात. परंतु निदान मराठी नाटकांत तरी "संशयकल्लोळा" सारखें दुःखाची अगर उद्वेगाची एकही छटा मुद्रेवर उठवूं न देतां व वाचक-प्रेक्षकांच्या मनाला राग, दुःख, खेद, तिरस्कार वगैरे भावनांचा किंचित् स्पर्शही होऊं न देतां त्यांच्या चित्ताला व विचारांना चढत्या हास्यकल्लोळांतच तरंगत ठेवून शेवटपर्यंत आनंद व समाधान वाटावयास लावण्याचा यशस्वी प्रयत्न केलेलें दुसरें नाटक नाहीं.

गुरूंचें नाटक वाचून तसेंच नाटक आपण लिहावें अशी शिष्याला स्फूर्ति झाली ही गोष्ट शिष्याप्रमाणें गुरूलाही भूषणावह आहे. गुरूंच्यापेक्षां विनोदांत, कथानकाच्या साधेपणांत, भाषा व कल्पनांच्या सौकर्यांत व सौंदर्यांत शिष्यच सरस ठरला हें गडकरीपणाला शोभण्यासारखेंच झालें.

(२) नामकरण

" त्वयि मे भावनिबंधना रतिः " ह्या " अजविलापांतील " काव्यचरणावरून "भावबंधन" म्हणजे प्रेमबंधन हें नांव सुचलें असावें असें वाटतें. मालती म्हणते, " मस्तकावर हात ठेवणाऱ्या माझ्या पितृस्वरूप परमेश्वराच्या आज्ञेनें, गुडध्याला मिठ्या मारणाऱ्या गुडध्याएवढ्या गोजिरवाण्या जगाच्या सुखासाठीं ही मालती आजवर प्रेमानेंच पाहिलेल्या, मनानेंच जोपासलेल्या, जिवापाड जपून ठेवलेल्या हृदयस्थ 'भावबंधनाचे' धागे निर्दयपणानें तोडून टाकीत आहे. " ह्या उताऱ्यांत दिसून येणारे मालतीचे 'भावबंधन' हे शब्द पतिप्रेमाचे दर्शक आहेत परंतु अशाही प्रेमाची तिनें कर्तव्यनिष्ठुरतेनें पितरांच्या अब्रूकरितां व भावंडांच्या प्रेमाकरितांच ताडातोड केली. त्याप्रमाणें लतिकाही करते असें कथानकावरून समजेल. तिचें मालतीवरील प्रेम ही त्यापुढची पायरी झाली. धुंडीराजानें आपल्याला निष्कारण छळणाऱ्या परंतु सरतेशेवटीं कायद्याच्या कचाटींत सांपडणाऱ्या घनश्यामाला सोडवितांना त्यांत शुद्ध व निरपेक्ष दया अगर प्रेमच दिसून येतें. आपल्या सौख्याकरितां मालतीशी विवाह करूं इच्छिण्यांत अगर लतिकेला, मूर्ख मोरेश्वराला अगर नंतर घनश्यामाला देण्यास तयार होण्यांत धनेश्वराचें आत्मप्रेमच दिसून येतें. धनेश्वर, महेश्वर, घनश्याम यांच्या स्वार्थी प्रेमाच्या कृष्णपार्श्व भागावर मालती-लतिका यांचें पवित्र आणि धुंडीराजाचें शुद्ध व निरपेक्ष प्रेम जास्त उठावदार दिसतें. उच्चतमापासून धनेश्वरासारख्या अधम पात्रापर्यंत निरनिराळ्या अर्थांचें व रूपांचें' भावबंधन ' च सर्वांच्या स्वभावांत व कृत्यांत सूचित असल्यानें ह्या नाटकास ' भावबंधन ' हें नांव योग्य आहे.

## —: २ संविधानक :—

(१) संविधानक चर्चा

नामकरणानंतर प्रथमतः संविधानक काय आहे तें समजून घेणें अवश्य आहे. सोयीकरितां त्याचे एक मुख्य व दोन उपकथानकें असे भाग पाडले आहेत. पाहिल्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशापासून तर पांचव्या अंकापर्यंत घनश्यामाची कर्तृत्व-शक्तीच प्रभावी असून सर्वांना आखून दिलेल्या कक्षेंत तो भ्रमण करावयास लावीत आहे. ह्या सर्व कळसूत्री बाहुल्यांचीं सूत्रें त्याच्या हातांत असल्यानें मुख्य कथानक म्हणजे पायरी पायरीनें रंगत चाललेल्या घनश्यामाच्याच कारस्थानाची गोष्ट असें म्हणावयास हरकत नाहीं. लतिका–प्रभाकर व मालती-मनोहर ह्या जोडप्यांच्या जोडीचें पहिलें आणि महेश्वर–इंदू-बिंदू या विनोदी पात्रांचें दुसरें उपकथानक होय. पहिल्या उपकथानकांतील चौकडीनें घनश्यामाला नाटकांतील दुरात्मा बनविण्याखेरीज विशेष कर्तृत्व दाखविलें नाहीं. त्यांच्या प्रेमाची जोपासना करण्याची व तें कसोटीला लावण्याची संधीही त्यांना घनश्यामामुळें मिळाली. सद्गुणसंवर्धन ही आणखी एक गोष्ट त्यांनीं नांव घेण्यासारखी केलेली आहे. परंतु कर्तृत्वाखेरीज नुसत्या सद्गुणसंवर्धनानें कार्य-भाग होत नाहीं. घनश्यामाचे डाव उलथून पाडतांना सुद्धां त्यांना मुख्यतः दैवानें हात दिला. कमावलेल्या बुद्धिमत्तेचा त्यांनीं उपयोग न करितां आपल्याच विचारांत ते दंग राहिले हा त्यांचा गुन्हाच म्हटला पाहिजे. त्यांनीं आपलें एखादें सत्कृत्य पार पाडण्याचें ध्येय पुढें ठेविलें व दुरात्म्यानें त्यांना विघ्नें केलीं तरी त्यांतून ते पार पडले, असें कांहीं घडलें असतें तर त्यांचें कथानक मुख्य ठरलें असतें. परंतु दोन्ही उपकथानकांत संगतवार असें कथा-नक नाहीं म्हणूनच घनःश्यामाचें कथानक मुख्य ठरतें.

(२) मुख्य कथानक

घनश्याम मातृपितृसुखाला आंचवलेला व वात्सल्याचा ओलावा न मिळाल्यानें निष्ठुर जगाच्या वाळवंटांत वाढलेला आहे. फारशी विद्या आणि धनही त्याच्याजवळ नाहीं. परंतु कर्तृत्वाच्या जोरावर तो धनेश्वराचा मुनीम बनला आहे. नाटकाच्या प्रारंभींच आपल्या योग्यतेच्या अशा एका विमाकंपनीच्या एजंटाच्या—धुंडीराजाच्या—मुलीशीं विवाह करण्याच्या विचारानें तो त्याची भेट घेतो. धुंडीराजाच्या मनाप्रमाणें घनश्यामाचें स्थळ आपल्या मालतीसारख्या सुशिक्षित व सुंदर कन्येला योग्य आहे. परंतु घनश्यामानें तिची संमती मिळविल्यानंतर, तिला "पिवळी करून देऊन दोन हस्तक व तिसरें मस्तक" त्याच्या चरणीं ठेवून मोकळें होण्याची धुंडीराजाची तयारी आहे. नंतर तो "त्याच पावलीं" मालतीची गांठ घेण्याकरितां धुंडीराजाबरोबर जातो. तेथें धुंडीराजाची मुलगी मालती, त्यानें पालन केलेला प्रभाकर, धनेश्वराची मुलगी लतिका व धनेश्वरानें वाढविलेला मनोहर, इंदू-बिंदू धनेश्वराच्या नात्यांतील मुली—आणि धुंडीराजाच्या धाकट्या मुली अशी सर्व मंडळी बसलेली असतात. लतिका-प्रभाकर व मालती-मनोहर यांचें परस्परांवर प्रेम असल्यामुळें व पुढेंमागें त्यांचा विवाह निश्चित घडून येणार असें वडील माणसांच्या संमतीखेरीजही त्यांना वाटत असल्यानें ह्या परस्परांचा थट्टाविनोद करीत बसलेल्या मंडळींना, मालतीला ह्या भलत्याच माणसाकडून एकाएकीं मागणी आलेली ऐकून, कसेंसेंच वाटतें. लतिका-प्रभाकर तर त्याला अगदीं धुडकावतात व मालतीचेहि प्रेम मनोहरावर असल्यानें सौम्यपणानें ती ही मागणी नाकारते. घनःश्याम स्वाभिमान राखून सभ्यतेनें सर्वांचा निरोप घेतो. परंतु, "मालतीची मागणी म्हणजे मालती का भिक्षा आहे, का गोग्रास आहे, का जोगवा आहे?" असा लतिकेनें विचारलेला उद्दाम प्रश्न व "आज मालतीला मागणी घातलीत, उद्यां माझ्याशीं लग्न करायला तयार व्हाल," वगैरे उपहास त्याला फारच झोंबतो. वास्तविक

आइंदाप नसणें व कोणी मार्गदर्शक नसल्यानें एखादी पदवी मिळवितां न येणें ही मालतीला मागणी घालण्याला तो नालायक असल्याचीं लक्षणें नव्हेत. प्रभाकर व मनोहर यांचीही स्थिती तीच आहे. केवळ धुंडीराजाचें वात्सल्य व धनेश्वराचा चांगुलपणा ह्यामुळेंच त्या दोघांना पदव्या मिळवितां आल्या. परभृत प्रभाकराला व धनमत्त लतिकेला त्याचा उपहास करण्याचें कारण नव्हतें. अर्थात् ह्या सर्व गोष्टींचा परिणाम घनश्याम दुष्ट बनण्यांत झाला, व त्याची सर्व जबाबदारी प्रभाकर-लतिका या दोघांवर आहे हें विसरून चालणार नाहीं. तिसऱ्या प्रवेशांमध्यें आपल्या भागीदाराच्या मुलाशीं—भैरेश्वराशीं—लतिकेचा विवाह घडवून आणण्याचा धनेश्वर कां प्रयत्न करतो याचा त्याला अंदाज होतो, व धनेश्वराच्या मनांत स्वतःचेंही लग्न व्हावें असें आहे हेंही तो ओळखतो. लतिका आपली आज्ञा अमान्य करूं लागली हा सारा शिक्षणाचा परिणाम असें वाटून मराठी न बोलणारांचा गराडा तिच्याभोंवतीं असावा म्हणून अशा मराठीतर भाषा बोलणारांचा संच तयार करण्यास तो घनश्यामास हुकूम सोडतो व प्रभाकरादिकांना तेथें येण्याची बंदी करतो. ह्याचा उपयोग करून घेण्याचें ठरवून महेश्वर ह्या त्याच्या एका दोस्ताला बोलावून चौथ्या प्रवेशांत तो त्या प्रे॰वेडानें पागल झालेल्या महेश्वराला एका काव्यकल्पित सुंदरीशीं लग्न लावून देण्याचें आमिष दाखवून त्याचेकडून धनेश्वराचे खोटे दस्तैवज चोरण्याची योजना करतो. पुढील प्रवेशांत धुंडीराजाजवळून चोरी केल्याबद्दलचा खोटा कबूली जबाब, खोट्या पोलिसवेषांत, महेश्वर—भैरेश्वरांच्या मदतीनें तो स्टेशनावर घेतो. ह्याच्या जोरावर पुढें तो धनेश्वरास मालती देण्यास धुंडीराजाला भाग पाडतो. तसें न केल्यास पोलिस—अधिकाऱ्यानें त्याजजवळ वाटेल तें करण्यास दिलेला तो कागद योग्य अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्याची त्याला धमकी देतो. ह्या पूर्वींच त्यानें महेश्वराला 'कामाण्णा' नांव देऊन आंधळ्या कानडी वेषानें धनेश्वराच्या घरांत आणून सोडलेलें असतें व मालती

ही वधू-पंसतीकरितां धनेश्वरापुढें केलेली असते. धुंडिराज प्रथम घनश्यामाला काय आणतो व नंतर मालतीचें लग्न धनेश्वरपंतांशीं निश्चित झाल्याचें काय सांगतो, ह्याचा उलगडा प्रभाकर, मालती, लतिका वगैरे मंडळींना होत नाहीं. माल लतिका-प्रभाकरांच्या शब्दास्त्रांचा मारा इतका वेळ घनश्याम, धनेश्वरावर व एकमेकांवर होत होता तो आतां पुन्हा धनेश्वरावर व होऊं लागतो. शेवटीं घनश्यामाच्या धाकानें त्यांना चूप बसविणें धुंडीराजाला भाग पडतें. तो म्हणतो, " मालती, प्रभा, धनेश्वरांच्या मनाला जर कुणीं दुखविलें तर घरावर तुळशीपत्र ठेवून मला कुठें तरी काळें करावें लागेल हें लक्षांत ठेवा. मी आतां उणें अधीक बोलत नाहीं; पण तुम्ही पोरें मला विष खाण्याची पाळी आणणार असें माल मला वाटावयाला लागलें आहे. " इतकें होईपर्यंत महेश्वराचें खोटे कागद हुडकून काढण्याचें काम सुरू आहे. त्याला मराठी येतें ही गोष्ट इंदूला कळते. परंतु लग्नाचें वचन देऊन तो तिला गप्प बसवितो. धनेश्वराचें मालतीशीं लग्न ह्या चमत्कारिक गोष्टीमुळें सर्वांचें लक्ष बारीकसारीक गोष्टींकडे नाहीं असें पाहून घनश्यामानें अंदाजानें सांगितलेल्या खाणाखुणांवरहुकूम तो धनेश्वराचे कागद चोरतो. इंदूचें लग्न होणार ह्या मत्सरानें त्याच्या पाळतीवर असलेल्या विंदूला, हा आंधळा वाचतो कसा ? हा चमत्कार उलगडतो. धूर्तपणानें तिलाही थाप मारून लग्नाचें वचन देतो व ही गोष्टही गुप्त राखतो. त्यानें दिलेले कागद त्याच्या भीतीनें घनश्याम स्मशानांत नेऊन पुरतो, व एक हिरवा दगड खुणेकरितां ठेवून उपयोगीं पडण्याकरितां एक खोटी हुंडी घेऊन निघून जातो. तिच्या जोरावर धनेश्वराला आपल्या म्हणण्याप्रमाणें सर्व गोष्टी करावयास लावण्याचा शेवटचा आघात करण्यापूर्वी तो एकदां लतिकेची गांठ घेऊन तिची आपल्याशीं लग्न करण्यास संमती आहे कीं नाहीं हें तो पाहातो. सदर गोष्ट ती अमान्य करील ही त्याला खातरीच होती. परंतु, " उद्यां तुम्ही मला मागणी घालाल ! " ह्या तिच्या शब्दांची तिला आठवण देऊन

" ती उतावळी उद्यां आजच उगवली आहे " हें त्याला दाखवावयाचें होतें. अर्थात् त्याला लतिका झिडकारते. नंतर तो धनेश्वराकडे जातो. तेथें तो कागदांच्या शोधांतच असतो. एक खोटी हुंडी घनश्यामाजवळ आहे त्याअर्थी बाकीचेही तसले कागद त्याजजवळच असले पाहिजेत ह्याचें त्याला अनुमान होतेंच. पाप लपवून भोंदूपणानें मिळविलेली अब्रू राखण्याकरितां घनश्यामानें सांगितल्याबरहुकूम सर्व गोष्टी करण्यास तो तयार होतो. मालतीला दिलेलें वचन मोडून तिच्याशीं आपला व घनश्यामाविरुद्ध तक्रार करण्यास आलेल्या लतिकेचा घनश्यामाशीं विवाह घडवून आणणार असल्याचें तो निश्चितपणें सांगतो. धुंडीराजासारख्याच त्याच्या त्रागा करण्यानें लतिकेस कांहीं सुचेनासें होऊन घनश्याम ह्मणेल तें ऐकून घ्यावें लागतें. आपल्या मनाविरुद्ध गोष्टी करण्यास घनश्याम आपणांस भाग पाडीत आहे हें पाहून त्याचे बेत हाणून पाडण्याकरितां धनेश्वर आत्महत्या करण्याचें ठरवितो व मालतीची भेट घेऊन ती आपल्याशीं लग्नाला कां तयार झाली वगैरे गोष्टी काढून घेऊं पाहातो व लतिकेनें केव्हां तरी घनश्यामाला दुखविलें असावें ह्मणून तो सर्वांना दुःखांत लोटण्यास तयार झाला आहे असें तिला सांगतो व आपल्या आत्महत्येचा बेत तिला कळूं न देतां तिच्याशीं विवाह करणार नसल्याचें पुन्हा तिला आश्वासन देऊन, लतिकेची काळजी घेण्यास विनवितो. त्याच्या बोलण्यावरून आत्महत्येचा संशय येऊन ती लतिकेला तिच्या फटकळपणाबद्दल दोष देते व त्यामुळें काय अनर्थ ओढवले व ओढवणार आहेत ह्याचें स्वरूप तिच्यापुढें उभें करिते. आप्तांच्या सुखाकरितां आपल्या अपराधाचें प्रायश्चित म्हणून ती घनश्यामाला बोलावून त्याच्याशीं विवाहास तयार असल्याचें सांगते व बाकीच्यांना क्षमा करण्याबद्दल विनविते. जी गोष्ट हक्कानें मिळणार त्या गोष्टीची देणगी स्वीकारण्याचें व आत्मयज्ञाच्या समाधानाचें सुख तिला लाभूं देण्याचें तो नाकारतो. महेश्वराच्या भीतीनें स्मशानांत व तेही एका हिरव्या दगडाखालीं पुरून ठेवलेल्या कागदांत जवळची

हुंडी ठेवण्याच्या निमित्तानें तो स्मशानांत जाऊन ती ठिकाणीं ठेवतो. परंतु त्याच्या पाळतीवर असलेला मनोहर आपली प्रतिमा पुरण्याच्या निमित्तानें हिरव्या दगडाच्या विशिष्ट खुणेजवळच येतो व त्याला तें कुलंगडें उलगडतें. प्रभाकरादिकांनीं पसरलेल्या जाळ्यांत धनेश्वराला आत्महत्येपासून परावृत्त करण्यास खोट्या पोलिसवेषांत येऊन तो खऱ्या पोलिसांकडून पकडला जातो. परंतु धुंडीराजाचा खोटा कबुली जवाब पुढें करून त्याला अडकवीत असतां धुंडीराज तो कागद फाडून टाकतो व शुध्द दयेपुढें निरपेक्ष आपला अहंकार व दुष्टपणा टाकून तो लीन होतो.

(३)पहिलें उपकथानक

लतिका–प्रभाकर व मालती–मनोहर यांचें संविधानक घनश्यामाच्या खालोखाल महत्वाचें आहे. तीं परस्पर प्रेमभावानें बद्ध झालेलीं आहेत. त्यांच्या विवाहाला त्यांच्या पालकांची पूर्ण संमती मिळेल अशी त्यांना खातरी आहे. पण त्यांच्या त्या परस्परानुरागाची माहिती मात्र धुंडीराज व धनेश्वरांना नाहीं. तसें असतें तर धुंडीराज तरी निदान घनश्यामाला मालतीची संमती घेण्यास आणताना. धनेश्वराची लोभी वृत्ती व सतरा कुलंगडीं जमेस धरलीं नाहींत; त्या बाबतींत तरी वरील गोष्ट निःसंशय सिद्ध आहे. आपले विवाह कसे व केव्हां घडवून आणाव-याचे हें जरी ह्या जोडप्यांमध्यें ठरलें नसलें तरी ते खास घडून येणार ह्यामुळें ते स्वस्थ असून एकमेकांवर कोट्यांचा भडिमार व इंदूबिंदूच्या काळ्या कुरुप-पणावर टीका करण्याचा कार्यक्रम सुरू आहे, तोंच मालतीला मागणी घालण्याचा घनश्यामाचा घाला त्यांजवर पडतो. घनश्यामानें ही गोष्ट नुसती मनांत आणणें सुद्धां ज्यांना मूर्खपणाची वाटते त्या लतिका-प्रभाकरांनीं त्याच्या असतील नसतील त्या गोष्टी उकरून काढून त्याची हेटाळणी केली. मागणी घातली हा त्याचा मूर्खपणा झाला असें त्याला उपाहासपूर्वक वाटावयास लावतात. लतिका म्हणते, “ तुम्ही आमचे नोकर, मालती माझी मैत्रीण...जा मालतीच्या

लग्नाच्या वेळीं तुम्हाला हजर रहावें लागेल तें नवरदेव म्हणून नव्हे, तर लग्नाच्या सामानाची यादी करण्याकरितां." तो गेल्यानंतर मालतीनेंही इतक्या सौम्यपणानें त्याच्याशीं वागावयास नको होतें अशी तिची थट्टा करतात. व त्याच ओघांत लतिका-प्रभाकरांचा परस्परांवर कोट्यांचा भडिमार सुरू होतो. शेवटीं लतिका गेल्यावर ह्या भांडणाचा शेवट कसा होणार ह्याचें प्रभाकरास गूढ पडतें. परंतु मनोहर त्याला सांगतो, "तुम्हां दोघांची एकच चूक होते; मनुष्यस्वभावाच्या मुख्य मुख्य गोष्टींत भिन्न मतांची मिळणी झाल्यावर परस्परांचा क्षुद्र विषयांवरचा मतभेद मनावर न घेण्यानेंच प्रेमाचा परिपोष होतो. क्षुल्लक बाबतींत पटेनासें झालें म्हणजे एकदम प्रेमाची कसोटीच पाहूं लागणें हा फारच मोठा अविचार आहे. या दृष्टीनें मार्गक्रमण करूं लाग म्हणजे पांच अंक मोजण्याच्या आंत तुझ्या दृष्टीस पडेल कीं ही एक कॉमेडी आहे म्हणून" (पान ३९). पुढें धनेश्वराचें एक निराळेंच कारस्थान चालूं असतें. स्वतःचा गळा भागीदाराच्या कचाटींतून सोडविण्यासाठीं आपल्या मुलीचा—लतिकेचा—गळा त्याच्या मूर्ख मुलाच्या-मोरेश्वराच्या--सौभाग्यसूत्रांत गुंतविण्याचा प्रयत्न करावा असा विचार करीत असतो. ह्या दुसऱ्या आघाताचा मात्र ह्या जोडप्यावर परिणाम होतो. लतिका या बेताला विरोध करेल म्हणून तिचें शिक्षण व प्रभाकरादिकांची संगत इतकेंच काय परंतु मराठी बोलणारांचा संबंध सुद्धां सुटावा म्हणून मराठी येत नसेल अशा माणसांचा संच तयार करण्याबद्दल घनश्यामाला सक्त हुकूम सुटतो. हेंही खूळ लवकरच दूर होईल अशा विचारानें लतिका बेफिकीर असते. परंतु प्रभाकर लतिकेकरितां आपल्या मतांत 'केंसभर फरक' करणार नव्हता, तो तिच्या "प्रेमावांचून परदेशी होण्यापेक्षां प्रेमाकरितां परदेशी" होऊन "केंसांचें जंजाळ बांधून" वृध्द कानडी वेषानें धुंडीराजाच्या घरांत महेश्वराबरोबरच शिरतो. धनेश्वराला मालती देवविण्याच्या घनश्यामाच्या कारस्थानाला रंग येऊन

तिसरा जोराचा आघात ह्यांच्यावर बसतो. धुंडीराजानें घनश्यामाच्या भीतीनें या बाबतींत आपल्या निश्चयाखेरीज दुसरा कोणताही सुगावा लागूं दिला नाहीं परंतु तो लावण्याचा प्रयत्नही कोणी करीत नाहीं. धुंडीराजानें ह्या बाबतींत इतका त्रागा कां करावा हें गूढ उकलण्यासारखें त्यांनां वाटलें नाहीं. येथें लागूं न पडणाऱ्या प्रभाकर व लतिका यांच्या बालावृद्धविवाहाच्या कोट्या संपल्यानंतर प्रभाकर धनेश्वराची खोड मोडण्यास सिद्ध होतो. परंतु धुंडीराज ह्या गोष्टीतही त्रागा करतो. तरी पण कोणासही ठाऊक नसलेल्या वेषांतराच्या साहाय्यानें धनेश्वराची खोड मोडण्याचा बेत आपल्याशीं करतो. पण तसेंही कांहीं घडून आलेलें नाटकांत दिसत नाहीं. आपल्या बापाचा धनेश्वराला आपणास देण्याचा निश्चय ऐकूनसुद्धां मालती मनोहराला विवाहाचें वचन देते. नंतर ती धुंडीराजाची निर्भर्त्सना करते. प्ररंतु तो तिला घनश्यामाच्या हातीं आलेल्या कागदाबद्दल व त्यानें घातलेल्या धमकीबद्दल सर्व कांहीं सांगतो. त्याबरोबर ती बापाकरितां व भांवडांच्या सुखाकरितां आत्मयज्ञ करण्यास तयार होते. धैर्यानें दुःख भोगण्यास तयार होतांना ती त्याचा आशीर्वाद मागते व मनोहराची भेट घेण्याची परवानगी मागते. मनोहराला त्याच्या चित्रारुह प्रेम त्याला परत करून त्याला आपण असें कां करतों याचा उलगडा पडूं न देतां त्याचा शाप मागते. तिच्या सहवासावांचून जगांत त्याला दुसरें सुख नसल्यामुळें आपल्या वाट्यास असलेले भावी सुखाचे क्षण तिला लाभावेत म्हणून तो ईश्वराची प्रार्थना करतो. कोट्यांच्या देवघेवींत एकमेकांचीं तोंडें न पाहण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या लतिकेला धनेश्वराशीं भांडतांना प्रभाकराच्या सहाय्याची अपेक्षा वाटते. ती म्हणते. 'मालती, मला आतां प्रभाकरांची आठवण होते... ...कुठून त्यांच्याशीं भांडलें असें झालें आहे. मला......बाबांशीं असेल नसेल तितकें कठोर बोलून टाकतांना प्रभाकरांनी मला कितीतरी धीर दिला असता?'' ह्या तिच्या प्रभाकराच्या भेटीच्या उत्सुकतेच्या उद्गारांत व मालतीकरितां

लतिकेसारख्या भावी वधूलाही दुखवितांना प्रभाकरानें काढलेले उद्गार ह्यांत ह्या जोडप्यांच्या प्रेमाचा प्रतिकूल परिस्थितींत कसा परिपोष होत आहे हें दिसतें. ह्याच वेळेला पलीकडे लतिकेच्या हुकमानें बृहत् योगवासिष्ठाचीं पानें चाळीत बसलेला गिरसाप्पा हाच प्रभाकर हें आपणांस कळते, परंतु लतिका-मालतीला कळत नसल्यानें प्रासंगिक हास्यरस येथें उत्पन्न होतो. तो प्रगट होऊन उडालेल्या लतिकेच्या धांदलीनें त्यांत भरच पडते. परंतु आपली इच्छा ह्याला कळली ह्या फजीतीनें वरकरणी रागानें ती त्याला टाकून बोलते व तोही प्रत्युत्तरें देतो. इतक्यांत धनेश्वर आल्यानें तो त्याच्या दृष्टीस न पडतां निघून जातो. मालतीच्या समक्षच लतिका आपल्या बापाची खूप निर्भर्त्सना करते. शेवटीं आपल्या प्रेमळ व फुलपांखरासारख्या आनंदी मुलीला दुखवूं नये म्हणून मालतीशीं लग्न न करण्याचें तिला शपथेवर सांगतो. नंतर "लतिकेची खोड मोडण्याकरितां प्रभाकर ऊर्फ गिरसाप्पा बिंदूशीं लग्न करण्याचा बाहाणा करतो. त्यांत त्याला महेश्वर–कामण्णा–आंधळा नसल्याबद्दल व त्याला मराठी बोलतां येत असल्याबद्दल बातमी लागते. धनेश्वराचा नवा निश्चय मालतीनें सांगितल्यामुळें त्याला लतिकेशीं असला डाव खेळण्याइतका स्वस्थपणा लाभतो न लाभतो तोंच, "हा काय घोंटाळा आहे" असा त्याला प्रश्न पडतो. मनोहराला ह्या बाबतींत सावध करून या सर्व दुःखदायक घोंटाळ्याच्या मुळाशीं घनश्याम असावा असें वाटून, त्याला घनश्यामाच्या पाळतीवर प्रभाकर ठेवतो. प्रभाकराच्या डोळ्यांत अंजन घालण्याकरितां लतिका कामण्णावर प्रेम करण्याचा आव घालते. यामुळें फसून महेश्वर मात्र तिला पुढें चांगलें साह्य करतो. ह्याच वेळीं घनश्याम तिच्या शब्दांची आठवण देऊन तिला मागणी घालतो. ह्या उर्मटपणाबद्दलची तक्रार करावयास ती धनेश्वराकडे जाते तोंच तिला घनश्यामाचे शब्द खरे झाल्याचें दिसून येतें. ती ज्याचा तिरस्कार करते त्या घनश्यामाशीं विवाह करण्यास तयार होण्यास तो

तिला सांगतो. त्याबरोबरच तो स्वतः पहिलें वचन मोडून मालतीशीं लग्न करणार असल्याचें तिला समजतें. तो गेल्यानंतर ती घनश्यामाला तिचें प्रेम प्राप्त होणार नाहीं असें सांगते परंतु त्याला त्याची काय पर्वा ? तो बोलेल तें, तिचे परत केलेले शब्द तिला ऐकून घ्यावे लागतात. धनेश्वरास दाखविण्यास आणलेली खोटी हुंडी परत ठेवण्याकरितां स्मशानांत गेलेल्या घनश्यामाच्या मागोमाग गेलेला मनोहर विचार करीत भटकत असतां त्याला एक हिरवा दगड दिसतो. तो भूगर्भशास्त्राचा विद्यार्थी असल्यानें उत्सुकतेनें त्याकडे पाहूं लागतो. परंतु संपादन केलेल्या ज्ञानाचा संसारांतील सुखाकडे ह्यापुढें उपयोग होणार नसल्यानें तो नाद सोडतो व त्याखालीं मालतीनें परत केलेली आपली प्रतिमा पुरून ठेवण्याचा विचार करतो. तेथें त्याला घनश्यामानें पुरून ठेवलेला खोट्या कागदांचा डबा सांपडतो. तो घेऊन तो प्रभाकराकडे जातो. धनेश्वर आत्महत्या करणार ह्या बातमीनें व मालतीच्या कानउघाडणीनें सावध होऊन आपला अपराध आहे असें समजून, या संकटांतून कसें सुटावें याचा लतिका विचार करिते. ज्याचा मनापासून तिरस्कार केला त्याच घनश्यामापुढें "नम्र कशी होऊं व स्वाभिमान कसा सोडूं ?" या मनोविचारांच्या कलहांत आप्तांच्या सुखाकरितां तीं आत्मयज्ञ करण्यास व स्वाभिमान सोडण्यास मालतीसारखीच तयार होते. परंतु आप्तांच्या सुखाच्या मोबदल्यांत तिच्या या आत्मयज्ञाची घनश्यामाला आतां किंमत राहिली नसल्यानें तो तें नाकारतो. हताश व दीन झालेली लतिका आत्मदानाच्या तेजानें प्रकाशते. ज्याचा अपराध केला त्याची क्षमा मागितल्यानंतर तिला परमेश्वराजवळ क्षमा मागण्याचा अधिकार पोहोंचतो. करुणस्वराला उत्तर देण्याकरितांच कीं काय प्रभाकर तेथें येतो. घनश्यामाशीं विवाह ठरल्यामुळें प्रभाकराची क्षमा मागून त्याच्याशीं आपला विवाह होऊं शकत नाहीं असें ती त्याला सांगते. धनेश्वराच्या कुलंगड्यांमुळें मोरेश्वराशींच तिचें लग्न होणार असें त्याला अजून

३२८४

वाटतें. इतक्यांत तिच्या बोलण्यांत " घनश्यामानीं बाबांना काय दहशत घातली आहे कोण जाणे ? " असें येतें. त्या वेळीं या सर्वांच्या मुळाशीं घनश्याम आहे अशी त्याची खात्री होते. गवयी कामण्णाला—घनश्यामाच्या हस्तकाला—हस्तगत करून हें कारस्थान हाणून पाडावें असा विचार ठरतो. पूर्वीच्या लतिकेच्या खोट्या सलगीला घनेश्वर फसतो व घनश्यामाचें सर्व कारस्थान त्यांना सांगतो. खोट्या पोलिसवेषांत हिंडणें हा गुन्हा आहे झणून त्याला या वेषांत तर आणावा परंतु तो कोणत्या निमित्तानें ? हा विचार येतो न येतो तोंच धनेश्वरानें मृत्युपत्र केल्याचें व तो रात्रीं आत्महत्या करणार म्हणून त्याच्या पाळतीवर राहाण्यास लतिकेला सांगण्यास मालती येते. ही आत्महत्या घनश्याम खास थांबविण्याचा प्रयत्न करील, कारण धनेश्वर घनश्यामाच्या हातांतून मृत्युमुखांत पडला कीं घनश्यामाच्या कारस्थानाचा डोलारा धडाडलाच. ह्याकरितां खोट्या पोलिसवेषांत तो खास येणार, परंतु त्या वेळीं त्याला खऱ्या पोलिसाच्या स्वाधीन करावें तर तो धनेश्वराचे खोटे कागद बाहेर आणणार ! परंतु ह्याही वेळीं दैव, ते खोटे कागद सांपडलेल्या मनोहराच्या रूपानें त्यांचे मदतीस धांवून येतें. ते सर्व कागद बरोबर आहेत व एकही घनश्यामाजवळ शिल्लक नाहीं ह्याची खात्री महेश्वर देतो. महेश्वराच्या साहाय्यानें घनश्यामाला खोट्या पोलिसवेषांत आणण्याचें ठरतें व हाही शेवटचा प्रसंग त्यांच्या इच्छेप्रमाणें यशस्वी होतो. आपल्या साक्षीनें घनश्याम अडकूं नये असें धुंडीराजाला वाटतें. म्हणून त्यानें स्टेशनवर लिहून दिलेला कबुलीजबाब प्रभाकर फाडून टाकतो.

प्रेमकल्पनांनीं बहकलेला विवाहेच्छू महेश्वर आणि कुरूपपणानें व जबाबदार माणसांच्या अभावीं स्वतःचे लग्नाची तजवीज स्वतःच करणें भाग पडलेल्या इंदूबिंदू यांचें विनोदी कथानक हें दुसरें उपकथानक होय. उपकथानक म्हणण्याचें कारण इतकेंच कीं महेश्वराला लग्न घडून येईपर्यंत घनश्यामाच्या तंत्रानें वागून आपली चोरी उघडकीस न येण्याकरितां इंदूबिंदूंशीं समयसूचकतेनें डावपेंच लढवावे लागतात. प्रमुख पात्रांशीं संबंध आल्यानें परस्पर कथानकांना उठाव मिळतो. घनश्यामाच्या पहिल्या भेटींत महेश्वर स्वतःला "हीरो" म्हणवितो. परंतु "या कपटनाटकांत चांगला उपयोग करून घेण्यासाठीं मी या विनोदी पात्राची योजना केली आहे," असें घनश्याम म्हणतो. आपण मोरेश्वर आहों असें धुंडीराजाला भासवून त्याच्याजवळ दागिने ठेवून त्याच्यावर किटाळ आणण्यांत घनश्यामाला ह्याचा पहिला उपयोग होतो. नंतर कानडी वेष व आंधळेपणा पत्करून तो धनेश्वराच्या घरांतील आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळांत सामील होतो. धनेश्वराचे कागद चोरून घनश्यामाचें काम पार पाडतो. नंतर घनश्याम ह्याची मुळींच पूसतपास करीत नाहीं. धनेश्वराचें मालतीशीं लग्न, या आश्चर्यकारक गोष्टींच्या श्रवणानें विस्मयाच्या भरांत इंदूशीं तो मराठींत बोलतो व या चुकीबद्दल तो तिच्या तडाक्यांत सांपडतो. परंतु तिला लग्नाचें वचन देऊन तिचें तोंड बंद करतो. नंतर धनेश्वराचे कागद चोरीत असतां बिंदू नामक साडेसाती त्याला घेरते. नुसतें मराठी बोलणें हा वास्तवीक धनेश्वराच्या घरांत राजद्रोहापेक्षांही भयंकर गुन्हा. परंतु या वेळीं तर मराठी कागद चोरणें, डोळे उघडणें व ते वाचणें, हें त्याहूनही भयंकर. तरी तेही 'केवळ नजरचुकीचे' व 'सात्विकस्वरूपाचे' आहेत अशी तिची तो समजूत घालतो.

(४) दुसरें उपकथानक

लग्नाचें कोठेंच जमत नाहीं म्हणून कामण्णाला तरी विचारून पाहावें म्हणून आलेल्या इंदूला तो अचानक गुन्ह्यांत सांपडतो व अनायासेंच त्याचे गुह्य

फोडण्याच्या धाकानें तो तिच्याशीं लग्नाला तयार होतो. याच मत्सरानें बिंदूही त्याजकडे येते व त्या वेळीं तो चांगलाच गोत्यांत आलेला असतो. परंतु " इंदूला वचन दिलें त्या वेळीं उदरनिर्वाहाची सोय व्हावी म्हणून ही चोरीची कल्पना आपण काढली व ती आतां तुझ्या उपयोगीं पडणार, " असें तो तिला सांगतो. कागद हरवलेले सांपडून देणारास कांहीं तरी बक्षीस धनेश्वर देणारच. अर्थात् आपणच ते नेऊन दिले तर आपणांसच तें बक्षीस मिळणार या "सात्विक" कल्पनेनें आपण कागद चोरले असें सांगून तो तिच्या डोळ्यांत धूळ टाकतो. इतकेंच नव्हे तर " कागद चोरण्याची व डोळ्यांनीं दिसण्याची गुप्त गोष्ट इंदूला समजूं देऊं नकोस, नाहीं तर सर्वच फिसकटेल " अशी तिला तो दहशत घालतो. मराठी बोलण्याची गुप्त गोष्ट ठाऊक असल्यानें तिला सध्यां दुखवूं नये असेंही तो सुचवितो. पुढील एका प्रसंगांत जेव्हां दोघींही त्याला भेटतात तेव्हां दोघींनाही तो थापा मारतो. बिंदूला त्याचा त्यामुळें विश्वास वाटत नाहीं व ती गिरजाप्पाला लग्नाबद्दल विचारते. तो तिला विचारतो " आपला प्रेम त्या गायकाला असतो. तो पुनरपी येतो तर आपण आम्हांस वचन मोडतो. " विश्वास येण्याकरितां ती त्याला सांगते कीं तो गवई अंधळा नसून मराठी चांगलें बोलतो. परंतु इतक्यांतच त्याची आशा सोडण्यांत दूरदर्शीपणा नाहीं असें वाटून त्यानें कागद चोरल्याचें मात्र सांगत नाहीं. इंदूबिंदूंच्या तडाक्यांत सांपडलेल्या महेश्वराला घनश्यामानें इकडे केवढा गोंधळ माजविला आहे हें पाहाण्यास फुरसतच सांपडत नाहीं. लतिकेच्या आभासाला फसून घनश्यामाच्या मध्यस्तीची जरूरी राहिली नाहीं असें त्याला वाटतें. पुढें लतिका त्याची सर्व माहिती काढून त्याची मदत घेण्याकरितां जाते व त्याला सर्व सांगते त्यावरोबर घनश्यामानें आपणांस कसें फसविलें व इंदू-बिंदूंनीं कसा गळा कापला हें त्याला कळून येतें. सत्पक्षाला मदत करण्यास मात्र तो तावडतोब तयार होतो. त्या आधारानें

तो इंदूबिंदूला झिडकारतो व घनश्यामाला खोट्या पोलिस वेषांत आणण्याची तजवीज केल्याची वातमी लतिकेला सांगतो. संविधानक कसें संपलें हें सांगण्याचें काम नाटककर्त्यांनीं महेश्वराकडून करविलें आहे.

(५) कथानकांचा परस्परांशीं संबंध

ह्या तीन्ही कथानकांचा परस्परांशीं संबंध व मुख्य कथानकाचा परिपोष कसा होतो हें दाखविल्याखेरीज हें विवेचन पुरें होत नाहीं. लतिकेचा नक्षा उतरविण्यासाठीं घनश्यामाची धडपड आहे. त्याकरितां तिचा ज्यांच्याशीं संबंध आला त्या व्यक्तींच्या मालती–धनेश्वर व मालतीकरितां धुंडीराज यांच्या सुखाचा नाश करण्यास सिद्ध होतो. त्याला प्रथम धुंडीराजाकडून सर्व पात्रांच्या स्वभावाची माहिती मिळते त्यांत त्याच्या अनुभवाची भर असतेच. धनेश्वर स्वतःच्या खोट्या हुंड्यांच्या रूपानें जमा केलेल्या पापाला भिऊन वांकड्या मार्गांत शिरत आहे हें त्याचें दुसरें साधन. तिसरें महेश्वरासारख्या प्रेमवेड्याच्या हातून आपलें काम हमखास घडून येईल ही खात्री. या तीन साधनांच्या जोरावर तो आपल्या कारस्थानाचा व्यूह रचतो व एकदम कामाला सुरवात करतो. इतर पात्रें एकामागून एक होणाऱ्या त्याच्या आघातांनीं भांबावून किंकर्तव्यमूढ होतात. तीं त्याच्या कार्यकक्षेंत फिरतात, परंतु तीं इतक्या सफाईनें कीं आपण स्वतःच्या गतीनें फिरतों कीं एखाद्या बलवान् ग्रहाच्या आकर्षणानें फिरतों हें त्यांना कळत नाहीं. पहिल्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशानंतर मालती, प्रभाकर, मनोहर यांच्याशीं त्याचा संबंध येत नाहीं. शेवटचीं दोन पात्रें अस्तित्वांत आहेत कीं नाहींत याची त्याला खातरही नसते. तसेंच धुंडीराजाकडून मालती धनेश्वराला देण्याचें वचन घेतल्यानंतर त्याच्याशींही त्याचें काम रहात नाहीं. प्रथम धुंडीराज, नंतर धनेश्वर हीं चक्रें सुरू केल्यानंतर सर्व पात्रें त्यांत गुरफटलीं जातात. लतिका–मालतीचे विवाह दुसऱ्या कोणाशीं व्हावयाचे असोत कीं नसोत आपण सांगूं त्याप्रमाणें त्यांची तजवीज झाली

पाहिजे या घनश्यामाच्या इच्छेचा एकासारखा विजय होत जातो. प्रभाकर—मनोहरांचें साह्य असून सुद्धां लतिका—मालती निःसहाय होतात. यामुळें घनश्यामाच्या तडफदार कर्तृत्वाचा किती जोर आहे हें कळून येतें व त्या मानानें प्रभाकर नुसता वाचिवीर आहे हें दिसून येतें. उलट घनश्यामाचें कारस्थान, या जोडप्यांच्या प्रेमाची कसोटी लावण्यास व प्रभाकर लतिकेच्या उच्छृंखलपणास आळा घालण्यास कारणीभूत होतें. त्यांचें प्रेम, वैषयिक अगर स्वार्थी नसून शुद्ध व पवित्र होतें असें दिसून आलें. सर्वजण कर्तव्याकरितां आयुष्यांतील आत्यंतिक सुखावर पाणी सोडण्यास तयार झाले. अशा रीतीनें तावून सुलाखून तें लाभल्यानें त्याची किंमत व लज्जत अर्थात् जास्त झाली व जशी त्यांना त्यांच्या शत्रूनें मिळवून दिली तशी त्यांनींही आपल्या शत्रूला धुंडीराजातर्फे शुद्ध व निरपेक्ष दया कशी असते हें पाहण्याची संधी दिली. अशा रीतीनें परस्परांच्या विरोध कृती परस्परांना उपकारक झाल्या. दुसऱ्या उपकथानकांतील महेश्वरानें घनश्यामाच्या कपटनाटकांत विनोदी पात्राचें काम तर केलेंच. पण घनश्यामाकरितां कागद प्रत्यक्ष चोरतांना विंदूनें पकडलें असतां समयसूचकतेनें थापा मारून शर्विलकाचें व मैत्रेयाचें काम बेमालुम पार पाडलें. तोच जर कच्चा असता अगर विनोदी पात्राचें काम त्याच्याकडे नसतें तर या लबाड माणसाचें बिंग तेव्हांच बाहेर फुटलें असतें, व घनश्यामाच्या कारस्थानाला निराळेंच स्वरूप आलें असतें. घनश्यामाची कृती मात्र माकडानें मांजराच्या पंजानें आगींतली भाकरी काढून घेण्यासारखी झाली. ज्या लतिकेच्या आशेनें तो घनश्यामाचा साथीदार झाला व त्याच्याकरितां कागद चोरून इंदूबिंदूंच्या पहाऱ्यांत त्यानें अनिश्चित अज्ञातवास पत्करला त्या लतिकेशीं घनश्यामानें स्वतःचा विवाह घडवून आणण्याचें कारस्थान जवळ जवळ यशस्वी केलें. महेश्वराची उपेक्षा व त्याच्या भीतीनें कागद स्मशानांत नेऊन पुरणें ह्या गोष्टींमुळें त्याचें कारस्थान ढांसळलें. याप्रमाणें

हे पूर्वी मित्र असलेले महेश्वर व घनश्याम नंतर एकमेकांच्या नाशाला कारण होतात. उलट पहिल्या व दुसऱ्या उपकथानकांतील प्रमुख व्यक्ती परस्परांबद्दल वास्तविक उदासीन असतात. असें असून महेश्वर धुंडीराजापासून खोटा कबुलीजबाब लिहून व धनेश्वराचे कागद चोरून त्यांचें शत्रुत्व संपादन करतो. नंतर लतिका-प्रभाकरांच्या प्रेमकलहांत कामण्णाच्या थापबाजीला कंटाळलेल्या बिंदूवर प्रेम करण्याचा प्रभाकर बहाणा करतो व लतिकेच्या मनांत असूया उत्पन्न करूं पाहातो. तोच उपाय अमलांत आणून लतिका कामण्णाला भुरळ घालते. अशा रीतीनें या उपकथानकांतील प्रमुख पात्रांचा जोडला गेलेला परस्परोपकारी सांधा, मुख्य कथेंतील घनश्यामाचें कारस्थान उलथून पाडण्यास कारण होतो. यामुळें वरवर दृष्टी टाकतांना बाष्कळ वाटणारे हे तिसऱ्या अंकांतील चौथा व पांचवा असे दोन प्रवेश फार महत्वाचे आहेत. पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशापर्यंत कथानकाचा एकच ओघ दृष्टीस पडतो. धुंडीराज, धनेश्वर, मालती, लतिका, प्रभाकर व मनोहर हींच प्रमुख पात्रें असून घनश्याम दुय्यम असावें असें वाटतें. चौथ्या प्रवेशांत घनश्यामाच्या पत्रामुळें महेश्वर आल्यानें घनश्यामाच्या कारस्थानाच्या कथानकाचा उगम होतो. त्यांतच शेवटीं आपलें स्वरूपाविष्करण करून आपल्या ओघाची दिशा दाखवितो व महेश्वराच्या कथानकाचा उगम उत्पन्न करतो. पहिल्या ओघाचें तसें कांहींच कळत नाहीं. दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत महेश्वराचा धनेश्वराच्या घरांत प्रवेश करून देण्यापुरता घनश्याम पहिल्या ओघांत मिळाल्यासारखें दाखवितो. परंतु त्याच प्रवेशाच्या शेवटीं धनेश्वराशीं बोलतांना व त्याच्याकरितां वधूबद्दल वाटाघाट करितांना तो आपलें स्वतंत्र अस्तित्व प्रगट करतो. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष लतिकेच्या मैत्रिणीचें-मालतीचें-नांव धनेश्वराच्या पसंतीकरितां बेधडक मांडून तो त्याची संमति घेतो, व बाकीच्यांवर मात करतो. त्यानंतर मात्र त्याच्या कथानकाचा ओघ स्वतंत्र व जोरदारपणें शेवटपर्यंत वाहात राहतो. याच प्रवेशांत महे-

श्वराचा प्रवेश झाल्यानें घनश्यामाच्या शेजारानें उत्पन्न झालेला तिसरा लहानसा प्रवाह मूळच्या प्रवाहाला भेटतो व पुन्हा स्वतंत्रपणें वाहतो. घनश्यामाचें काम पार पाडण्यापुरता तो त्याच्याजवळ जातो, परंतु इंदूबिंदूंच्या संसर्गानें दूषित झाल्यानें बहुतेक दूर लोटला जाऊन स्वतंत्रपणें परंतु दोहोंच्या मधून वाहात जातो. तिसऱ्या अंकाच्या चौथ्या व पांचव्या प्रवेशांत वर दाखविल्याप्रमाणें पहिल्या उपकथानकाच्या जवळ येतो व मुख्य कथानकालाही जवळ आणूं पाहातो. यापुढें या दोन्ही प्रवाहांचे ओघ वाह्यतः वेगळे राहून घनश्यामाच्या ओघाला उतरण लागण्याची जणूं काय वाट पाहात चौथ्या अंकाअखेर तसेच वाहातात. आतां घनश्याम कड्याखालीं खास कोसळणार अशी खात्री होतांच पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत महेश्वर इंदूबिंदूंना उघडपणें झिडकारतो. प्रवाहांची उपेक्षा पुढें चालवावयाची तर असें म्हणतां येईल कीं, हे दोन्ही प्रवाह एकमेकांच्या संघटित सामर्थ्यानें प्रतिस्पर्धी प्रवाहाला कड्याखाली लोटून खड्डा भरून काढून त्यावरून इष्ट स्थळीं पोहोंचण्याकरितां त्याचा जोरानें पाठलाग करितात आणि शेवटच्या प्रवेशांत त्यांत यश मिळवून गिरसप्पाच्या धबधब्याचें दृश्य स्वरूप आपल्यापुढें उभें करितात. धो धो वहात गर्जना करीत घनश्यामाचा प्रवाह धुंडीराजाच्या महनीय स्वरूपापुढें नम्र होऊन कड्यावरून खालीं पडत आहे; लतिका-प्रभाकर-मालती-मनोहराच्या रूपानें निरनिराळें तरंग, लाटा व रंगीबेरंगी शोभा त्याच्या अधःपाताचा व आपल्या विजयाच्या आनंद अनुभवीत आहेत; महेश्वरासारखे तुषार हास्यरसाचे फवारे उडवून आनंदानें थैमान घालीत आहेत; गोकाकच्या धबधब्याची ही शोभा पहात असतां व आनंद अनुभवीत असतां त्याचें प्रचंड व भयानक स्वरूप कांहीं गंभीर विचारही उत्पन्न केल्याशिवाय रहात नाहीं, तसाच हा घनश्यामाचा अधःपात, " विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः " असल्या एखाद्या गंभीर विचाराचा धक्का वाचक—प्रेक्षकांना दिल्याशिवाय रहात नाहीं.

## —: ३ स्वभावविवेचन :—

अगदीं पहिल्या प्रवेशांत धुंडीराजानें आपल्या शाब्दिक पाल्हाळांत 'सर्व पात्राची अगदीं सुरेख रीतीनें ओळख करून दिली आहे. त्याच्या स्वतःच्या स्वभावाचेंही यथार्थ वर्णन शद्बांनीं व कृतीनें त्यानें करून दिलें आहे. धनेश्वराची ओळख करून देण्याचे कार्य घनश्यामाने केलें आहे. परंतु घनश्यामाची ओळख करून घ्यायला माल आपल्याला सर्व नाटक उलथें पालथें केलें पाहिजे. त्याच्या पहिल्या ओळखीपासून अखेरपर्यंत प्रत्येक कृतीचा व विचाराचा मेळ घातल्याखेरीज त्याच्या खऱ्या स्वरूपाचा थांग लागत नाहीं. अगदीं पहिल्या प्रवेशांत तो या नाटकाचा सूत्रचालक व दुर्नायक असेल असें वाटत नाहीं येथें तो फक्त मालतीला मागणी घालून धुंडीराजाचा रुकार मिळविण्याकरितां उतावीळ झाला आहे. तो विद्यावान् आणि धनवान्, सद्गुणी अगर दुर्गुणी आहे कीं काय याचा विचार धुंडीराजाला पडलेला नाहीं. उलट असलें स्थळ मिळत असल्याबद्दल त्याला आनंद वाटत आहे असें दिसतें.

(१) घनश्याम

"घनश्यामः—माझ्या भाग्यशाली आशेला आपल्या आशीर्वादाचें बळ मिळेल कां ? (पान १२ )." "धुंडीराजः—घनश्याम, काय, म्हणता काय तुम्ही हें ? वाः, असें स्थळ म्हणजे—"

दुसऱ्या प्रवेशांत लतिकाप्रभाकर यांना, त्याचें मालतीला मागणी घालण्याचें धाडस चमत्कारिक वाटत आहे. " प्रभाकरः—(स्वगत) काकांनी काय मांडलें आहे कांहीं कळत नाहीं. या घनश्यामाच्या माथ्यांत हा बूट कुठून निघाला ? वाः ! काय सुंदर प्रसंग आहे ! हा घनश्याम मागणी घालायला आला आहे. हा मनोहर येथें आहे ! बिचारी मालती चकितच झाली आहे मुळीं !" (३२).

लतिकेला आपला मुनीम घनश्याम–आपल्या समक्ष आपल्या

मैत्रिणीला मागणी घालतो म्हणून राग येतो. ती म्हणते, "तुम्ही आमचे नोकर; मालती माझी मैत्रीण; आज मालतीला मागणी घातलीत, उद्यां माझ्याशीं लग्न करायला तयार व्हाल. वेड नाहींना लागलें तुम्हांला ? जा. मालतीच्या लग्नाच्या वेळीं तुम्हांला हजर रहावें लागेल तें नवरदेव म्हणून नव्हे, तर लग्नाच्या सामानाची यादी करण्याकरितां." याचें उत्तर देतां देतां जीभ आवरून घनश्याम आपले दोष विचारितो, त्या वेळीं लतिका–प्रभाकरांना समर्पक उत्तर देतां येत नाहीं. लतिका म्हणते– "पहिला दोष पाहिल्या प्रतीचें दारिद्र्य, दुसरा दोष तुम्हांला कोणी नाहीं." याला प्रभाकर पुस्ती जोडतो, "आंकडेवारी हवी कशाला ही ? शिक्षणाच्या नांवानें पूज्य, ना घर ना दार. आईबापांचा ना ठाव ना ठिकाण–" यापुढचेही कांहीं दोष त्याला दाखवावयाचे असतील परंतु घनश्यामाच्या अडथळ्यानंतर सुध्दां घनश्याम दुष्ट आणि नीच वृत्तीचा आहे असे शब्द त्याचें स्वरूप उघड दिसूं लागेपर्यंत कोठेंही त्यांनीं उच्चारले नाहींत. लतिका त्याला 'अमर्याद' आणि 'उद्दाम मनुष्य' म्हणते. ( पान ३५ ) परंतु हा तिचाच उद्दामपणा आहे. त्याला मात्र अनुचित प्रसंगीं बेजवाबदारपणें प्रभाकर–लतिकेनें छेडावें व त्यानें नुसतें सडेतोड उत्तरही देऊं नये हा जुलूमच म्हटला पाहिजे. आपल्याला योग्य वाटत असलेल्या वधूला मागणी घातली यांत घनश्यामाचा काय उद्दामपणा आणि अमर्यादपणा दिसून येतो ? उगीच उपटसुंभासारखा आढ्यतेनें तो येता तर गोष्ट निराळी होती. "हाच मुलाचा बाप" नाटकांत मंजरीनें डॉ. पशूची केलेली फजीती योग्य होती. परंतु घनश्याम धुंडीराजाच्या अनुमतीनें व त्याला तो पसंत पडल्यानें तेथें सभ्यपणानें मागणी घालण्याकरितां आला यांत त्याचा दोष मुळींच नाहीं. या दोघांनाही त्याच्यांतील असा दोष दाखवितां आला नाहीं कीं ज्यामुळें धुंडीराजाची निवड चुकीची आहे असें म्हणतां येईल. तसा दोष नसूनही या सर्व मंडळींना हें स्थळ पसंत पडणार नाहीं असेंही

मानलें, तरी त्याला न दुखवितां निरोप देतां येणें शक्य होतें. तो मूळचा दुष्ट नव्हता असें ह्मणण्यास, लतिका—प्रभाकरासारख्या चाणाक्ष तरुणांना, संकटपरंपरेला कारण घनश्याम असेल, हें मालतीनें सांगेपर्यंत कळत नाहीं, हा अप्रत्यक्ष पुरावा घेण्यास हरकत नाहीं. घनश्यामाला घर ना-दार, दारिद्य, आईबाप नसणें हे जसे दुर्गुण ह्मणून सांगण्यांत आले तेच दुर्गुण प्रभाकर—मनोहरांत आहेत. फक्त त्यांचें सुदैव इतकेंच कीं दुसरें कोणीतरी त्यांचा प्रतिपाळ करण्यास व शिक्षण देण्यास मिळालें. हेंच उत्तर घनश्यामानें दिलें आहे. याच बाबतींत मालती काय ह्मणते तेंही घनश्यामाच्या स्वभावावर व वर्तनावर प्रकाश पाडणारें आहे. (पान १५५) "किती तुटून पडून तुह्मी दोघें घनःश्यामांच्या काळजाला घरे पाडीत होता. त्या परक्या माणसानें असा तुमचा काय अपराध केला होता बरें? आपलेपणामुळें तुमची मालती तुह्मांला अधिक असेल, पण सामान्य स्थितींतल्या घनश्यामांनीं सामान्य स्थितींतल्या मालतीला पाहायाला यायचें यांत असें अघटित तें काय होतें?" वगैरे.

"यांच्या पाठीवर माल आतां कोरडे ओढले पाहिजेत" असें घनश्याम धुंडीराजाला उद्देशून बोलतो तो त्याच्या बडबडीला कंटाळून व "मालतीच्या पाठीवर कुसुम, कुसुमच्या पाठीवर कुमुद, तिच्या पाठीवर—" त्या धुंडीराजाच्या वाक्याची पूर्तता करण्याकरितां मनांत ह्मणतो. यावरून तो दुर्वृत्त आहे असें हमखास ह्मणतां येत नाहीं. त्याला छेडल्यानंतर तो संतापतो. परंतु जातांना मनोवृत्तींना दाबांत ठेवून तो म्हणतो, "तुम्हा सर्वांना माझ्याकरितां फार कष्ट पडले. मालतीबाई, तुमचा संसार सुखाचा व्हावा एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे." पुढील तिसऱ्या प्रवेशांत घनेश्वराला आपल्यासारखींच माणसें सगळीकडे दिसतात ह्मणूनच कीं काय तो घनश्यामाला ह्मणतो, "भावीक अजागळांपेक्षां तुमच्यासारखीं पाजी मनाचीं माणसेंच मला फार आवडतात." पण घनश्याम या अभावित शाबासकीला तितक्याच सहजपणें

उत्तर देतो, "एखादे वेळीं आपली नौकरी सोडण्याचा प्रसंग आला, तर आपल्याजवळ लायकीचा दाखला मागण्याची सोयच नाहीं मुळीं." मोरेश्वराला लतिका देण्याचा अट्टाहास हा कां करितो तें धनेश्वराकडून समजावून न घेतां सुद्धां तो समजतो. इतकेंच नव्हे तर "घरांत कुणी वडील माणूस नसल्यानें पोरखेळ होतात" यांतील इंगीतही त्याच्या लक्षांत येतें. पुढच्या प्रवेशांत महेश्वर या त्याच्या पुढील "कपटनाटकांतील विनोदी पात्राला" तो "चतुर्भुज करण्याचें आमिष दाखवून आपल्या कह्यांत आणतो. तिसऱ्या प्रवेशापासूनच य सर्व मंडळींची खोड कशी मोडावी या विचारांत तो असतो, व या प्रवेशाच्या शेवटीं आपले बेत नक्की करतो. इतकेंच नव्हे तर (पान ५१ वरील) स्वगत भाषणांत तो आपले बेत वाचक-प्रेक्षकांना सांगतो. या वेळचें विचार नीट लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. शेवटीं तो आपला दुष्टपणा टाकून निरपेक्ष दयेला कां शरण जातो याचा खुलासा येथें सांपडतो. "तूं दुष्ट कां होतोस? असा आपल्याला कोणीं प्रश्न विचारीत आहे असें वाटून तो म्हणतो, "मी असा दुष्ट कां होऊं नये ? नाटकांतल्या नीच पात्रांच्या धूर्त बुद्धिमत्तेनें आपलें बेत कां रचीत बसूं नये !" त्याचा मुख्य रोख लतिकेवर आहे. तिला आतां आपल्याशीं लग्न करावयास लावावयाचें इतकेंच नव्हे तर ज्या मालतीच्या सुखाकरितां ती त्याच्यावर तुटून पडली त्या मालतीलाही सुख लाभूं द्यावयाचें नाहीं, म्हणूनच महेश्वरासारखा तिला गळ्यांतला ताईत करणारा वर मालतीला लाभूं द्यावयाचा नाहीं. तीही दुःखांत पडली पाहिजे, कारण लतिकेला तिच्या मैत्रिणीच्या सुखाचें समाधान मिळतां उपयोगी नाहीं. परंपरेनें तो स्वतःला बदमाष म्हणतो; "एकट्या तुझ्या लग्नाचे धिंडवडे निघून माझें समाधान होणार नाहीं. तुझ्याबरोबर मालतीही दुःखांत पडायला पाहिजे. महेश्वराच्या गळ्यांत मालतीची धोंड बांधली तर ? प्रेमकल्पनांनीं पिसाळलेला तो मूर्ख मुलगा तिला कदाचित् गळ्यांतील तन्मणी करील. नाही, लतिके, हें समाधान मी तुला लाभूं देणार

नाहीं. पहिल्या प्रतीच्या लतिकेला जसा पहिल्या प्रतीचा मी, तसा मालती-साठीं दुय्यम बदमाष कोण शोधून काढूं ? ”

ह्या दुय्यम बदमाष त्याला लगेच सांपडतो. त्या आनंदानें तो म्हणतो, ‘ अहाहा, लतिके, तुझा पाजी आणि रंगेल बाप असल्यावर दुसरा कोण कशाला पाहिजे ? ” ह्या बेत पार पाडण्याकरितां धुंडीराजाला कांहीं तरी गोत्यांत आणणें भाग आहे. धनेश्वराला गोत्यांत आणण्यास त्याच्या कागदांची चोरी केली म्हणजे झालें. धुंडीराजाच्या स्वभावाचें मात्र पृथक्करण करून त्याला चोरीच्या गुन्ह्यांत अडकवावा असें त्याला वाटतें. “ धुंडीराज भित्रा आहे, ओळखीला दुबळा आहे आणि मनाचा प्रेमळ आहे. अनोळखी महेश्वराची ओळख लादून धुंडीराजाला चोरीसारख्या गुन्ह्यांत गुंतवितों म्हणजे झालें. ” ह्या गुन्ह्यामुळें त्याला घनश्याम सांगेल तसें वागणें भाग, नाहीं तर बेअब्रूची भीति. ह्या बेमालुम युक्तीनें सर्व पात्रें एका मागून एक दावणींत गुंतवितां येतील ह्या विचारानें तो अगदीं रंगून जातो. “नुसत्या कल्पनेनेंच काय ब्रम्हानंदांत रंगून गेलों आहे ! कर्तबगार बुद्धिमत्तेच्या नीच वृत्तीची निशा और आहे ! ” ह्या ब्रम्हानंद असला तरी ती “ नीच वृत्तीची निशा ” आहे हें तो ओळखतो. याच सद्गुणाच्या व त्याच्या ओळखीमुळें, “ लतिकेसाठीं मालती, आणि मालतीसाठीं धुंडीराज अशी ही दावण मला लावावीच लागणार” ह्याबद्दल त्याला वाईट वाटत आहे. परंतु “मालतीला उचलतांना धुंडीराजाचें प्रेमळ मन दुखावलें तर त्याबद्दल जगाची कुंडली जबाबदार आहे, ” वगैरे वाक्यांनीं त्याला आपलें समर्थन करणें भाग पडतें.

ह्यानंतर वेटिंगरूममध्यें पोलिसवेषांत धुंडीराजाजवळून खोटा कबुलीजबाब लिहून घेतांना, आपल्या तो एका अधिकारी मित्रानें वाटेल तसा उपयोग करण्यास दिला असें सांगून त्याच्या जोरावर मालतीला धने-

श्वरास देण्यास सांगतांना, खोटे कागदपत्र स्मशानांत नेऊन पुरतांना, लतिकेची भेट घेऊन तिला प्रत्युत्तरें देतांना, धनेश्वराशीं खोट्या हुंड्यांसंबंधीं बेदरकारपणें बोलतांना व लतिकेचें स्वतःशीं व मालतीचें त्याच्याशीं तीन दिवसांच्या आंत लग्न उरकून घेण्याबद्दल त्याला हुकूम सोडतांना व लतिकेला क्षमा न करितां निघून जातांना तो निष्ठुर दिसतो; तरी तो पाषाणहृदयी नाहीं. लतिकेला तो म्हणतो, " मला हृदय उरलें नाहीं. " यावरून पूर्वी त्याला हृदय होतें, परंतु सुडाच्या आगीनें तें पार नाहींसें झालें व त्याला कारण लतिकाच. नुसत्या सभ्यपणानें मालतीबद्दल नकार देण्याचा चांगुलपणा ज्या लतिकेला दाखवितां आला नाहीं, तीच लतिका त्याला म्हणते, " घनश्याम, तुम्ही अलौकिक बुद्धीचे पुरुष आहांत. अशी निरपेक्ष दया जगाला अजून दिसली नसेल तर तुम्ही दाखवा, आणि या पहिल्या भाग्यशाली यशाचे वांटेकरी व्हा. " ती त्याची क्षमा मागण्यास तयार होते. या वेळेस घनश्यामानें आंवरतें घ्यावयास पाहिजे होतें, असें कोणी म्हणतील. घनश्यामाचें यावर असें उत्तर आहे कीं, ती आप्तांच्या सुखासाठीं हा आत्मत्याग करीत होती. ह्या विजयानें तिला घनश्यामावर सरशी करावयाची होती. म्हणून ती अगदीं लीन होऊन सुद्धां मानीपणाचा व आत्मयज्ञाच्या नैतिक विजयाचा पीळ त्याला स्पष्ट दिसल्यामुळें तो तिला क्षमा करीत नाहीं. शेवटच्या प्रवेशांत, त्यानें सुडाच्या दावणींत गोवलेल्या धुंडीराजाच्या उदात्त, शुद्ध व निरपेक्ष दयेच्या–ज्याची त्याला तहान लागली होती त्या–पवित्र स्वरूपापुढें तो लीन होऊन त्याचें पूर्व स्वभावांत स्थित्यंतर होतें. त्याच्या हालचालींचें अशा रीतीनें सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर त्याच्याबद्दल सहानुभूती वाटूं लागते.

गडकऱ्यांच्या इतर दुरात्म्यांत व घनश्यामांत हाच मोठा फरक आहे.

(२) घनश्यामाची तुलना.

'वेड्यांचा बाजार' व 'राजसंन्यास' या अपूर्ण नाटकांपैकीं पहिलें बऱ्याच यशस्वी तऱ्हेनें श्री. चिंतामण गणेश कोल्हटकर यांनीं पूर्ण केलें आहे. यांत त्यांतील प्रमुख पात्रांच्या स्वभावगत दुर्गुणांमुळेंच त्यांत दुःखाच्या थोड्या फार छटा उत्पन्न होतात. 'राजसंन्यासां'त संभाजी महाराजांच्या अंगीं व्यसनाधीनता, हेके-खोरपणा, शौर्य आणि कर्तृत्व असतांही बेफिकीरपणें विलासांत गुंग होणें या दुर्गुणामुळें, त्यांना फसविणारांचीं दुष्कृत्यें इतकीं भयंकर वाटत नाहींत. मुख्यतः त्यांचेच स्वभावगत दुर्गुण नाटकांत दुसऱ्यांचीं कर्में पार पाडतात. तीच गोष्ट 'एकच-प्याल्या'ची. सुधारकांचा हट्टीपणा व चुकून व्यसनांत सांपडला असतां त्यांतून सांवरता न येणारा मनाचा दुबळेपणा हे दुर्गुण प्रतिनायकाचें काम करतात. बाकीच्या तीन नाटकांत मात्र प्रतिनायक आहेत; परंतु त्यांच्या तोडीस तोड असे नायक मात्र नाहींत. ह्यांतील 'व्हिलन' अगर गडकऱ्यांच्याच शब्दांत बोलावयाचें तर " दुष्ट परंतु धूर्त बुद्धिमत्तेचें नीच पात्र " ह्या व्याख्येला शोभण्यासारखा 'प्रेमसंन्यासां'तील कमलाकर मात्र आहे. त्याला आपल्या प्रतिस्पर्ध्याचा विजय व आनंद पाहावत नाहीं. म्हणून आपल्याबरोबरच जयंत-लीला यांचा नाश व्हावा ह्या दुष्ट बुद्धीनें, लीलेला जयंत सुटल्याची बातमी न सांगतां तिला विष देऊन तिच्या जीविताची आशा नाहींशीं झाल्यावर ती बातमी तिला सांगतो. नंतर तिच्या वेदनांचा आनंद अनुभवण्याइतका तो निर्घृण व भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें, " येतु घ्नन्ति निर-र्थकं परहितं ते केन जानीमहे " या कोटीपैकीं आहे. 'पुण्यप्रभावां'तील वृंदावन, भूपालाशीं असलेलें मित्रत्व निरपवाद सिद्ध झाल्यानंतर मग त्याचा संथपणें गळा कापणारा, कर्तृत्ववति व शीलवति वसुंधरेला दिपणारा, व दुष्कृत्यें करतांना एकीकडे पश्चातापाचें दोन अश्रू गाळणारा,

व " तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये " या सदरांतला राक्षस आहे. ह्या दोघांपेक्षां घनश्याम निराळा आहे. भर्तृहरीच्या व्याख्येप्रमाणें तो ' उत्तम ' तर नाहींच; स्वार्थाला विरोध न येतां परमार्थाकरितां उद्योग करणारा नसल्यानें तो ' सामान्य ' ही नव्हे, वृंदावनासारखा ' मानवराक्षस ' अगर कमलाकरासारखा ' ते के न जानीमहे ' ह्या सदरांतलाही तो नाहीं. त्याच्या स्वार्थाला विरोध आला म्हणून तो चिडला असेंही नव्हे. तर तो निष्कारण कठोर शब्दांचा प्रहार झाल्यानें विवेकभ्रष्ट झालेला आहे. "त्या दिवशीं आपल्या शिकलेल्या कळपांतून एखाद्या नवाशिक्या जनावराप्रमाणें माझी हकालपट्टी करतांना आपण कांहीं विचार केला कां ? असा काय मोठा अपराध केला होता मीं आपला ? हलक्या दर्जाचा असेन, सर्पाप्रमाणें दुष्ट असेन, किंवा वाघाप्रमाणें क्रूर असेन, पण म्हणून मला सुखदुःख, मनोवृत्ति हीं कांहींच नसतील कां ? " ( पान १६२ ). ह्या ठिकाणीं स्वतःला त्यानें लावलेलीं, सर्प, वाघ, अगर इतरत्र वापरलेलीं विशेषणें, आरोपीच्या जबानींतील शब्दांचा शब्दशः अर्थ घेणाऱ्या प्रतिपक्षीय वकिलाप्रमाणें उपयोगांत आणण्याची जरूरी नाहीं. उलटपक्षीं आपल्याकडून घडलेलीं कृत्यें, उपमेयांप्रमाणें व बुद्धिपुरःसर आपल्याला करावीं लागलीं असेंच तीं उपमेयें दाखवितात. लतिकेच्या अंतःकरणांत पीळ आहे व त्या जोरावर ती आपल्यावर मात करूं पहात आहे हें त्याला कळलें म्हणूनच तो तिला क्षमा करीत नाहीं. हें दाखविणारे आणखी एक दोन उतारे खालीलप्रमाणें आहेत–( पा. १६१ ) " लतिका......मला पायांतलीं वहाण म्हणा किंवा कांहीं म्हणा ! नाहीं हो, लतिका इतकी दीन कुणापुढेंही झाली नाहीं; लतिकेनें स्वाभिमान सोडला नव्हता; पण प्रियजनांच्या सुखासाठीं मी वाटेल तो कमीपणा घ्यायला तयार झालें आहें. पायांतली वहाणच काय, पण माझ्या अपराधामुळें माझ्या निर्दोष प्रियजनांना आपण पायाखालीं तुडवून

टाकूं नये म्हणून आपली पायधूळ व्हायलासुद्धां मी तयार आहे. माझ्या बोलण्यामुळें नाहक दुःख भोगणाऱ्या जीवांसाठीं मी स्वाभिमानशून्य झालें आहे. सांगा, घनश्याम, सांगा, तुम्हांला आणखी किती लाजिरवाण्यासारखी शरण येऊं ?" यांतील "प्रियजनांच्या सुखासाठीं" "लाजिरवाण्यासारखी," हे शब्द लक्षांत ठेवण्यासारखे खोंचदार आहेत. म्हणूनच घनश्याम म्हणतो, "आपल्या मनांतला खराखुरा पीळ अजून जशाचा तसाच आहे. तुमच्या-आमच्यासारखीं बाणेदार माणसें स्वतःच्या सुखदुःखांची फारशी पर्वा करीत नाहींत, हें मी स्वानुभवानें सांगतों. त्या दिवशीं सुद्धां आपला अभिमान आपल्या प्रियजनांना सुखी करण्याबद्दलच होता. आजही त्याच हेतूनें आपण या स्वार्थत्यागाला पिळदारपणें तयार होत आहां. लतिके, तुझ्या प्रियजनांना सुखी व्हायला सवड करून देऊं काय ? नाहीं, स्वार्थत्यागाचें हें अभिमानी समाधान मी तुला लाभूं देणार नाहीं. तुझ्या प्रियजनांची माती माती केल्याशिवाय मी राहाणार नाहीं,' अशाच प्रकारचीं उत्तरें प्रत्युत्तरें ह्या प्रवेशांत पुष्कळ आहेत. येथें घनश्यामाबद्दल आणखी एक विशेष गोष्ट पहावयास सांपडते ती हीच कीं येथें घनश्यामाच्या विजयाबद्दल व लतिकेच्या पाडावाबद्दल आनंद वाटत असतो. 'प्रेमसंन्यासां'त लीलेला विष देतांना कमलाकराबद्दल त्वेष येतो. तिच्या मृत्यूचा व निराश तळमळीचा आनंद अनुभवीत असलेल्या कमलाकराला जेव्हां लीला म्हणते, "कमलाकर, आतां उगाच कशाला बोलतां ? माझ्या मनावर या बोलण्याचा परिणाम होण्याची वेळ निघून गेली आहे! इहलोकच्या सुखाची मी मुळींच पर्वा करीत नाहीं ! हें सुख किती झालें तरी चंचल; आज जरी मिळालें असतें तरी उद्यां खास नाहींसें झालें असतें ! माझी दृष्टी, माझी आशा आतां स्वर्गातल्या सुखांकडे लागली आहे ! आज ना उद्यां जयंत तिथेंच येतील आणि मग आम्हीं जगन्नाथाच्या कृपादृष्टीच्या अक्षय्य किरणांत अनंत सुखाचा उपभोग घेऊं ! तिथें तर तुमचें विष

बाधणार नाहीं ना ! " ह्या वेळीं तिच्याबद्दल सहानुभूती व नैतिक विजयाचा आनंद आपल्याला वाटतो. " पुण्यप्रभावां"तील वृंदावन व भूपाल--वसुंधरा यांचे एकूण एक प्रवेश वृंदावनाबद्दल तिरस्कार व भूपाल--वसुंधरेबद्दल सहानुभूती वाढविणारे आहेत. " भावबंधनां"तील शेवटच्या घनश्यामाच्या पाडावाबद्दल आनंद वाटतो. परंतु त्यांच्याबद्दल वाटणारी सहानुभूती मात्र सतत कायम रहाते. त्यास " स्वार्थानपेक्ष हेतुशून्य दयेच्या एका शब्दाची जरूरी आहे." वर एके ठिकाणीं दिलेल्या लतिकेच्या भाषणांतील संकेतार्थ काढून तिनें जर त्याच्या भाषणास निष्कपटपणें पुष्टी दिली असती व म्हटलें असतें कीं, " अशी निरपेक्ष दया जगाला अजून दिसली नाहीं, घनश्याम ती दया तुम्ही दाखवा, आणि या भाग्यशाली यशाचे पहिले अधिकारी व्हा, " तर घनश्यामानें तिचा अनादर केला नसता असें वाटतें. परंतु असला लोकोत्तर मान त्याला मिळावयाचा नव्हता. लतिकेला मिळालें इतकें प्रायश्चित पुरें झालें. मालतीचें मनोहराशीं व लतिकेचें प्रभाकरांशीं लग्न करण्यास मोकळीक देऊन, Les Miserables अगर 'दुःखीकष्टी' ह्या कादंबरींतील नायकाप्रमाणें तो वागला असता तर सर्वांवर त्याला अत्यंत मोठा व उज्वल विजय मिळवितां आला असता, व नाटकही अत्यंत परिणामकारक वठलें असतें. अशा रीतीची उच्च स्वभावरचना येथें दाखविण्याचा प्रसंग होता. परंतु अशा रीतीनें अपेक्षित गोष्टी घडवून आणल्यानंतर नाटककारांचा लहरीपणा तो कोठें राहिला ? गडकऱ्यांनीं हें पात्र रंगवितांना कोठेंही प्रभाकरासारखी अस्वाभाविकता अगर तर्कबुद्धीला न पटणारा रंग फांसला नाहीं. घनश्यामाला " राक्षसी महत्वाकांक्षेंतील " 'विक्रांतापेक्षांही लोकोत्तर दाखवितां आलें असतें असें सापेक्ष विवेचन तर केलेंच आहे. वृंदावनाप्रमाणें शेवटच्या प्रवेशांतील त्याचें शरण जाणें अस्वाभाविक आणि " राक्षसी महत्वाकांक्षेंतील " कोदंडाप्रमाणे हीनही नाहीं. त्याला

निष्कारण छेंडल्यासुळें तो दुरात्मा झाला ह्या विधनाला त्याच्या दुय्यम बदमाशाचे—धनेश्वराचे—शब्द पुष्टी देतात, " आपल्या लतिकेनें या घनश्यामाला बोलण्यानें केव्हांतरी दुखविलेलें आहे; आणि म्हणून तो तिच्याशीं लग्न करण्याच्या हट्टास पेटलेला आहे. ' ( पा. ४५९ )

घनश्यामाच्या खालोखाल लतिका हें महत्वाचें पात्र आहे. पहिल्या प्रवेशांत तिला उद्देशून धुंडीराज म्हणतो " लतिका आहे

( २ ) लतिका

लक्षाधीशाची मुलगी. त्यांतून एकटी, आन् बाळपणापासून आईविरहीत. त्यामुळें तिचा स्वभाव थोडा तापट आहे. बाकी मुलगी मनानें फारच सरळ बरें. अगदीं प्रभाचा नमुना. तुम्ही एक बोला—त्याचें एकोदरशें झालेच. ! " ह्याच स्वभाववर्णनांत प्रभाच्या वर्णनापैकीं ' उतावळेपणा, व तापटपणा, ' जमा केले पाहिजेत. घनश्याम म्हणतो ती " पहिल्या प्रतीची मानी " आहे. तिचे सर्व सद्‍गुण मान्य असूनही मालती म्हणते " ती सारासार विचार नसलेली, दुसऱ्याच्या हृदयावर विनाकारण घाव घालण्यासारखे निर्दय कोटिक्रम करणारी व बेजबाबदार बोलणारी आहे. हे दुर्गुण आपल्यांत नाहींत असें मालतीला तिनें केव्हांच सिद्ध करून दाखविलें नाहीं. उलट तिला ते खरे वाटतात व त्याप्रमाणें ती प्रायःचित्त भोगायला तयार होते. चौथ्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशांत तिच्या वरील दुर्गुणांमुळें किंवा मालतीच्या शब्दांत म्हणावयाचें तर " आतांच पहा तुझ्या बोलण्यानें कशी वेळ आली आहे ती. माझे बाबा मला विहिरींत लोटायला तयार झाले, माझा संसार अशा पंथाला लागला, मनोहरांचा हिरमोड झाला, माझीं लहान लहान भावंडें संकटांत सांपडलीं ! ........ तुझ्या स्वतःच्या संसारांत दुःखाचा शिरकाव झाला, तुझ्या बाबांना जीव देण्याची पाळी आली, तुझें घनश्यामाशी लग्न लावण्याची वेळ आली ! " हे सर्व अनर्थ घडून आल्याचें दिसून येईपर्यंत पहिल्या तिघांनीं वर्णिल्याप्रमाणें तिचा स्वभाव आहे. मालतीला धनेश्वराल

देण्याबद्दल धुंडीराज म्हणतो त्याचा गंभीरपणें विचार करावयाचा असतां प्रभाकर–लतिकेच्या कोट्या सुरूच असतात.

संकट पार पाडून नेऊं हा आत्मविश्वास ह्याला कारण नसून संकटांचें शब्द-पांडित्यापलीकडे किती भयप्रद स्वरूप आहे याचें अज्ञानच दिसून येतें. त्यांच्या तरतरित बुद्धीची कसरत सर्व नाटकांत कोट्यांच्या रूपानें आढळते व संकटांचें भयप्रद स्वरूप दिसेपर्यंत त्यांतून हसत खेळत व कोट्यांच्या शर्यतींत त्यांतून पार पडूं अशीच या लतिका–प्रभाकरांची स्वभावरचना दिसून येते ( अंक १ प्र. २ व ३; अंक २–१, २, अंक ३–३, ४ व ५ ). आपल्या बोलण्याचा परिणाम होऊन घनश्याम सर्वांच्या नाशाला तयार होईल ही कल्पना कोणा-लाच नाहीं. परंतु ती कल्पना आल्यानंतर त्यांतला आपला पहिला अपराध आहे हें कळल्यानंतर आंग चुकविण्याचा प्रयत्न करीत न बसतां आप्तांच्या सुखाकरितां आत्मयज्ञाला तयार होते. ती सुद्धां अगदीं आर्य पतिव्रतेला शोभेल अशा रीतीनें. एखाद्या बळीप्रमाणें नाइलाजानें देवतार्पण नसून अगदीं जाणून बुजून ही गोष्ट करावयाचें तिनें ठरविलें. घनश्याम म्हणतो त्याप्रमाणें हक्कानें ती त्याला मिळण्यापूर्वी म्हणजे तिच्या सुटकेची आशा त्यावेळीं राहिली नव्हतीं अगर होय नाहीं म्हणणें तिच्या हातीं नव्हतें. तरी आपल्या अपराधाचें हें प्रायश्चित्त आहे व तें घेतलेंच पाहिजे ह्या भावनेनें तिनें ही गोष्ट केली. ह्यांतच तिची उदात्तशीलता दिसून येते. पान १५८ पासूनचें लतिकेचें स्वगत भाषण तिच्या उदात्त भावनांचा व सुंदर भाषेचा एक नमुना आहे. शेवटच्या प्रवेशांत सर्व पात्रें एका ठिकाणीं येतात. त्यांत प्रभाकर, धुंडीराज, घनश्याम व महेश्वर यांचींच महत्वाचीं भाषणें असल्यानें लतिका त्यावेळीं आपल्या प्रतिस्पर्ध्याबद्दल काय बोलली असती या अपेक्षेनें तिच्या स्वभावदिग्दर्शनांत अपूर्णता वाटते. प्रेम आणि कर्तव्य यांच्या झगड्यांचे प्रसंग लतिकेप्रमाणेंच मालती, मनोहर यांच्यांवर आधींच आलेले आहेत.

प्रभाकरावर यानंतर येतो. परंतु प्रेमाला दूर सारून कर्तव्याला सामोरे होण्याची व त्याकरितां आयुष्यांतील आकांक्षांची व सुखांची होळी करण्याची तयारी सर्वांनीं दाखविली आहे. भावना-प्रधानता हा गुणही वरीलप्रमाणेंच चौघांमध्यें साधारण असा आहे. परिस्थितीनें नाहीं पण विवाहानें तरी मालती आपल्या बरोबरीची व्हावी ही भावना उत्पन्न झाल्याबरोबर ती घनश्यामाला ह्मणते, "लतिकेला व मालतीला निराळीं विशेषणें लागत नाहींत." नुसत्या शब्दांनीं त्या दोघी एका स्थितीला येत नाहींत हें तिच्या लक्षांत येत नाहीं. बापाच्या खोट्या कृत्यांमुळें तो आपला विवाह मोरेश्वराशीं लावण्यास तयार होत आहे हें तिला पूर्वींच कळलेलें असतें. त्यांतच तिच्या मताप्रमाणें, धनेश्वराचा वैभवाच्या जोरावर मालतीशीं लग्न करण्याचा बेत ह्यांमुळें तिला वैभवाचा वीट येतो. लहानपणापासून जिच्या स्वभावाचा परिचय झाला, मनोहरावर जिचें प्रेम आहे, जी चंचल स्वभावाची व उथळ विचारांची मुलगी नव्हे अशी मालती स्वतः या विवाहाला तयार होते कशी व ती स्वतः आपल्या मुखानें ही गोष्ट सांगते कां ? ह्याचा लतिकेनें विचार कधींच केलेला नाहीं. एकदां मोरेश्वराशीं लग्न करण्याबद्दल आपला बाप अकांडतांडव करतो आणि नंतर घनश्यामाशीं विवाहास तिनें तयार व्हावें ह्मणून त्रागा करतो. तिच्या देखत मालतीला तिच्याशीं विवाह न करण्याचें वचन देतो, परंतु तिच्या बरोबरच मालतीच्या नशिबाचा फांसा उलटला हें तिला दाखवितो. ह्या उलटसुलट गोष्टींचा तिच्या सारख्या सुशिक्षित मुलीनें विचार करावयास पाहिजे होता; व त्यावर तोड काढावयास हवी होती. तें सोडून ती उगीच लांबच लांब सुसकारे सोडीत बसली आहे. कडू शब्दांचा घाव कसा जिव्हारीं बसतो ह्याचा अनुभव तिला ह्याच वेळीं येतो. इंदू तिला ह्मणते, " लतिकाताई, लतिकाताई, अशी काय बसली आहेस ? बसूं कां जराशी तुझ्याजवळ ? का आपली फटदिशीं रागावशील कीं, अशी वेडी विद्री दिसतेस आणि जवळ कशाला बसतेस ह्मणून ? मला तुझ्या

बोलण्याची भारी भीति वाटते. " आपण जशी कोटिक्रमांनीं व चलाख बोल-ण्यानें एखाद्याची फजिती करतों तशी इतरांनीं आपली फजिती केल्यास काय हरकत आहे ? पण ह्या वेळीं ती त्या मन:स्थितींतच नसते. घनश्यामाबद्दल तिच्या रोमरोमांत खिळून गेलेला द्वेष नाहींसा व्हावा व " पहिल्या तरल-स्पर्शानें हृदयाला इतका जोराचा धक्का बसावा की, त्यासरशीं साऱ्या गेल्या गोष्टींची आठवण नाहींशी व्हावी व पुन्हां डोळे उघडतांच घनश्यामाच्या जागीं परमेश्वराची प्रेमस्वरूप मूर्तीच दिसूं दे " अशी तिची प्रार्थना आर्य पतिव्रतेच्या नीतिमत्तेची साक्ष देणारी आहे. अशा तऱ्हेची तिची कर्तृत्वाचें तेज नसलेली भावनाप्रधानता असली तरी तिच्या आत्मदानाचें मोल कमी ठरत नाहीं. अशाच तऱ्हेचा प्रसंग श्री. खाडीलकरांच्या स्वयंवरांत आहे. रुक्मिणीनें घालून दिलेल्या दोन महिन्यांच्या मुदतींत श्रीकृष्णानें तिचें हरण न केलें तर ती शिशुपालास वरणार व " तसल्या त्या लग्नानंतर वाचेंत शक्ती उरली तर तुमची स्तुती व इतरांची निंदा " ती नेहेमीं करणार असें वचन ती रुक्मीला देते. ह्या वचनानें स्वजनांचें व बंधमुक्ततेनें पित्याचें देणें तिनें फेडलें, परंतु शरी-राचें, श्रीकृष्णाच्या सहवासांतील व सेवेंतील सुखाचें देणें न राहिल्यानें जर श्रीकृष्णानें तिचें हरण केलें नाहीं तर ? " तर--माझा व शरीराचा संबंधच संपला. ! हो असेंच, असेंच, संबंधच संपला. दादाचें व बाबांचें देणें पुरतें देण्याकरितां ह्या हातांनीं त्या वैऱ्याच्या गळ्यांत माळ टाकली; लगेच शरी-राचा संबंध संपला. श्रीकृष्णावरील माझें प्रेम शरीराची व माझी तत्क्षणीं ताटातूट करील, " ( अंक ३ रा, पान ६५ ). तिच्याशीं तुलना करावयाची असल्यास ती मालती व " एकच प्याल्यां"तील सिंधू यांच्याशीं करितां येईल. विद्यासंपन्नतेंत व नीतिमत्ता, प्रेमळपणा, आत्मत्याग वगैरे सद्गुणांप्रमाणें प्रसंग आला असतां पार पडण्याची तोंड न काढतां तो धैर्यानें सहन करण्याच्या बाब-तींत तिघींचेंही साम्य आहे. " पुण्यप्रभावां"तली वसुंधरा मात्र प्रसंगाला तोंड

देत देत त्यांतून पार पडण्यास भावनापूर्ण असूनही निरनिराळ्या उपायांची योजना करते, तसें यांच्यांत आढळत नाहीं. लतिका इतर दोघींसारखी शांत नसून अल्लड आहे. तरतरित बुद्धीचें कौतुक तिचें सर्वांनींच केलें आहे.

लतिकेसारखाच प्रभाकाराचा स्वभाव आहे. ज्या दुर्गुणांचा तो घनश्यामावर आरोप करतो त्यांपैकीं बहुतेकांना तो स्वतःच पात्र असतो. धुंडीराजानें "आपल्या दशांतल्या कोणाचासा भाचा" ह्या नात्यानें पाळलेला हा पोपट घनश्यामासारख्या कर्तृत्ववान्, स्वतःच्या हिंमतीवर चढलेल्या माणसाला उगाच छेडतो. पंचवीस वर्षांचा त्याचा प्रेमळ आणि भावड्या धुंडीराजाशीं सहवास आहे. त्याच्या स्वभावाची अद्याप त्याला ओळख पटली नसेल असें म्हणवत नाहीं. तो घनश्यामाला मालतीला मागणी घालण्याकरितां एकदां आणतो काय आणि नंतर धनेश्वराला तिला देण्याचें निश्चित ठरलें म्हणून सांगतो काय ! घनश्यामाला कदाचित् भोळेपणानें आणलें असेल असें घटकाभर मानलें तरी धनेश्वरासारख्या " सतरा कुलंगडीं असलेल्या थेरडयाशीं " तिचें लग्न निश्चित ठरलें व तेंही कोणाच्या संमतीवांचून, असें सांगणारा धुंडीराज खास वेडा नाहीं ही गोष्ट त्याला विचारांत घ्यायला हवी होती. परंतु तो लतिका-प्राप्तीच्या आणि कानडी वेषानें घरांत वावरून धनेश्वराची खोड मोडावी व हें अनन्वित लग्न फिसकटून टाकावें ह्या विचारांत आणि उदात्त कल्पनांचे फवारे हवेंत उडविण्यांत दंग असतो ( पान ८० ते ८३ ). " कानडी गवई म्हणजे एक सोडवण्यासारखें कोडें आहे " असें धिंदूकडून कळल्या-नंतर तो मनोहराला घनश्यामाच्या पाळतीवर ठेवतो. तो सुद्धां " धनेश्वर-पंतांच्या घरांत कांहीं घोटाळा चालला आहे " असा त्याचा तर्क आहे म्हणूनच. धुंडीराजाच्या घरावर घनश्यामानें केवढी आग पांखडली हें ह्या

( ४ ) प्रभाकर

वाग्वीराला ठाऊकच नाहीं. तसेंच तो मनोहराशीं बोलत आहे त्या वेळीं तिकडे धनेश्वराचेही घराचा डोंबाळा होत आहे हेंही त्याला कळत नाहीं. लतिकेचें त्याच्यावर प्रेम आहे हें त्याला पक्कें ठाऊक आहे. परंतु तिला विवाह मात्र दुसऱ्याशीं करावा लागणार असें तिच्याकडून कळल्यानंतर तिला तसलेंच जबरदस्त कारण असेल असें वाटून भावनाविवशतेनें तो तिची प्रशंसा करतो. ह्यांत त्याचा उदात्तपणा दिसून येतो, तशीच त्याची भावनाविवशता दिसून येते. कारण अद्याप त्याला असें वाटतें कीं पहिल्या अंकापासून तिचें मोरेश्वराशीं लग्न लावण्याचें प्रकरण चौथ्या अंकांत रंगण्याच्या बेतांत आलें असावें. " आंधळ्या गवयाची नजर साफ नाहीं व घनश्यामाच्या व त्याच्या खटपटीनें घरांत दुःखदायक चमत्कार होत आहेत " ही माहिती पूर्वीच त्याला मिळाली असून तिचा त्यानें मनोहराला घनश्यामाच्या पाळतीवर ठेवण्याखेरीज जास्त फायदा घेतलेला नाहीं. यत्किंचितही सुगावा लागूं न देतां कारस्थान तडीस नेण्यांत घनश्यामाची शहामत तर खरीच पण या नायिकानायकांचा कर्तृत्वहीन बावळेपणाही कारण आहेच. नाट्यपरिभाषेची परंपरा राखण्याकरितां यांना नायिकानायकांच्या नांवानें हांक मारून टीकाकारांनीं यांच्या गळ्यांत नाटकाचें नेतृत्व बांधलें आहे. इतके दोष दाखविले असले व एखादा उच्च स्वभावाचा नमुनाही दाखविला असला तरी त्याखेरीज अनुकरणीय असे गुणही प्रभाकरांत आहेत. बापानें निश्चित म्हणून धनेश्वराच्या व तिच्या लग्नाबद्दल सांगितल्यानंतर मालती मनोहराला लग्नाबद्दल वचन देते, व नंतर त्याचें प्रेम व चित्र परत करते. या विसंगतीचा विचार न करितां विषण्णतेनें मनोहर इकडे तिकडे भटकतो. पण प्रभाकर चुकीचा कां होईना पण कांहीं तरी तर्क चालवतो व निराश न होतां विकारवशता आवरून लतिकेला विचारतो, " लतिके, या संकटाला दुसरा कोणताही उपाय नाहींच कां ? " ह्याला लतिकेच्या मताप्रमाणें उत्तर निराशाजनक आहे. ती म्हणते, " अगदीं

कोणताही नाहीं. घनश्यामांनीं बाबांना काय दहशत घातली आहे न कळे, कीं ते अगदीं आत्महत्त्येपर्यंत—" आपण तर्किलेली भानगड यांत नसून घनश्याम ह्याच्या मुळाशीं आहे हें त्याला आतां कळतें. ह्या यदृच्छेनें मिळालेल्या माहितीची सांखळी जुळवून तो तिच्या फासांत महेश्वराच्या मदतीनें घनश्यामाला यशस्वीपणें अडकवितो. शेवटचा प्रवेश गडकऱ्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणांत लिहिला गेला त्या दृष्टीनें बहुमोल तर खराच. पण त्यांतील प्रभाकराचे, "( हळूच धुंडीराजास एकीकडे ) काका, गोंधळांत कसले पडलां ! याला वांचवावयाचें ठरलेंच कां ? तेवढा कागद फाडून टाका म्हणजे झालें. म्हणजे घनश्याम सुटला. ( धुंडीराज कागद फाडतो ). गेला काहो पुरावा ?" हे शब्द घोंटाळ्यांत पाडतात. धुंडीराज–मालती यांच्याकरितां कृतज्ञतेनें व प्रेमानें कर्तव्यकर्म म्हणून, "हमाली करील, जन्माची गुलामगिरी पत्करील व वेळ पडल्यास लतिकेसारख्या सर्वगुणसंपन्न वधूचीही किंमत कमी समजून त्याग करील." पण घनश्यामाला, धुंडीराजाच्या मनोरचनेला शोभण्यासारखी उदात्त स्वरूपाची क्षमा प्रभाकर करील व त्याला सोडविण्याचा सडेतोड उपाय तो अमलांत आणील, हें गूढ व अस्वाभाविक वाटतें. ह्याला समर्पक कार्यकारणभाव सर्व नाटकांत कोठेंही आढळत नाहीं. सुटो वा न सुटो, त्याचा आपल्या मागचा ससेमिरा सुटला, इतकी उदासीन वृत्ती सुद्धां त्याच्या व बाकीच्यांच्या मनोरचनेला शोभली असती. घनश्यामाला कटु शब्दांनीं निष्कारण प्रहार करणारा पहिल्या अंकांतील प्रभाकर, चौथ्या अंकाअखेर घनश्यामाची खोड मोडण्याकरितां त्याला अडकवूं पाहाणारा प्रभाकर आणि त्याला अडकविल्यानंतर धुंडिराजाला बरें वाटावें म्हणून त्याला सोडविणारा प्रभाकर हे एकच असतील काय ? वसुंधरेच्या सडेतोड विधानांनीं निरुत्तर होणारा, तिच्या लोकोत्तर धैर्यानें, चारित्र्यानें व आत्मविश्वासाच्या तेजानें डोळे दिपणारा वृंदावन तिचा हात धरावयास जाण्याचा अट्टाहास करतो

आणि नंतर एकदम जाऊन तिचे पाय धरतो, हा एक दाखला सदर बाबतींत घेतां येईल. याच चमत्काराची पुनरावृत्ती घनश्याम–लतिकेचा विवाह घडून येता तर झाली असती. मात्र ह्या अद्भुत प्रकारांच्या पाठीमागें कार्यकारण-भावांचा व विचारविकारांच्या झगड्यांचा बराच मोठा आधार आहे. प्रभाकराच्या बाबतींत तसा कांहीं प्रकार नाहीं. परंतु ज्या स्थितींत हा प्रवेश लिहिला गेला त्या गंभीर प्रसंगाला स्मरून याबद्दलचें इतकेंच विवेचन पुरें आहे.

(१) मालती व मनोहर

मालती–मनोहरांत स्वभावसादृश्य आहे. धुंडीराज म्हणतो, "आमची मालण मोठी सात्विक; तुमच्या धनेश्वराच्या मनोहराचा मासला." शांत, सौम्य व सरळ स्वभावाचें हें जोडपें आहे. लतिका–प्रभाकरांच्या सारखीं निर्दय कोटिक्रमांची व उणींपाणीं काढून बोलण्याची दोघांनाही संवय नाहीं. शिक्षणाचा सुपरिणाम त्यांच्यावर झालेला दिसतो, ( अंक १ प्र. २–घनश्यामाला त्यांनीं दिलेलीं उत्तरें ). मात्र कर्तृत्वशून्यतेंत पहिल्या जोडीशीं त्यांची स्पर्धा लागल्यानें त्यांच्या उदात्त कल्पना शुकपाठाइतक्या आल्हादकारक वाटत असल्यास नवल नाहीं ( पानें ११२,११३,१४० ). लतिकेपेक्षां मालतींत प्रसंग लवकर उमगण्याचा चलाखपणा अधिक दिसतो. संकटपरंपरेला घनश्याम कारण असावा हें तिचें अनुमान केवळ गतगोष्टींच्या निरीक्षणानें व धनेश्वराच्या शब्दांचा दुजोरा मिळाल्यानें होतें ( पान १५३ ). त्याच्या कार्यकारणांचा उलगडा पहिल्यानें तीच लावते व लगेच अप्रिय पण पथ्यकर असा उपदेश वेळेवर ती लतिकेला करिते. या बाबतींत तिचें "प्रेमसंन्यासां"-तील सुशीलेशीं साम्य आहे. तिसऱ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत ती स्वतः धनेश्वराशीं लग्नास तयार असल्याचें सांगण्यास आली आहे, असें घनश्यामानें धनेश्वराला सांगितलें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. लतिकेशीं बोलतांना ती म्हणते, " जीव तोडून तुम्हांला सांगितलें–निर्भिडपणानें

आणखी किती सांगू ? लतिकाताई, मला हेंच स्थळ हवें आहे. या लग्नानेंच माझ्या मनाला आनंद होणार आहे.'' तिनें स्वतः सांगावयास येणें ह्यांतील हीनतेचा भाग कसा नाहींसा होतो हें ही गोष्ट घनश्यामानें धनेश्वराला सांगितली, एवढ्या पुराव्यानें स्पष्ट होते. परंतु तिच्याच शब्दांतील अल्पखुषींचा भाग अनुचित वाटतो खराच. परंतु ही कडू जहर गोळी, कोणती भावना तिच्या घशांत कोंबीत होती ह्याचा विचार केला पाहिजे. धुंडीराज तिला सांगतो कीं, " घनश्यामाच्या जुलमानें नव्हे तर अगदीं आपखुषीनें आपण ह्या लग्नास तयार आहों, असें दाखविलें पाहिजे." त्यावर ती ह्मणते, " धनेश्वरांची श्रीमंती मला हवी म्हणून सांगायला मी तयार आहें. लोक काय वाटेल तें म्हणोत ! बाबा, आपण आतां निःसंग झालों ! दैवीं आलें तें सोंग साजरें करून दाखविलेंच पाहिजे "( पान ९७ ).

धनेश्वराची लतिका कान उघाडणी करते त्यावेळीं मालतीच्या सांनिध्याचा चांगलाच उपयोग होतो व धनेश्वराचा बेत बदलून तिच्याशीं आपण लग्न करणार नाहीं असें तो वचन देतो. हा इष्ट परिणाम मालती तेथें नसती तर झाला नसता. आप्तांच्या सुखाकरितां आत्मदान करणारी लतिका, मालती-धुंडीराजाकरितां धनेश्वराशीं भांडण केल्यास लतिकाप्राप्तीवर पाणी सोडावें लागलें तरी हरकत नाहीं असें म्हणणारा प्रभाकर, यांच्याच जोडीला पितरांच्या अब्रूकरितां व भावंडांच्या सुखाकरितां मनोहराला दिलेलें वचन मोडून त्याला कडू शब्द ऐकवून शाप मागणारी मालती चांगली शोभते. आणि मनोहर ? परंतु त्याच्या हृदयांतला विकारांचा खळबळाट त्याच्याच शब्दांत देणें बरें. ( पान १४० )

" धनेश्वरांच्या सुखासाठीं ! माझ्या सुखाची होळी ज्यांनीं केली त्या घनेश्वरांच्या सुखासाठीं ! मालतीचें हरण करून ज्यांनीं माझ्या प्रेमांत विघ्न कालविलें, आणि माझ्या जन्माचा सत्यानाश केला—पण त्यांनींच आजन्म माझें

पोषणही केलेलें आहे ! माझ्या अन्नदात्याशीं मला कृतज्ञतेनें वागायला नको का ? नाहीं, प्रेमासाठीं मी कर्तव्य सोडणार नाहीं ! अरेरे ! प्रेमा, तूं अमृतमय आहेस कीं विषमय आहेस ? तुझ्या संसर्गामुळें दूषित झालेल्या हृदयांत कृतज्ञतेसारख्या दैवी गुणाला सुद्धां जागा मिळण्याची पंचाईत पडते काय ? किती भयंकर आहेस तूं ! " प्रेम कीं कर्तव्य ? ह्या प्रश्नाचें आधीं कर्तव्य व मग प्रेम हें उत्तर नाटककर्त्यांनीं देऊन ठेवलें आहे. ह्या निर्णयाची आम्हांला आज अत्यंत जरूरी आहे. " दगडा धोंड्यांचा अभ्यासी " मनोहर, प्रभाकराच्या सूचनेला अनुसरून घनश्यामावर पाळत ठेवतो व त्याच्या मागोमाग स्मशानांत जाऊन, " काळ्या दगडांत हिरवा दगड कोठून आला ? " ह्या शैक्षणिक जिज्ञासेनें व मालतीनें परत केलेल्या चिठ्ठीला त्या दगडाखालीं पुरून टाकावा ह्या काव्यमय कल्पनेनें उकरीत असतां केवळ सुदैवानें त्याला सर्वांच्या " आशेचा पाळणा " आढळतो. अशा रीतीनें ह्या जोडप्याची घनश्यामाचा पाडाव करण्यास मदत होते.

वर विवेचन केल्याप्रमाणें लतिका-प्रभाकर-मालती-मनोहर यांच्या स्वभावांत सामान्य गुणधर्म पुष्कळ आहेत. बाकीच्या विरोधाचें विवरण केलेंच आहे. आपल्याला प्रिय असणाऱ्या वधू अगर वर प्राप्त करून घेण्यांत ह्यांपैकीं कोणींच कांहीं उपायांची योजना केली आहे अगर दुसऱ्यांना मदत केली आहे असें दिसत नाहीं. म्हणूनच लतिका-प्रभाकर व मालती-मनोहर यांचीं स्वतंत्र कथानकें मानण्याची जरूरी नाहीं. चौघांचाही प्रयत्न घनश्यामाला हाणून पाडण्यांत व तोही चौथ्या अंकाच्या शेवटीं व दैवानें दिलेल्या सामुग्रीच्या जोरावर, म्हणूनच चौघांचेंही एक उपकथानक म्हणून सांगितलें आहे.

ह्या जोडींत साम्यापेक्षां विरोधच जास्त आहे. ते लतिका मालतीचे अनुक्रमें बाप व मनोहर—प्रभाकरांचे पालक आहेत ह्यापेक्षां घनश्यामाच्या तावडींत सांपडून त्याच्या कक्षेंत असहायतेनें फिरणारे दोन जीव, हें साम्य विशेष आहे. विरोध त्यांच्या स्वभावरचनेंत व कृतींत आहे. पापकृत्यांनीं पेचांत अडकणारा व त्यांतून सन्मार्गानें न सुटणारा असा धनेश्वर आहे. पापांचें प्रायश्चित्त भोगावयास तयार न होतां भागीदारानें गळथाला फांस लावूं नये म्हणून पोटची एकुलती एक व सद्गुणी पोरगी त्याच्या मूर्ख मुलाला देण्याचा अट्टाहास तो करितो. तो तडीस नेण्याकरितां मराठी न बोलणारांचा गराडा लतिकेभोंवतीं घालून तिचें शिक्षण व मराठी-भाषाव्यवहाराला अडथळा आणण्याचा त्याचा प्रयत्न वेडगळपणाचा व हास्यास्पद तर ठरलाच. पण त्यामुळेंच घनश्यामाच्या कारस्थानाला मदत झाली. लतिका—प्रभाकरानें ही आडकाठी जशी जुमानली नाहीं तसा तिचा उपयोगही घनश्यामाच्या पाडावाकडे करून घेतला नाहीं ही गोष्ट वेगळी. बालावृद्धविवाहाचें त्याचें समर्थन अस्वलाच्या प्राणघातक गुद-गुल्यांप्रमाणें वाटतें. त्यांतील विरोधाभासाचें हसूं आलें, तरी घनश्याम मालती-धनेश्वराचें लग्न जमवून आणणार ह्या जाणीवेनें दुःखाच्या भावनेनें गुदमरल्या-सारखें वाटतें. कृतकर्माबद्दल शासन भोगण्यास त्याला धैर्य होत नाहीं इतकेंच नव्हे तर लतिकेला विश्वासांत घेऊन तिची सहानुभूती त्याला मिळवितां येत नाहीं. “ आमच्या सुखाकरितां बाबा जीव देतील, ” ह्या मालतीच्या वाक्यानें तो आत्महत्या करून ह्या त्रासांतून सुटण्याचा बेत करितो, पण लतिकेचें काय होईल ह्याची त्याला पूर्ण जाणीव नसते. धुंडीराज केवळ भोळेपणानें फसलेला आहे. एकदम घाबरून कबुलीजबाब लिहून देण्या-इतका भावडेपणा म्हणजे ह्या जगांतला अपराधच, तरी पण ह्या प्रेमळ म्हाताऱ्यावर आलेल्या प्रसंगाबद्दल व त्यांत गुरफटण्याबद्दल त्याची

कींव करावी तेवढी थोडीच आहे. मूळचा पापभीरु व खरोखर निरपराधी असल्यानें आपल्या सुशील कन्येला विश्वासांत घेतो तसा तो प्रभाकराला कां घेत नाहीं ? हें गूढ तर खरेंच. पण प्रभाकरानें तरी त्यांच्या ह्या विक्षिप्त वर्तनाची सहानुभूतीचें चौकशी कोठें केली ? धनेश्वराचा मनोहर कोण ? कुठला ? याचा कोठेंच संबंध नाहीं. धनेश्वर तर मनोहराला सर्व नाटकांत एकदांच विचारतो व तोही बिचारा त्या एका वेळींच आपल्या पालकाशीं बोलतो ( पान ४४ ). परंतु धुंडीराज गरीब असून सुद्धां ह्या पोरक्या प्रभाकराला पोटच्या पोराप्रमाणें वाढविण्याइतका उदार आहे. सर्वांच्या नशिबीं " पाजी बदमाषाचीं अगर कैद्याचीं मुलें म्हणवून घेण्याचें टाळण्याकरितां व आपल्या मरणानेंही तो कलंक दूर होणार नाहीं ही खात्री पटल्यानंतर नाइलाजानें मालतीचा बळी देण्याइतका कर्तव्यदक्ष व शेवटी आपल्याला छळणाऱ्या घनश्यामालाही आपलेपणाच्या भावनेनें फासांतून सोडविणारा व कबुलीजबाब फाडून टाकतांना झालेल्या गुन्ह्याबद्दल " मग त्याबद्दल शिक्षा भोगायला मी तयार आहे. मुलांना कां पुढें करायचें ? अहो, घनश्याम झाला तरी आमच्यापैकींच, आमच्या धनेश्वरांचे मुनीम; " असे उद्गार काढणारा महात्मा आहे. त्याला दुःख देतांना घनश्यामाला सुद्धां वाईट वाटतें. व्यवहारांतलेच शब्द वापरावयाचे झाल्यास केवळ धुंडीराजांच्याच ' पुण्याईनें ' ही ' ट्रॅजेडीची कॉमेडी ' झाली.

(७) महेश्वर, इंदू व बिंदू.

महेश्वर, इंदू व बिंदू हीं विनोदी पात्रें बरींचशीं भोळीं असून व्यवहारी जगांतल्या लांडया–लबाडयांनीं, धूर्त लोक आपला कसा उपयोग करून घेतात हें त्यांना समजत नाहीं. महेश्वर प्रेमवेडा व काव्यकल्पनांनीं पागल झालेला तर खराच पण तो इमानी नसता व थोडा जास्त चाणाक्ष असता तर घनश्यामाचें कारस्थान अशा रीतीनें रंगलें नसतें. मात्र तो आपल्या मराठे व रजपूत ऐतिहासिक रस-

दारांइतका स्वामिनिष्ठ नसून त्याला सदसद्विवेचक तारतम्य बुद्धी असल्यानें सत्पक्षाला तो मदत करतो. इंदू व बिंदू ह्या काळ्या कुरूप अशा आधुनिक सावित्री जबाबदार माणसांच्या अभावीं—कारण धनेश्वरानें एका शब्दानेंही त्यांची विचारपूस केल्याचा नाटकांत उल्लेख नाहीं,—स्वतःच वर संशोधन करितात. कोठेंच न जमल्यानें त्या निराश होतात. तोंच हे दोन कानडी, एक आंधळा पण तरुण, दुसरा म्हातारा पण डोळस, आपण होऊन धनेश्वराच्या घरी येतात. इंदूच्या मतानें आंधळाच चांगला ठरतो, कारण आंधळ्याखेरीज ह्यांच्या रूपाकडे कोण डोळेझांक करणार? हें तिच्याच विचारसरणीप्रमाणें ठरून ती गोष्ट करावयास विप्रयच हवा म्हणून धनेश्वराच्या लग्नाचें सांगते. असल्या अकल्पनीय गोष्टीनें थक्क झालेला प्रेमवेडा महेश्वर एकदम आपलें भाषांतर विसरून जाऊन जन्म-भाषेंतच बोलल्याबरोबर त्याची लबाडी उमगून तो तिच्या कचाटयांत येतो. अनायासें अशा कचाटयांत सांपडलेल्या महेश्वराला ती लग्नाच्या अटीवर ही लबाडी गुप्त ठेवण्यास आपण कबूल आहों असें सांगते. तसेंच तो धनेश्वराचे कागद चोरून वाचीत असतां इंदू त्याला दुहेरी पकडते यवनांच्या हातांत सांपडलेल्या अबलेप्रमाणें आपल्याशीं लग्न लावण्याची अट—नव्हे जबरदस्ती—तो मराठ्यांच्या गनिमी काव्यानें सहन करतो, व शेवटीं दोघींच्याही हातांवर तुरी देतो. बिंदूला धनेश्वराचीं खोटया हुंड्यांचीं कुलंगडीं कदाचित् ठाऊक नसतील अशी कल्पना केली, तरी धनेश्वराचे कागद कामण्णा-सारख्या परक्या इसमानें वाचणें हा अपराध आहे एवढें तिला कळावयास पाहिजे होतें. परंतु इंदू लहान असून आपल्या आधीं ज्याच्याशीं लग्न तिनें जुळविलें त्याच्याशींच आपलें लग्न जुळवून आणावें ह्या विचाराच्या भरांत ती तसें करीत नाहीं. उलट स्वार्थी वृत्तीमुळें कामण्णाच्या थापांना फसून त्याचीच छाप तिच्यावर बसते. परंतु लवकरच त्याचा चंचल स्वभाव तिला कळून येतो व गिरसप्पाला लग्नाबद्दलचें विचारीत असतां तिच्या तोंडून

 3218

सहज महेश्वराबद्दलची माहिती बाहेर पडते. ह्या दोघींच्या लग्नाच्या अटीमुळें व महेश्वराच्या समयसूचकतेनें त्याचा व घनश्यामाचा बचाव होतो, व महेश्वराचा स्वभाव लौकरच बिंदूनें उमगल्यामुळें प्रभाकराला घनश्यामाच्या पाठीवर मनोहराला ठेवतां येतें. अशा रीतीनें या तिघांच्या सहाय्यानें जसें नाटकांतील घनश्यामाचें कारस्थान रंगतें तसेंच त्यांच्यामुळें नाटकांतील काळीं कोडीं उलगडून घनश्यामाच्या कारस्थानावर प्रकाश पडतो. अशा रीतीनें ह्यांचे गुण व अवगुण कथानकाला व पहिल्या उपकथानकाला उपकारक होतात.

## —: ४ रसपरिपोष :—

रसपरिपोषाच्या दृष्टीनें विचार करतांनां ह्या नाटकांत विनोदाला प्रमुख स्थान मिळालें आहे असें आढळून येईल. किंबहुना हास्यरसमय आनंदपर्यवसायी नाटक व्हावें हा उद्देशच असल्यामुळें पहिल्या प्रवेशापासून विनोदालाच प्रारंभ झाला आहे. प्रो. मोल्टनच्या * खालील व्याख्येंतील लक्षणें गडकऱ्यांच्या विनोदाला बहुतांशीं लागू पडतात. विनोदाला उठाव देणारें प्रमुख पात्र म्हणजे महेश्वर. त्याच्या

---

* Humour is the flower of healthy mental growth; it is mental exertion not for a practical purpose but for its own sake, arbitrary and delighting in its own arbitrariness; it is turned on everything good or bad, great or trivial ( for to humour all things are humorous ) drawing for everything its sparkling surprises and forever catching unexpected novelties of aspect; it is an insight into the singularities that lie just below the surface of things, estimated more by their number and the quickness with which they present themselves, than by weight and lasting worth; it is further in its sharpest strokes the out-come of the genial good-will, which is the normal condition of a well balanced mind.

—R. G. MOULTON

खालोखाल धुंडीराज ( पहिला अंक ), लतिका, प्रभाकर व धनेश्वर हीं होत. मालती, मनोहर व घनश्याम ह्यांच्या तोंडींसुद्धां विनोद आहे. घनश्यामाच्या थोड्याशा विनोदांत सुद्धां धुंडीराजाच्या पाल्हाळाचा उपहास मार्मिक रीतीनें करून त्याला आपल्या इच्छित विषयाकडे वळविलें आहे. तो म्हणतो, " आपण हेड-हपिसांत शिरलां खरे, पण बोलण्याच्या नादांत मोरेश्वराची आजी बिचारी एकदां लहानपणीं तशीच मरून पडली आहे. शिवाय आजी म्हणजे ती सुद्धां बापाची आई, आईची आई नव्हे, ती बिचारी सहीसलामत आहे. "

विनोदाच्या पहिल्या प्रकारांत वस्तुमालाच्या सत्स्वरूपाचा एक पापुद्रा उचलून त्याच्या खालचा विरोधाभास मार्मिकपणें दाखविलेला आढळतो. गंभीर वृत्तीचा मनोहर म्हणतो, " देहासुद्धां मनानें जिवंत असतां जित्या जगाच्या जांचण्या चुकविण्याच्या हेतूनें आयुष्याचें शेवटचें टोंक गांठण्यासाठीं जितेपणींच एकदम या स्मशानांत येऊन बसणें म्हणजे लवकर कालक्षेप करण्यासाठीं घड्याळाचे कांटे सरकावण्यासारखेंच हास्यास्पद आहे " ( पा. २४६ ). इंदू प्रभाकराला विचारते, " नाहीं, म्हटलें, मघांपासून तुम्ही सगळ्याजणींना सुंदर सुंदर म्हणत आहांत, त्यांत आमचीही जिम्मा झाली का ? मालतीताई, लतिकाताई आणखी यांच्या पलीकडेच आम्ही दोघी बसलों होतों." त्यावर प्रभाकर उत्तरतो, "मी जरासा अविचारी असल्यामुळें इतक्या दूरदृष्टीनें कधींच बोलत नाहीं. चुकून तुम्हाला सुंदर ह्मणून गेलों असेन तर मला क्षमा करा." जणूं काय त्यांना चुकून सुंदर म्हणणें म्हणजे त्यांची नालस्ती करण्यासारखेंच आहे. शिकलेल्या वधूवरांबद्दल चर्चा व बाला-नव्हे तरुणीवृद्धविवाहाचें समर्थन धनेश्वराइतकें उत्तम कोणींच केलें नसेल ( अंक २-प्र. १ ). असलेंच चमत्कृतिजनक वैचित्र्य व विकृत आणि हास्योत्पादक विसंवादित्व महेश्वर, लतिका, प्रभाकर, धनेश्वर यांच्या भाषणांत अनुभवायला सांपडेल. ( अंक ११ प्र. २,३,४; अं. २, २ प्र. १ व ५; अं. ३, प्र. २, अं. ४, प्र. ४, पान

१६९ व अंक ५ प्र. १.) केवळ निर्दोष व सुखोत्पादक विनोदाचीं उदाहरणें ह्यांत सांपडतात. विनोदाचें दुसरें साधन उपहास असून धुंडीराजाच्या पाल्हाळाचीं स्वतःशीं टीका करणारीं घनश्यामाचीं भाषणें; लतिका-मोरेश्वर, मालती-धनेश्वर यांच्या विवाहांबद्दलचे प्रभाकर–लतिकांचे कोटिक्रम व महेश्वरानें मांडलेला इंदूबिंदूंच्या सौंदर्याचा मीनाबाजार हीं उत्तम उदाहरणें होत. धुंडीराजाचा (अं. १, प्र १,२ व ५) विनोद भोळसरपणा व शब्दवेल्हाळ यांमुळें उत्पन्न झाला आहे. तिहींच्या गाडीकरितां एक वाजतांच स्टेशनवर आलेलो धुंडीराज ह्मणतो, "गाडी निघून तर गेली नाहींना? नाहीं, मी येण्याच्या पूर्वी गेली ती बाराची आणि ही दुसरी तिहीची! अहो पहारेकरी, तिहींची गाडी गेली तर नाहींना? आतांशा एक झाला आहे!" ह्यावर उत्तर देणाऱ्या पहारेकऱ्यालाही थट्टेचा उमाळा आवरला नसला तर नवल नाहीं. तो सांगतो कीं तिहींची गाडी गेली बाराला. "अन्?" ह्यावर त्याचें उत्तर बाराची गाडी येणार तिहीला.' चौथा प्रकार तात्विक ज्ञान सांगणें हा होय. इंदूला वाटतें कीं प्रभाकरानें जें सौंदर्याचें वर्णन केलें त्यांत आपली गणती झाली. त्यावर बिंदू तिला ह्मणते, "भलतेंच कांहीं तरी! मी पण सुंदर नाहीं आणि तूं पण नाहींस." ह्यावर इंदू तिला सांगते, "अग, निदान दोघी मिळून तरी एका सुंदर मुलीसाठीं सामुग्री नाहीं का आपल्या तोंडावर?" ह्याला बिंदू उत्तर देते, "सुंदरपणासाठीं अशी वर्गणी जमा करून का कुठें होतें? सुंदरपणाचा सलंग वाण असावा लागतो" (पान २३). धनेश्वर,–'मालती आली आहेना? मालती, मला तुझ्याशीं थोडें बोलायचें आहे." लतिका–"थांबा बाबा, तुमचा चष्मा आणून देतें, म्हणजे पन्नाशी पलीकडच्या वयांत निदान चाळिशीच्या दृष्टीनें पाहिल्यामुळें तुम्हाला स्पष्ट ओळखूं तरी येईल कीं, तुम्हीं पहायला आणलेली मुलगी कोणती आणि तुमची स्वतःची मुलगी कोणती म्हणून!" (पा. १२६). घनश्याम व मनोहर ह्यांच्या स्मशानांतील भाष-

णांत व महेश्वराच्या भाषणांत हा चौथ्या प्रकारचा विनोद सांपडतो. एखाद्याच्या मनाला टोंचेल बोंचेल असा विनोदाचा पांचवा प्रकार आढळतो. " लतिके, हीं कोळशांतलीं माणकें उघड्यावर टाकूं नकोस म्हणून आपल्या बाबांना सांग " ( पान ३३ ). इंदूबिंदूंच्या कुरुपणाबद्दलचें हें ( पान २४ वरचे ) प्रभाकरांचें भाषण व महेश्वराचीं व इंदूबिंदूंचीं परस्परांना उद्देशून भाषणें, हीं असल्या प्रकारच्या विनोदांचीं उदाहरणें होत. अशा प्रकारचा विनोद मनुष्यकृत मूर्खपणावर नसून नैसर्गिक व्यंगांवरील विनोद, तसाच " पुण्यप्रभावांतील " स्त्रियांच्या पातिव्रत्यावरील विनोद निर्दोष आणि अनुकरणीय नव्हे. ' वेड्यांच्या बाजारां'तील विनोद जन्मजात व्यंगांवर नसून देवऋषी, वैद्यक, ज्योतिष इत्यादि सामाजिक हास्यास्पद रूढी व भोळसर कल्पना, त्याचप्रमाणें त्या वेळच्या नाटकांतील हास्यास्पद गोष्टी यांवर अवलंबून आहे. " राजसंन्यास " नाटकांत आडमुठा देहू शिवाजीचें अनुकरण करितो व प्रेताच्या टाळूवरील लोणी फुकट जाऊं न देणारा जिवाजी कारकून त्याचा रामदास होऊं पाहातो, या गोष्टी विनोदाच्या कुंचलीनें रंगविल्यानें केवळ अनुकरण करणारांना चांगलाच धडा देणाऱ्या आहेत. निरनिराळ्या भाषा वापरून विनोदांत भर घालण्याचा प्रघात बऱ्याच नाटकांतून आहे. कांहीं वेळेस ती ती भाषा बोलणारे पात्र प्रेक्षकांच्या डोळ्याला पाणी आणण्याचा प्रयत्न करीत असतां हंसून हंसून प्रेक्षकांना नकोसें होण्याचा विपरीत प्रकारही आढळून येतो. परंतु त्यामुळें त्या भाषांची टवाळी होते हें मानण्याचें जसें कारण नाहीं तसेंच गोकुळानें आपल्या कुरुप बायकोवर तोंडसुख घेतल्याबद्दल व्यवहारांतील "मथुरा, इंदू, बिंदू " वगैरे नांवें असलेल्यांना राग येण्याचें कांहींच कारण नाहीं. काव्यनिर्मित सुंदरी जशी दुर्लभ, तशी गडकरीनिर्मित कुब्जाही दुर्लभ असते. त्यामुळेंही लाखांत एक, असा अद्वितीय मान मिळालेल्या कुरूप स्त्रीचा राग अनावर होण्याची व ती शोचनीय स्थिती पाहाण्याचें दुर्दैव लाभण्याची भीति

वाटण्याचें कारण नाहीं. विनोदानंतर शृंगाराला प्राधान्य असून याचें पर्यवसान करुणरसांत आहे. म्हणूनच पहिल्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशापासूनचा शृंगाररसाचा भर ओसरत जाऊन तिसऱ्या अंकाअखेर दुसऱ्या शेवटच्या प्रवेशापासून आपली छाया पसरीत येणारा करुण रस चौथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांतील १६७ पानावरील पदाअखेर चढत जातो. तो पुढच्यांच पण " लतिके सर्व दृष्टीनें विचार करूनही हा स्वार्थत्याग अवश्यच आहे का ? या प्रभाकराच्या वाक्यानें त्याला उतार मिळतो व पुढें पुसट पुसट होत जाऊन जरा ह्ायसें वाटतां वाटतां घनश्यामाच्या पाडावानें त्याचा शांत रसांत शेवट होतो. शृंगार अविवाहित परंतु सुशिक्षित स्त्रीपुरुषांच्या भावबंधनाबद्दलचा व विशेषतः चर्चात्मक असल्यानें संस्कृत साहित्यशास्त्रांतील " संभोग विप्रलंभ " वगैरे पारिभाषिक शब्दांचा उपयोग करितां येण्यासारखा नाहीं. पात्रें दर्जानें सारखीं असल्यानें ' रसभाव ' अगर ' रसाभास ' आहे किंवा काय ह्याही भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. नाटकांतील प्रसंगांना पोषक असा वत्सलरसही मधून मधून बहुधा प्रत्येक अंकांत आढळतो. पहिल्या प्रवेशांत घनश्यामाशीं मालतीबद्दल बोलतांना धुंडीराजाला वात्सल्याचें भरतें येतें. दुसऱ्या अंकांतील कुसुम, कुमुद ह्यांचे प्रवेश वात्सल्यरस मूर्तीमंत उभे करणारे आहेत. तिसऱ्या व चौथ्या अंकांतील धनेश्वराचें लतिकेबद्दलचे उद्गार व त्याचें बदललेलें मन त्याच्या वत्सल हृदयाचीच साक्ष देतात

## —:५ नाट्यरचना:—

" एकच प्याला " नाटकाचा शेवट शोकपर्यवसायी करावयाचा हें ठरवून पहिल्याच प्रवेशांत गडकऱ्यांनीं, सुधाकराच्या तोंडीं पुढील वाक्यें घातली आहेत. " सिंधू, परमेश्वर अनुकूल असला म्हणजे हजारों कोसांवरच्या खवळलेल्या महासागरांत सुद्धां तुझ्या प्रयत्नावांचून रामलाल सुरक्षित राहील आणि प्रभूची कृपा एकदां फिरली म्हणजे तुझ्या डोळ्यांदेखत, इथल्या इथं, तुझे

आटोकाट प्रयत्न चालू असतां, महासागर नको, तलावसुद्धां नको, तो अतर्क्य सामर्थ्यवान प्रभू मला एखाद्या लहानशा पेल्यांत सुद्धां बुडवून टाकील." इतकें तो बोलत आहे तोंच त्याला बुडविणारा तळीराम येतो. या पताकास्थानकाच्या अशुभयोगाचा अशुभ परिणाम शेवटपर्यंत दुःखाची मनोवृत्ती कायम ठेवण्यास कारण होतो. तसेंच "भावबंधन" नाटक आनंद पर्यवसायी करण्याचा बेत नाटककारांनीं अगोदरपासून करून ठेवून अंक, प्र. २ अखेर प्रभाकर-मनोहरांच्या भाषणांत तसें स्पष्ट सांगितलें आहे. ( पान ३९ ) "प्रभाकर—मला सर्व ठाऊक आहे. सांगूं तुला आतां ? ही एक मोठी ट्रॅजेडी होणार आहे." "मनोहर, ट्रॅजेडी कसली तुझ्या कपाळाची ! अशा सुंदर आरंभाचा विपर्यास करावयाला परमेश्वर एखाद्या नाटककारासारखा लहरी नाहीं." शेवटीं मनोहर म्हणतो......" या दृष्टीनें मार्गक्रमण करूं लाग; म्हणजे पांच अंक मोजण्याच्या आंत तुझ्या दृष्टीस पडेल कीं, ही एक कॉमेडी आहे म्हणून. यांत नाटक पांच अंकीं असल्याची श्लेषात्मक सूचनाही देऊन ठेवली आहे.

नाटकाच्या सुरवातीलाच घनश्याम आपलें नांव सांगून धुंडीराजाच्या फोनोग्राफाला किल्ली देतो. त्यांतून सर्व पात्रांची सुरेख

अंक १ ला.

ओळख होते. घनश्यामाच्या मागणी घालण्याचें कार्य ह्यांत मुख्य आहे. हा प्रवेश धुंडीराजाच्या वाचाळतेनें व दुसरा प्रभाकराच्या शृंगारिक भाषणांनीं व काव्यांनीं अखेर कंटाळवाणे वाटतात. दुसरा प्रवेश पाश्चात्य धर्तीवर थाटला गेला आहे. सुशिक्षित तरुण स्त्रीपुरुषांचा हा प्रवेश प्रसंगानुरूप उत्पन्न झालेल्या विनोदानें, आणि प्रभाकराच्या नवरामापूर्णाखेरीज इतर सुंदर विषयांवर थोडक्यांत वादविवादात्मक असता तर चांगलें झालें असतें. ह्या प्रवेशांत घनश्याम—धुंडीराज आल्यानंतर नाटकाला रंग चढतो, व शेवटीं नाटकाचें भवितव्य काय असावें, ह्याची सूचना मिळते.

तिसऱ्या प्रवेशांत धनेश्वर आपली ओळख करून देतो. खोट्या दस्तैवजाच्या पायानें व भागीदाराचा मुलगा मोरेश्वर ह्याच्या येण्यानें काय करावें हें न समजून आपली सुशिक्षित कन्या मोरेश्वराला देऊन टाकण्याची तोड तो काढतो. त्याबरोबर तेथें लतिका वगैरे त्याला उपकारी पात्रें न येतां, सूडबुध्दीनें प्रेरित झालेला घनश्याम तेथें येतो व नंतर लतिका वगैरे येतात, झालेल्या भाषणांत वरील बेताला विरोध दिसून आला तरी तो पार पाडणें धनेश्वराच्या हातीं असल्यानें, प्रभाकराला तेथें येण्याची व मराठी भाषा व शिक्षण यांना बंदी वगैरे उपायांचा उपक्रम येथेंच होतो. शेवटी " घरांत वडील माणूस आणण्याची " धनेश्वराची इच्छा दिसून येते. चौथ्या प्रवेशांत महेश्वर—घनश्यामाच्या भाषणांत पुढील नाटकाची रूपरेषा आंखली जाते. महेश्वर प्रेम कल्पनांनीं बहकलेला अर्थात् त्याला काव्यमय प्रसंगांत गुरफटवून टाकण्याचा घनश्याम डाव टाकतो व आपल्या स्वगत भाषणांत आपल्या कपट-नाटकाचा हेतु व त्याच्या सिध्दीचीं साधनें स्पष्टपणें पुढें मांडून आपल्याला जणूं काय तो विश्वासांत घेतो. पांचव्या प्रवेशांत पोलिस वेषांत धुंडी-राजाला फसवितो. एकदां बोलक्या महेश्वराला मोरेश्वर म्हणून पुढें आणून त्याजकडून त्याला दागिनें देववून नंतर ते चोरीचे आहेत हें ठरविण्याकरितां मुखस्तंभ मोरेश्वर साक्षीदार म्हणून पुढें आणून तो कबुली जबाब लिहून घेतो. धुंडीराजाबद्दल सहानुभूति व पुढील अंकांबद्दल कुतूहल उत्पन्न करून पहिला अंक संपतो.

ह्या अंकांत, निष्कारण दुखावला गेलेला घनश्याम लतिकेकरितां सर्वांचा सूड घेण्यास तयार झाला आहे. हें त्यानें उघड सांगितलें असल्यानें त्याच्या परीक्षकांनां तरी तो नितांत दुष्ट वाटत नाहीं. त्याच्या दुरात्मत्वाला सबळ कारण होतें असें दिसून येतें. त्यानें योजलेल्या कारस्थानाला, धनेश्वरा-सारख्या दुय्यम दुरात्म्याच्या कारस्थानाची जोड मिळाल्यानें आधींच प्रेम-

कल्पनांत गुरफटलेलीं प्रमुख पात्रें द्विधावृत्तीचीं होतात. हेतु, साधनें, पात्रांची ओळख ह्यांबरोबरच घनश्यामानें आपल्या कारस्थानांतील कार्यालाही सुरवात केली आहे.

दुसऱ्या अंकांतील पहिला प्रवेश मागें पसार झालेल्या मराठीच्या मुस्कटदाबीच्या कायद्याची अंमलबजावणी दाखविणारा आहे.

अंक २ रा. धनेश्वराच्या घरांत मालती—लतिका, इंदूबिंदू ही मंडळी जमलीं असतां लतिका—मोरेश्वर विवाहाचा वाद सुरू होतो व त्याचा निर्णय लागतो न लागतो तोंच म्हाताऱ्या कानड्याच्या वेषानें गिरसप्पा ऊर्फ प्रभाकर येतो. नंतर घनश्याम आंधळा कामाण्णा बनलेल्या महेश्वराला घेऊन येतो. धनेश्वराची मालतीबद्दलची दृष्टी व तिजबद्दलची आशा उत्पन्न झालेला हा विचार पुढें घनश्यामानें पसंतीकरितां मालतीचेंच नांव पुढें केल्यानें त्याचा रुकार मिळण्यास कारण होतो. महेश्वराला राजरोस घरांत प्रवेश मिळाल्यानें घनश्यामाला पाहिजे असलेले कागद चोरण्याचें काम सुलभ होतें. दुसऱ्या प्रवेशांत अधिकारी मित्रानें कबुलीजबाब वाटेल तो उपयोग करण्यास दिला असें सांगून त्या जोरावर तो धुंडीराजाला आपण सांगूं त्याप्रमाणें मालतीला धनेश्वराला देण्यास भाग पाडतो. धुंडीराज दुःखानें विव्हळ होऊन देवानें यापूर्वींच आपले डोळे कां मिटले नाहींत वगैरे त्याचे विचार चालू आहेत तोंच त्याच्या धाकट्या मुली येऊन आपल्यापैकीं लाडकी कोण हा प्रश्न त्याला विचारतात. त्या विचारण्यानें तो पुन्हा त्यांच्या मायेंत गुरफटून त्यांच्या सुखाकरितां मालतीला दुःखांत लोटण्यास तयार होतो व त्याप्रमाणें तो मालती, प्रभाकर, लतिका, मनोहर वगैरे मंडळी बोलत बसलीं असतात तेथें येऊन आपला निश्चय कळवितो. तो कळून सुद्धां मालतीमनोहराला परमेश्वराच्या साक्षीनें त्याच्याशीं लग्न करण्याबद्दल वचन देते. ह्या दुःखदायक व गंभीर प्रवेशानंतर महेश्वराचा विनोदी प्रवेश आहे. ह्यांत हा आंधळा कानडी गवई मराठी भाषा बोलतो ही

गोष्ट इंदूला समजते. पहिल्या प्रवेशांत मालती–लतिकांच्या सौंदर्याची व सद्‌गुणांची त्याला कल्पना असल्यानें मालतीचें व धनेश्वराचें लग्न ह्या अद्‌भुत बातमीनें त्याचें ढोंग बाहेर पडतें. त्याला इंदूबिंदूच्या स्वाधीन केलेलें असल्यानें त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग न येणें अपरिहार्य आहे. परंतु मराठी भाषा बोलतां येणें ह्या महान अपराधाबद्दल तो इंदूच्या जाळ्यांत सांपडतो व तिला तो लग्नाचें वचन देतो. लतिकेसारख्या सुस्वरूप मुलीशीं विवाह करण्याच्या आशेनें आलेल्याला इंदूसारख्या काळ्या व कुरूप मुलीला लग्नाचें वचन द्यावें लागतें. हें विषम अलंकाराचें उदाहरण असून खालील श्लोकाची आठवण होते. “ अयं रत्नाकरोऽम्भोधिरित्यसेवी धनाशया। धनं दूरेऽस्तु वदनमपूरि क्षारवारिभिः ॥ ” चौथ्या प्रवेशांत मालती धुंडीराजाची भेट घेऊन त्याच्या विपरीत निश्चयाबद्दल त्याला विचारते. तो तिला सर्व हकीगत सांगून विश्वासांत घेतो व लहान भावंडांच्या सुखाकरितां आपण होऊन ह्या लग्नाला तयार आहों अशी मनाची तयारी झाल्याचें ती सांगते. नंतर कुमुद आपलें कुंकू कुसुमनें विसकटविलें म्हणून आपल्या कपाळचें थोडें काढून लाव म्हणून तिला सांगते. ह्यामुळें मालतीच्या दुःखद विचारांना निराशेचें वळण मिळतें. पांचव्या प्रवेशांत महेश्वराला, घनश्यामानें सांगितल्याप्रमाणें, धनेश्वराचे कागद मिळाले असून ते पहात असतां तो बिंदूच्या तडाक्यांत सांपडांतो. तिलाही लग्नाचें वचन देऊन, चोरांच्या सात्विकतेची खातरी पटवून इंदूची भीति दाखवून गप्प करतो. सहाव्या प्रवेशांत धनेश्वराच्या वैभवाकरितां आपण त्याच्याशीं लग्न करीत असल्याचें मनोहराला मालती सांगते व त्याचें चित्त परत करिते.

दुसऱ्या अंकांत नाट्यवस्तूची प्रगती झाली आहे. धुंडीराजावरचा आघात परिणामकारक झाला असून त्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत सर्व मंडळी गुरफटलेली आहेत. तोंच इकडे महेश्वरानें धनेश्वराच्या कागदांची चोरी करून धनेश्वरावरच्या आघाताचा वार भरला आहे. पान ७८ पासून दुसऱ्या प्रवे-

शाच्या अखेरीपर्यंतचा भाग निरर्थक आहे. ह्यांत धनेश्वराकडून धुंडीराजाकडे व धुंडिराजाकडून धनेश्वराकडे अशा गडसास्वडयोंमध्यें लुडबुडणाऱ्या लतिका, मनोहर, मालती, प्रभाकर, इंदू, विंदू यांना धुंडीराज आपला निश्चय सांगावयास जातो. पान ७७ वरील धुंडीराजाच्या शेवटच्या वाक्यांनीं व चौथ्या प्रवेशानें अप्रत्यक्षतः ही गोष्ट घडून आली असती. तसेंच प्रभाकर धुंडीराजाच्या कुटुंबाकरितां काय स्वार्थत्याग करणार याची कल्पना पुढील अंकांतील लतिका–मालतीच्या भेटींत आणून दिली असती तर प्रभाकराचें पोकळ शब्दशूरत्व न दिसतां त्याचा आत्मत्याग दुसऱ्या पात्रांच्या भाषणांत खुलून दिसला असता. मालतीनें मनोहराला दिलेल्या वचनाचा उल्लेख सहाव्या प्रवेशांत आलाच आहे ( पा. ११० ). तोच जास्त स्पष्ट केला असता म्हणजे झालें.

अंक ३ रा. तिसऱ्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत घनश्याम स्मशानांत जाऊन एक खोटी हुंडी खेरीज करून बाकी सर्व कागद एका हिरव्या दगडाखालीं पुरून ठेवीत असून "लतिकेच्या शृंगार–मंदिराचा पाया खणीत असतां" त्याच "रंगमहालांतल्या अखेर झोपेचें स्मशान–वैराग्य मनांत आणीत आहे." दुसऱ्या प्रवेशांत महेश्वर, इंदू व विंदूचा विनोद आहे. दोघींच्याही एकदम तडाख्यांत सांपडल्यानें तो कोणाला फसवीत आहे हें बिंदूला कळत नाहीं. ह्या तिच्या संशयाचा पुढील प्रवेशाला फार उपयोग होतो. तिसऱ्या प्रवेशांत लतिका, धनेश्वर--मालती–विवाहाचा विचार करीत आहे. "एखाद्या माणसाचा बोलका स्वभाव असला म्हणजे त्याच्या बोलण्यांत कधींच कां अर्थ नसतो ?" असा स्वतःचा संशय घेऊन आपण आपल्या बापाला निर्भिडपणें कां बोलावें याचें समर्थन करीत आहे. ह्या गोष्टीनें तिला आपल्या वैभवाचा वीट उत्पन्न केला आहे. नंतर गिरसाप्पा योगवासिष्ठ घेऊन येतो. प्रेक्षकांप्रमाणें लतिकेला हा कोण हें ठाऊक असतें तर,

त्याला " त्या कोपऱ्यांत बसा, आणि त्या पोथीचीं पानें मोजून काढा. सगळीं मोजून झालीं म्हणजे पुनः पहिल्यापासून मोजा आणि इतक्यां उपर जिवंत राहिलांत तर जीव जाईपर्यंत मोजीत बसा," असें तिनें सांगितलें नसतें. त्याच वेळीं मालती येते. तिच्याशीं बोलतांना प्रभाकराच्या सांनिध्याची व सहाय्याची उत्सुकता व त्यावर रागावल्याबद्दल पश्चात्ताप हें तो स्वतः ऐकत असल्यानें प्रसंगानुरूप विनोद येथें उत्तम साधला आहे. नंतर त्याच्या स्वरूपाविष्करणानें लतिकेची उडालेली त्रेधा फार मनोरम वाटते. मागील प्रवेशांतील उसळत्या हास्याच्या मानानें ह्यांत हास्य कमी, परंतु शुद्ध स्वरूपाचें व पुढील गंभीरतेचा भडकपणा जास्त खुलवून दाखविणारा आहे. वेषांतर करून त्यानें आपली परीक्षा पाहिली व तिचा खरा भाव त्याला कळला ह्यामुळें ती रागावते व अल्लडपणानें तीं दोघें एकमेकांशीं भांडतात. व धनेश्वर तितक्यांत तेथें आल्यानें ह्या म्हाताऱ्याच्या सोंगाकरितां रेखाटलेल्या विद्रूप सुरकुत्या त्याला दिसूं नयेत म्हणून तो निघून जातो, हेंही एक प्रकारें बरेंच होतें. लतिका धनेश्वराला कितीही कठोर बोलली तरी हरकत नसते. इतरांचें कठोर बोलणें त्यानें काय म्हणून सहन करावें? मालतीच्या देखत ती आपल्या बापाची निर्भर्त्सना करते. एकीकडे मालतीच्या प्राप्तीची आशा तर दुसरीकडे लतिकेचा त्रागा. ह्या कात्रींत लतिकेबद्दलच्या मातृहीन एकुलत्या एक मुलीबद्दलच्या—वात्सल्याचा विजय होऊन, धनेश्वर लग्नाचा बेत रद्द केल्याचें सांगून दोघींचें सांत्वन करतो ह्या प्रवेशांत गर्हणीय कांहीं असल्यास त्याचा दोष धनेश्वराकडे आहे. आपल्या मुलीबरोबरच्या मालतीला घनश्यामाच्या सांगण्यावरून तो लतिके देखत भेटायला येतो. निंदणाचा वांटा धनेश्वराकडे जात असला, तरी त्याला सद्गुणांची ओळख व्हावयास ह्यांतील प्रसंग कारणीभूत आहेत. प्रवेशाअखेर तो म्हणतो, " लतिके, तुझ्या सदुपदेशानें, मी एवढा पातकी पण आज सद्गुणी झालों. चौथा प्रवेश बिंदु-गिरसाप्पांचा आहे. तिच्या विवाहाच्या विनंतीला मान देऊन लतिकेच्या मनांत

असूया उत्पन्न करण्याबरोबरच प्रभाकराला सहज महेश्वराची माहिती देऊन सावध राहाण्याचा इशारा मिळाला आहे. पांचव्या प्रवेशांत लतिका महेश्वरावर —नव्हे कामण्णावर—प्रेम करण्याचा वहाणा करून प्रभाकराच्या डोळ्यांत अंजन घालूं पाहते. प्रभाकरावर ह्याचा काय परिणाम झाला हें कळत नाहीं. परंतु महेश्वर मात्र ह्यामुळें फसतो. ह्याचा पुढें लतिकेला माल चांगला उपयोग होतो. ह्यानंतर घनश्याम तिची भेट घेऊन त्याच्याशीं विवाह करण्यास तिची अनुमती आहे कीं नाहीं हें तिला विचारतो. त्याचा तिरस्कार करणारी लतिका त्याला झिडकारते.पण तिला तो एवढा जोरांत कां आहे हें कळत नाहीं.त्याच्या मागोमाग धनेश्वराकडे तक्रार करण्याला तीही निघून जाते. सहाव्या प्रवेशांत मनोहराला घनश्यामाच्या पाळतीवर राहाण्यास प्रभाकर सुचवितो.कारण घनश्यामाचा हस्तक व घनश्याम याच दोघांच्या खटपटीनें घरांत दुःखदायक चमत्कार घडत आहेत हें त्याचें अनुमान तो विंदूपासून मिळविलेल्या माहितीवर रचतो. सातव्या प्रवेशांत धनेश्वराला आपले सारे खोटे कागद गहाळ झाल्याचें कळतें. तोंच घनश्याम मागें उभा राहून तें पाहातो व त्याला एक खोटी हुंडी दाखवितो. त्याच्याशीं गडबड करणें व्यर्थ आहे हें धनेश्वराच्या तेव्हांच लक्षांत येतें. व घनश्यामाविरुद्ध तक्रार करण्यास आलेल्या लतिकेला, मालतीशीं आपलें व घनश्यामाशीं तिचें लग्न तीन दिवसांचें आंत लावून टाकणार असल्याचें सांगतो. धनेश्वर गेल्यानंतर आपलें हृदय असल्या जबरदस्तीनें मिळणार नसल्याचें ती घनश्यामाला सांगते. हें तो ओळखून असल्यानें व काव्यकल्पनांची त्याला जरूरी नसल्यानें तिला तिच्याच शब्दांची परतभेट घनश्यामाकडून मिळते.

"मेला तरी एकटा स्मशानांत जाण्याची" महेश्वराची प्राज्ञा नसल्यानें, त्याचें भय राहूं नये म्हणून घनश्याम त्याला ठाऊक असलेले कागदपत्र स्मशानांत नेऊन ठेवतो. दगड धोंडयाचा अभ्यासी" मनोहर याला हिरव्या दगडाबद्दल जिज्ञासा ( चौथ्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत तो घनश्यामाच्या

मागोमाग गेल्यानें ) वाटून त्याच्याच खालीं आपलें चित्र पुरून ठेवण्याची काव्यमय कल्पना त्याच्या डोक्यांत शिरते. तेथेंच खोट्या कागदांचा डबा सांपडून घनश्यामाचें कारस्थान पुढें ढांसळतें. ह्या आपल्या हस्तकाची स्मशानांत न जाण्याची कल्पना व मनोहराचा " दगड धोंड्यांचा अभ्यास ह्या दोन्ही कल्पनांची जोड देऊन त्याकरितां मुद्दाम दोन प्रवेश घातले आहेत. त्या मुळें घनश्याम मनोहरांचे स्मशानांतील एकाचे सुखाच्या मनोऱ्यांचे विचार व दुसऱ्याचे निराशामय जीवनाचे विचार ऐकावयास सांपडतात. परिणामीं एकाचे सुखाचे मनोरे हवेंत उडून जातात व दुसऱ्याच्या जीवन समुद्रांतील निराशेची वाळू पायांखालून नाहींशी होत जाऊन त्याला बुडवूं पहात असतांच त्याखालीं आशेचा खडक लागतो, व समुद्रालाहि आहोटी लागते. परंतु नाट्याच्या दृष्टीनें त्यांत चमत्कृती नाहीं. घनश्यामाचा बावळेपणा मात्र ह्यांत दिसतो. घरांत चोर शिरून त्यांनीं सगळें लांबविल्यावर " तुळशीवृंदावनाखालचा धनाचा हंडा तरी नेऊं नका " असें धर्मश्रद्धेनें ओरडून सांगणारी म्हातारी, व महेश्वर बरळला म्हणून कागद स्मशानांत नेऊन पुरणारा घनश्याम हे दोघे सारखेच कां मानू नयेत ? (ह्या पहिल्या व सहाव्या प्रवेशांखेरीज बाकीचे प्रवेश उत्तम असून नाटकाची परिसीमा ही येथेंच आहे.) चौथ्या अंकांतील पहिल्याच प्रवेशांत मनोहराला घनश्यामाच्या पाळतीवर ठेवल्याचा उल्लेख आल्यानें ह्या अंकांतील सहावा प्रवेश निरर्थक ठरतो. प्रभाकर लतिकांचा आतां विवाह कसा घडून येतो हें विचित्रलीला विवाहासारखें कुतूहल पांचव्या प्रवेशांत वाटूं लागतें न लागतें तोंच घनश्यामाचें कारस्थान सफल होऊन धनेश्वराला तो आपल्या मताप्रमाणें वागावयास लावतो. त्याच्या कारस्थानाच्या आगबोटीला प्रभाकराचें कामण्णाबद्दलचें अनुमान व त्यावरून घनश्यामावर पाळत व महेश्वराची खोट्या प्रेमानें फसगत ह्या दोन भेगा पडल्या आहेत. त्यामुळें शेवटच्या प्रवेशांत विजयी झालेला घनश्याम पुढेंही विजयीच होतो, कीं एक मोठा

स्फोट होऊन त्यांचे कारस्थान रसातळाला जातें, ही उत्सुकता वाढल्यानें नाट्यविषयाची प्रगतीच झाली असें दिसून येतें.

अंक ४ था

चौथ्या अंकांतलि पहिला प्रवेश स्मशानाचा असून धुंडीराजाला दाखविलेली खोटी हुंडी ठेवण्यास घनश्याम जात असतो त्याचा पाठलाग करीत मनोहर तेथें आला आहे. तेथें त्याला खोटे दस्तैवज व धुंडीराजाचा कबुलीजबाब हिरव्या दगडाखालीं सांपडतात. दुसऱ्यां प्रवेशांत धनेश्वर आपल्या पापाचा, घनश्यामाच्या धमकीचा व त्याचा पाडाव करण्याकरितां आत्महत्या करण्याचा विचार करतो. तिसऱ्या प्रवेशांत ह्या आत्महत्येच्या विचाराला दुजोरा मिळतो. ह्यांत तो मालतीची भेट घेऊन ती आपल्याशीं लग्न कां करण्यास तयार झाली हें काढण्याकरितां तिला बोलावतो तो हेतू तर सिद्धीस जात नाहींच परंतु मालतीच्या, "आम्हां मुलांच्या एवढयाशा सुखासाठीं सुद्धां बाबा आपला जीव देतलि;" ( पान १५१ ) ह्या वाक्यानें त्याचा आत्महत्येच्या निश्चय मात्र ठरतो, तिला संशय न येतां, तो लतिकेची काळजी घेण्याचें वचन घेऊन निरवानिरव करूं लागतो. "मी आतां म्हातारा झालों आहे. मनुष्य देहाचा काय नेम सांगावा ? आज आहे उद्यां नाहीं!" वगैरे वाक्यांनीं, अल्लड लतिकेची काळजी घेण्याचें, मालतीशीं लग्न न करण्याचें पुन्हा वचन देणें वगैरे निरवानिरवींच्या गोष्टींनीं त्याच्या विचारांचा सुगावा तिला लागतो. तो गेल्यानंतर लतिकेला बोलावून तिला ती सर्व परिस्थिती स्पष्ट सांगते व तिची कानउघडणी करते. तिच्या बोलण्यानें आज दोन्ही घराण्यावर संकट आल्याचें समजल्यानंतर बापानें घनश्यामाशीं लग्न करण्यास सांगण्याचा अर्थ लतिकेला समजतो. आप्तांच्या सुखासाठीं आपला अभिमान सोडून व आपल्या भावी सुखांचा होम करून घनश्याम इतरांना संकटमुक्त करील तर पहावें म्हणून ती त्याला बोलावते. (परंतु इतकी नम्र होऊन सुद्धां बौद्धिक व नैतिक विजय ती आपल्यावर मिळवूं पहात आहे या विचारानें तो तिची मागणी झिटकारतो.) "आज अभिमान सोडून देऊन

घनश्यामाच्याजवळ मोकळ्या मनानें क्षमा मागून आणि सर्वांच्यासाठीं दीनवाणीनें करुणा भाकून माझ्या ओशाळवाण्या ऋणांतून मी मुक्त झालें, आतां उघड्या डोळ्यांनीं देवाच्या मूर्तीकडे पाहून त्याच्याजवळ दयेची याचना करण्याचा माझ्या मनाला अधिकाराचा धीर आला," असें तिला वाटतें. तिच्या करुण स्वराला ओ देण्याकरितांच कीं काय ईश्वरानें प्रभाकराला तेथें पाठविलें आहे :— तिच्या भावनेप्रमाणें प्रभाकराच्या रूपानें परमेश्वर येऊन सुद्धां तिच्या शोकाचा पूर ओसरत नाहीं, त्याला भरतीच येते. विवाहवचन दुसऱ्याला देऊन आपण त्याचा विश्वासघात केल्याचें ती त्याला सांगते. अशाच कांहीं जबरदस्त संकटानें तिनें ही गोष्ट केली असावी असें वाटून त्याला आपल्या प्रेमाविषया-बद्दल अभिमानच वाटतो. परंतु नंतर "हा स्वार्थत्याग अवश्यच आहे काय ?" असें तो तिला विचारतो व त्याला घनश्यामाच्या कारस्थानाचा उलगडा पडतो. एकमेकांना मिळालेल्या माहितीचे धागे जुळवून, " मालतीला जास्त माहिती असल्यानें " तो मालतीकडे व लतिका-महेश्वरांच साह्य घण्यास जातात. चौथ्या प्रवेशांत महेश्वराला लतिका भेटते. तो सर्व गोष्टी कबूल करतो व घनश्यामानें फसविल्यानें साह्य करण्याचें कबूल करतो. ते कागद कसे मिळवावे हा प्रभाकर—लतिकेला विचार पडतो. तोंच, धनेश्वर त्या रात्रीं आत्महत्या करणार असल्याची बातमी त्यांना सांगण्यास मालती येते. त्याला हातून निसटूं न देण्या-करितां घनश्याम पोलिस—वेषांत येईल, त्या वेळीं आत्महत्येचा नुसता देखावा होता असें दाखवून त्याला खऱ्या पोलिसांकडून बेकायदेशीर वेषांतराबद्दल पकडूं वगैरे विचारांचा खल होत असतां त्यांना शंका येतें कीं, " त्यानें खोट्या हुंड्या उघडकीस आणल्या तर ? " परंतु पहिल्या प्रवेशापासून सांपडलेले कागद घेऊन इतका वेळपर्यंत भटकत फिरत असलेला मनोहर ह्याच नाटकी योगावर तेथें येतो. अर्थात् सर्व अडचणी दूर होतात. घनश्यामाला धनेश्वराच्या आत्महत्येची

बातमी देऊन पोलिसवेषांत आणण्यास महेश्वर व धनेश्वरावर नजर ठेवण्यास मालती गेल्यानंतर लतिका परमेश्वराची प्रार्थना करीत असतां हा अंक संपतो.

ह्या अंकाच्या आरंभीं मनोहराला घनश्यामानें लपविलेले सर्व कागद सांपडतात. त्यामुळें घनश्यामाचा मनोरा आतां गडगडणार असें वाटतें. ह्या प्रवेशाचें विवेचन तिसऱ्या अंकाच्या चर्चेत केलेंच आहे. धनेश्वराच्या स्वगत भाषणाचा एकपात्री प्रवेश मुळीच जरूरीचा नाहीं. त्यांतील महत्त्वाच्या कल्पना पुढच्याच संभाषणांत सूचित आहेत. मालती–लतिकेचीं लांबच लांब भाषणें नाटकगृहांत तरी कंटाळवाणीं वाटतात. मालतीनें लतिकेला उपदेश केला असें लतिकेच्या भाषणावरून समजत असल्यानें, पान १५४ वरील ( लतिका येते) या सूचनेसह पुढचें सर्व भाषण गाळून पान १५७ वरील लतिकेच्या भाषणांत आधीं, " मालतीताई, किती कठोर बोललीस तूं ! " असा संदर्भ घालून नव्या प्रवेशाला प्रारंभ केला असता तरी संदर्भाचीं हानी न होतां चालण्यासारखें होते. कारस्थान कसें उलथून पडणार हें फक्त प्रत्यक्ष पाहावयाचें राहिल्यानें पुढील अंकांत आतां काय आहे हें कळतें. त्यामुळें आणखी दोन प्रवेशांकरितां प्रेक्षकांना बसण्याची जरूरी राहात नाहीं. म्हणून चौथ्या अंकाअखेरचा नाटकाचा शेवट दाखवावयास पाहिजे होता. महेश्वराला लतिकेचें साहाय्य मिळून त्याचीं सर्व कारस्थानें माहित झाल्यानें इंदूबिंदूचें काय झालें हें कळतेंच. त्यामुळें तीं पालें लोंबकळत नाहींत व पांचव्या अंकांतील पहिल्या प्रवेशाचीहि गरज राहात नाहीं. पांचव्या अंकांतील शेवटचा प्रवेश चौथ्या अंकाच्या शेवटीं रंगभूमीच्या सोयीनेंहि दाखवितां येण्यासारखा आहे. परंतु येथेंहि " पांच अंक मोजण्याचे आंत कॉमेडी झालेली दिसेल " ह्यापूर्वी सुचवून ठेवलेल्या कल्पनेला बळी पडून एक अंक वाढविल्याचें दिसतें.

पांचव्या अंकांतील पहिला प्रवेश इंदूबिंदू या विनोदी पात्रांचा आहे. म्हातारा

अंक पांचवा

गिरसाप्पा नाहींसा झाल्यानें बिंदूला पुरुषांच्या लबाडीचा प्रत्यय येतो. इंदू त्याच्या रूपाबद्दल बोलल्यानें पुन्हां एकदां वाईट स्वरूपाबद्दल त्यांच्यांत भांडाभांडी होते. तितक्यांत कामाण्णा येतो. त्याच्याशीं बोलत असतां व लग्न करण्याबद्दल त्याला धमकावीत असतां तो डोळस आहे हें माहीत नसलेल्या इंदूकडे "त्याचें आंधळें प्रेम डोळे वटारून पाहातें" व बिंदूच्या धमकावणीकडे "तो डोळेझांक करतो". तितक्यांत लतिका येऊन कामागिरीबद्दल विचारते. ती यशस्वी झाल्याचें कळल्यानंतर धनेश्वराची विषाची कुपी चोरून तेथें दुसरी नेऊन ठेवण्यास सांगते व सर्व हकीकतीचें थोडक्यांत पत्र लिहून तें भोरेश्वराच्या हातानें धनेश्वराला आयत्या वेळीं जरूरीचें म्हणून देण्याकरितां लतिका जाते. दुसऱ्या प्रवेशांत घनश्याम वगैरे सर्व मंडळी फौजदारासह आलेली आहे. फौजदार घनश्यामाला त्याच्या प्रयत्नांचा फोलपणा दाखवतो व धुंडिराजाचा खोटा कबुलीजबाब त्याच्या जन्माचा सत्यनाश करण्यास कसा पुरेसा आहे हें सांगतो. धुंडीराजाला ह्यामुळें कसेंसेंच वाटतें. परंतु प्रभाकर तो कागद फाडून पुरावा नाहींसा करण्यास हळूच सांगतो. तसें केल्यानें घनश्यामाविरुद्ध असलेला पुरावा नाहींसा होतो. धुंडीराजाच्या निरपेक्ष दयेनें गोगलगाय झालेला घनश्याम त्याच्यापुढें लीन होतो. हा "व्हिलन्" पडला असें पाहून महेश्वर धनेश्वराची क्षमा मागतो व नाटकाचा शेवट करण्याकरितां लतिका व मालती या दोन नायिकांचे हात प्रभाकर व मनोहर यांच्या हातांत देण्यास सांगतो व भरत वाक्यानें नाटक संपतें.

या अंकाची चर्चा चौथ्या अंकाअखेर केलीच आहे.

## १ —:नाटकाचें साध्य:—

कै. गडकऱ्यांच्या पूर्ण नाटकांत ' प्रेमसंन्यास ' पुनर्विवाहाच्या समर्थनार्थ, " पुण्यप्रभाव " पतिव्रतांचा पुण्यप्रभाव दाखविण्याकरितां व ' एकच प्याला ' मद्यपानाच्या दुष्परिणामाकरितां, अशीं रचिलीं गेलीं आहेत. अपूर्ण ' राजसंन्यास ' सुद्धां ' राजा हा उपभोगशून्य स्वामी ' हें दाखविण्याकरितां रचिलें गेलें आहे. परंतु ' भावबंधन ' कोणत्या हेतूनें लिहिलें गेलें आहे हें ठरविणें कठीण आहे. ' राजसंन्यासा ' खेरीज इतर नाटकांच्या नांवावरून बोधक, परंतु ' राजसंन्यासा ' वरून नाट्यविषयाची स्पष्ट कल्पना होते. ह्या मार्गानें दाखल्यांच्या आधारावर ' भावबंधना 'ची नाट्यविषयक कल्पना काढली तर ती समाधानकारक वाटत नाहीं. हाताखालच्या कर्तबगार नोकराचा निष्कारण पाणउतारा आणि तोही जेथें तो वधू पाहावयास आला तेथें व त्या वधू देखत झाला नसता तर घनश्याम, मालती–मनोहर व लतिका–प्रभाकरांच्या ' भावबंधना ' आड आला नसता असें म्हणण्यास हरकत नाहीं. खोट्या कागदांमुळें धनेश्वर, लतिकेला भागीदाराच्या मुलाला देऊं पाहतो ह्या कारस्थानाची विल्हेवाट लागली नाहीं; त्या अर्थी तें लोंबकळण्याइतकें कमकुवत तरी वाटलें असलें पाहिजे अगर त्याचा नाटककारांना विसर पडला असावा. तें तडीला लाविलें असतें तर ' भावबंधन ' हें नांवाप्रमाणें नाट्यविषयक तत्त्व इतर नाटकांप्रमाणें जोरदार ठरलें असतें. कारण धनेश्वराच्या खोटया हुंड्यांचा अडथळा आपल्या भावबंधनाला येणार हें लतिका–प्रभाकरांला ठाऊक असल्यामुळें त्याला तोंड देण्याची तयारी करावी लागली असती. नाटकाचें साध्य निरनिराळ्या दृष्टींनीं ठरवितां येतें. धार्मिक व कर्मठ मनोवृत्तींचा मनुष्य पुनर्विवाह होऊन अनाचार होण्याचें लीलेच्या विषप्राशनानें टळून प्रेमविलासाचा ' प्रेमसंन्यास ' झाला म्हणतील. नाटकाची मांडणी आनंदपर्यवसायी झाली असून अखेर केवळ लहरीनें नाटक शोकपर्यवसायी झालें आहे असें कित्येक म्हणतात. परंतु शेवट

होण्याबद्दल मतभेद असला तरी पुनर्विवाहाचें समर्थनच ह्या नाटकांत आहे असेंच सर्वजण म्हणतील. ‘ पुण्यप्रभाव ’ वगैरे नाटकांबद्दल असेंच एकमत आढळून येईल. परंतु भावबंधनाकडे अध्यात्मिक दृष्टीनें पाहाणारे, ‘ अज्ञानाचें उथळ हास्य, आत्मप्रौढीचें अचरट हास्य, उपहासाचें सुतीक्ष्ण हास्य, लोभाचें निष्ठुर हास्य, अपराधाचें भेसूर हास्य व निराशेचें विषण्ण हास्य हीं हास्याचीं रखरखीत वाळवंटें ओलांडून अंतःकरणाला अश्रुसागराच्या पवित्र तीर्थाला नेणें हेंच या नाटकाचें उद्दिष्ट आहे” असें म्हणतात. ( टि. म. त्रैमासिक वर्ष २ अंक ४ वि. रा. करंदीकरांचा “ मालती व लतिका ” लेख).

नैतिक दृष्टीनें पाहाणारे म्हणतात कीं, “ घनश्यामाचा पाणउतारा केल्यामुळें लतिकेचा सूड उगविण्याकरितां त्यानें कारस्थान रचिलें. परंतु घनश्यामाच्या सर्वांच्या सुखाचा नाश करण्याच्या इच्छेमुळें इतर पात्रांचें ‘भावबंधन’ शुद्ध व सात्विक ठरून त्यांचा विजय झाला. ” दोन्हींपैकीं एकहि दृष्टी ज्यांना मान्य नसून केवळ वाचतांना अगर पाहतांना सहज लक्षांत येणारी प्रबळ भावना पाहिजे, त्यांना ह्यांत कांहींच हातीं लागत नाहीं. सामान्य बुद्धीच्या माणसाला आध्यात्मिक कल्पना कितपत रुचेल याची शंकाच आहे. नाटक हें दृश्यकाव्य असल्यानें प्रत्येक अंकाअखेर पुढें दिसणाऱ्या प्रसंगाच्या उत्सुकतेबरोबरच कांहीं प्रसंगांबद्दल व शेवटाबद्दल स्वतःच्या मनाशीं प्रेक्षक कांहीं अनुमानें बसवीत असतो. तीं बरोबर उतरलीं तर त्याला साहजिकच फार आनंद होतो व त्याच्या अपेक्षेन्यावर जरी शेवट झाला तरी हरकत नसते. तो आपली चूक शोधून काढतो. पण जर अपेक्षेच्या विपरीत शेवट झाला तर त्याचा विरस होतो. या दृष्टीनें पाहतां नैतिकवाद्यांची कल्पना तर्काला पटते. वरीलप्रमाणें आध्यात्मिक दृष्टीनें पाहिलें असतां “श्रीमद्भगवद्गीता” ही जशी, रूपकात्मक आहे असें सांगण्याप्रमाणें सर्वच प्रसिद्ध लेखकांचीं नाटकें, काव्यें, इतिहास, कादंबऱ्या, गोष्टी वगैरे रूपकात्मक ठरून त्यांतलें बहुतेक स्वारस्य

संपुष्टांत येईल. तिसऱ्या वर्गांतील टीकाकारांची व नाटकांतील साध्याची मुकामूक येवढ्याचमुळें होते कीं, नेहेमीं आपली दृष्टी असते सत्प्रवृत्त व्यक्तींच्या कार्याकडे व त्यांच्या आड येणारीं संकटें कशीं टळतात याकडे. "भावबंधनांत" आपली दृष्टी व सहानुभूती तर खेंचली जाते घनश्यामाकडे व तो तर सांगून सवरून दुरात्मा बनलेला. नाटकाच्या साध्याकडे नैतिकांच्या दृष्टीनें पाहिलें असतां दुसरीहि गोष्ट नजरेस येते कीं, नाटकाचा प्रारंभ, विकास, परिसीमा, उलगडा व शेवट ह्या गोष्टीहि सुसंगत दाखवितां येतात व त्यामुळें तिसऱ्या प्रकारच्या लोकांचा समज दूर करितां येतो. पहिल्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत घनश्यामानें मालतीची अनुमति मिळविल्यास धुंडीराज घनश्यामाला मालती देण्यास तयार आहे. परंतु पुढच्याच प्रवेशांत घडलेल्या विपरीत व अनपेक्षित अनुभवानें नाटकाला सुरवात होते. पहिल्या अंकात सर्व पात्रांची ओळख, घनश्यामाच्या प्रतिकाराचा आंगखडा व त्याचें पहिलें दुष्कृत्य ह्यांमुळें पुढील अंकांत विकास दृष्टीस पडतो. त्यांतच धनेश्वर ह्या खऱ्या परंतु दुय्यम दुरात्म्याचे बेत दृष्टीस पडतात. पुढील अंकांत धनेश्वरानें आपल्या हेतुसिध्यर्थ योजलेल्या उपायांचा फायदा वेषांतर करून प्रभाकर व घनश्याम हस्तकांकडून करून घेतात. त्यांतच धनेश्वर–मालती –विवाह ह्या घनश्यामाच्या कारस्थानाचा आघांत बसून सर्वांच्या चित्तवृत्ती त्यांत गुंगून जातात. महेश्वर त्याचा फायदा घेऊन धनेश्वरावरच्या आघाताची तयारी करून देतो. ह्या दोन भोंवऱ्यांत कथानकांतील पात्रें गिरक्या खात असतांच प्रभाकर–लतिका एकमेकांचें प्रेम, असूया उत्पन्न करून करोटीला लावतात. त्यांत प्रेमासंबंधीं कांहींच निष्पन्न होत नाहीं. परंतु चौथ्या अंकांतील कथानकाच्या या गुंतागुंतीचा उलगडा करणाऱ्या सूत्रांचे दोन पदर सहज त्यांच्या हातीं लागतात. ह्या अंकांमधील चौथ्या व पांचव्या प्रवेशांत चाललेल्या भावबंधनाच्या लपंडावाच्या खेळांत वाटणाऱ्या मनोरंजक शांततेचा घनश्यामाच्या आगमनाच्या सूचनें भंग होऊन पुढील वादळाची छाया पसरते व शेवटच्या

सातव्या प्रवेशांत सर्व बेत व वचनें बाजूला सारून लाडक्या लतिकेची तक्रार-सुद्धां न ऐकतां धनेश्वर लतिकेला घनश्यामाशीं तिचा विवाह होणार असल्याच निश्चित सांगतो. येथें कथानकाची परिसीमा होते.

सर्वांचा पाडाव होऊन घनश्याम विजयी होणार असें तर वाटतेंच परंतु असें होऊं नये, कांहींतरी तोड निघून सर्वांच्या सुखाला आग लावणारा घनश्याम सर्वस्वी विजयी होऊं नये असें वाटतें. चौथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत ममोहराला घनश्यामानें चोरलेले कागद सांपडतात. त्यामुळें कार-स्थानाचीं गुंतागुंत सुटण्यास मोठीच मदत होते. धुंडीराजाचा आत्महत्या कर-ण्याचा बेत, मालतीची कानउघाडणी, लतिकेचा शोक व घनश्यामाला शरण जाणें व त्यानें तिचा धि:कार करणें, ह्या गोष्टी पुढें घडून येतात. परंतु त्यामुळेंच प्रभाकराला धनश्यामाच्या सूत्रचालकत्वाचा सुगावा लागून तो त्याचा पाडाव करण्याची तयारी करतो तोच महेश्वराचें व मनोहराला सांपडलेल्या डब्याचें सायाय्य मिळून थोड्याफार सावधगिरीच्या योजनेमुळें पांचव्या अंकांत घनश्यामाचा पाडाव होऊन " भावबंधनाचा शेवट गोड होतो.

## —:७ भावबंधनाचे गुणदोषविवेचन.:—

पाश्चिमात्य अगर पौर्वात्य नाट्यशास्त्राचे नियम पुढें ठेवून त्यांच्या कसोटीला या नाटकांतील भूमिका, नाट्यवस्तु, नाट्यरचना वगैरे उतरतात कीं नाहीं हें पाहाण्याचा प्रयत्न येथें झालेला नाहीं. कै. गडकऱ्यांचीं विशेषतः नाटकेंच पुढें ठेवून त्यावरून सदाभिरुचीला पटणारे नियम काढून हें परीक्षण करण्याच हा प्रयत्न आहे. नाट्यशास्त्राच्या दृष्टीनें त्यांच्या नाटकांत पुष्कळ चुका असतील, परंतु त्यांपासून सुद्धां त्यांचीं नाटकें पाहण्याची, वाचण्याची इतकेंच नाहीं तर अभ्यासण्याची प्रवृत्ति वाढत आहे. ह्यावरून त्यांच्यांत तसेच कांहीं विशिष्ट गुण आहेत असें म्हणावें लागत. शिवाय पाश्चात्य टीकाकारांना पूर्वीच्या

भावबंधनाचें वैशिष्ट्य.

नाट्यशास्त्रांतील हल्लींच्या परिस्थितीला उपयोगी पडणारे नियम कायम ठरवून त्यांत प्रचालित व उपलब्ध वाङ्मयावरून जसे नियम तयार केले तसे आपण तरी कां करूं नये ? मराठी वाङ्मयांत ज्यांनीं आपल्या नाट्यग्रंथांची भर टाकली, इतकेंच नव्हे तर मराठी रंगभूमीला निरनिराळे अलंकार घालून तिच्या वैभवाला परिणतावस्था आणली त्या किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडीलकर, केळकर, गडकरी वगैरे पहिल्या प्रतीच्या लेखकांच्या नाटकांचा वेगवेगळा अभ्यास करून त्यावरून आपण आपलें नाट्यशास्त्र तयार कां करूं नये ? हीच दृष्टी ठेवून हा अल्पसा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत नाटकांतील बऱ्याच गोष्टींचा विचार केला आहे. पुनरुक्तीचा दोष पत्करूनही त्यांत उणेपणा राहिला असेल. ह्या नाटकांतील विशेष खालील गोष्टींत दिसून येतात; सूत्रचालकाचें कर्तृत्व, त्याला दुय्यम दुरात्म्याची जोड, विविधस्वभावदर्शन, सहज तोंडीं येणारी कोटीबाज भाषा, कल्पनांच्या भराऱ्या व विनोद. " राजाचें बंड " नाटकांत जशा सद्‌-सत्प्रवृत्त बाजू बिनतोड रंगविल्या गेल्या नाहींत तसाच प्रकार येथें दिसतो. पण ' भावबंधनां'तलें स्वारस्य मात्र त्यामुळें कमी झालेलें नाहीं हें स्पष्ट आहे. कांहीं वेळ ह्या बाजूला तर कांहीं वेळ उलट बाजूला हेलकावे खात प्रेक्षकांचें कुतूहल वाढवीत नेण्याची कला सर्व प्रमुख नाटकांत दिसून येते, व ती अनु-करणीय आहे. गडकऱ्यांच्या "पुण्यप्रभावांत "ही हा प्रत्यय येतो. वसुंधरा, कालिंदी व ईश्वर, वृंदावनाच्या विरुद्ध खटपटी चालू ठेवून कुतूहल वाढवितात. बाकीच्या नाटकांत ही गोष्ट थोड्याफार प्रमाणांत आढळते. मात्र ह्या नाटकांत तसें कांहीं दिसत नाहीं. प्रभाकरादि सत्प्रवृत्त पात्रें आपल्याच कल्पनांत गुतलेलीं. परंतु त्या तरी बाबतींत इच्छित वस्तु प्राप्त करून घेण्याकरितां धडपडत आहेत असें दिसत नाहीं. त्यामुळें घनश्याम काय करतो याच गोष्टीकडे कुतूहलपूर्ण दृष्टीनें आपण पाहातों. केवळ दुष्टबुद्धीनें कपटनाटक करण्यास तो तयार झाला नस-ल्यानें हातीं येतील त्या साधनांचा, माहितीचा व व्यक्तींच्या व्यंगांचा उपयोग

करून घेऊन पुन्हा तो त्यांच्याकडे वळून पाहात सुद्धां नाहीं. त्यांचे क्लेश पाहाण्याची त्याला आवड नसून, देण्याघेण्यावांचून निष्कारण पदरीं पडलेला तिरस्कार व उपहास ह्यांबद्दल त्याला चीड आलेली आहे. त्याला विरोध करणारांना दूर करतांना भलतेंच कृत्य होऊं नये म्हणून त्याचे प्रतिस्पर्धि कर्तृत्वहीन दाखविले व त्यांना विशेषतः भावनाप्रधानच रंगविले आहेत.

भाषेच्या दृष्टीनें अंक १ प्र. पहिला यांतील धुंडीराजाची भोळीभाबडी व विनोदप्रसू भाषा ऐकावयास घनश्यामासारखा रसिक गरजु श्रोता मिळाला असून त्याचेंही भाषण मनमोकळें व उच्चविचारपूर्ण आहे. चौथ्या प्रवेशांतील घनश्यामाचें स्वगत भाषण, दुसऱ्या अंकांतील धुंडीराज–मालती व मालती–मनोहर यांचे प्रवेश, चौथ्या अंकांतील धनेश्वराचे स्वगत भाषणाचा प्रवेश, या सर्वांत विशेषतः लतिका–घनश्यामांचा या अंकांतील प्रवेश अत्यंत बहारीचा आहे. प्रेम कीं कर्तव्य हा प्रश्न ज्या ज्या वेळीं नाटकांत आलेला आहे त्या त्या वेळीं एकाच प्रसंगाची पुनरुक्ती होत असूनही त्यांत पुनःपुन्हा खोल शिरावेंसें वाटतें. आपल्या हातून अपराध घडला परंतु त्याबद्दल प्रायश्चित्त भोगावें न लागतां ईश्वरानें खुशाल क्षमा करावी अशी आपली सर्वांची इच्छा असते. पण गडकऱ्यांनीं लतिकेच्या तोंडीं घातलेले विचार कृतींत आणण्यासारखे आहेत ( पान १६५ ). मात्र " अनंतस्वरूप लीलावतारी परमेश्वर " आपल्यालाही " एखादें प्रेममय, दयाशील व सौम्य स्वरूपांत दर्शन " देईल अशी मात्र अपेक्षा ठेऊं नये. दोन प्रेमळ जीव एकमेकांपासून दूर झाले कीं त्यांना विरहदुःख सहन करावें लागतें हा विरहाचा एकच अर्थ आपणांस ठाऊक होता. परंतु महेश्वर हा विरह सहा प्रकारचा आहे असें सांगतो. संस्कृत–प्राकृत कवींनीं स्त्रीसौंदर्याचे अलंकार कायम ठशांतले अर्पण केलेलेच आहेत ते नको आहेत कोणाला ? परंतु विरुद्ध बाजूलाही काळ्या रंगाखेरीज बरीच सामुग्री लागते हें तरी दाखवून द्यावें म्हणून इंदूबिंदूचा विषम अलंकार

महेश्वराला नजर केला आहे. ह्यामुळें विनोदाला भरपूर वाव मिळाला आहे, भाषा, कल्पना, विनोदाप्रमाणेंच इतर नाटकांत न सांपडणाऱ्या पात्रांनीं हें नाटक सजविलें आहे. घनश्याम, धुंडीराज, महेश्वर, प्रभाकर, मनोहर, इंदू-बिंदू यांच्या सारखीं पात्रें गडकऱ्यांच्याच काय पण इतर नाटककारांच्या नाटकांत आढळत नाहींत. धनेश्वर व्यवहारांत पुष्कळदां आढळतो. मालती, लतिका ह्या कांहीं बाबतींत 'सिंधू' व 'सुशिला' ह्यांच्या सारख्या आहेत असें वर दाखविलें आहे. इतर बाबतींत त्यांचें कोणाशींच साम्य नाहीं. स्वभावदर्शना-प्रमाणें विनोदांतही विविधता आहे त्याचेंही वर्णन वर आलेंच आहे.

"भावबंधन" नाटकाचें वैशिष्ट्य गडकऱ्यांच्या इतर नाटकांपेक्षां कशांत

दोष आहे हें सांगितल्यानंतर त्यांतील थोडेसे दोष पहावयाचे आहेत. पहिल्या अंकांतील प्रभाकरादिकांच्या दुसऱ्या प्रवेशांत आलेल्या 'नवरामा वर्णनांत' अश्लीलपणा आहे. उदाहरणार्थ, पान १७ वरील प्रभाकरांचें मालतीला उत्तर, सदभिरुचीला व स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजांत बोलतांना न शोभणारें आहे. त्यापेक्षांही त्याचें लतिकेचें प्रश्नार्थक स्पष्टीकरण तर सर्वथैव अयोग्य आहे. रंगभूमीवरील प्रयोगाच्या आटोक्यांत नसणारीं लांबचलांब वर्णनें व व्याख्यानें हा दुसरा दोष यांचा तर ह्या नाटकांत अतिरेक झाल आहे. "एकच प्याल्यांतील" लांबलचक भाषणें ऐकण्याची तयारी सुधाकर येतो त्या वेळीं ठेवावी लागते. परंतु येथें घनश्याम, मालती, मनोहर, धनेश्वर यांपैकीं कोण, केव्हां येऊन वक्तृत्व ऐकतील ह्याचा नेमच नाहीं. स्वगत अगर लांब भाषणें चांगलीं वाटतात, परंतु त्यांत मानसिक विकाराची खळबळ उडाली असतां व ती प्रेक्षकांना दाखविणें जरूर असेल तेव्हांच; उदाहरणार्थ, घनश्यामाचें अं. १ प्र. ४ मधील अगर लतिकेचें चौथ्या अंकांतील घनश्यामाला शरण जाण्यापूर्वीचें भाषण. ज्या साधनामुळें नाटकांतील गुंतागुंतीचा उलगडा होऊन दुरात्मा पाडाव व्हावयाचा तीं या नाटकांत फारच कमजोर आहेत.

शेक्सपिअरच्या " मर्चंट ऑफ व्हेनिस " नाटकांत न्यायकचेरींतील प्रवेशांत वेषधारी पोर्शिया, दस्तैवजांतील अक्षरन् अक्षर खरें करून घेईन म्हणणाऱ्या शायलॉकच्याच शद्बांतून प्रथमतः अकल्पनीय परंतु अखेरीस तर्काला पटणारे तोंडीस तोंड मुद्दे काढून दुरात्म्याचा पराभव करते. अशा प्रकारचे प्रसंग श्री. केळकरांच्या नाटकांत सांपडतात. डोक्यांत आलेली कल्पना प्रस्तुताला उपयोगी पडो वा न पडो ती लादणें हा दोषच म्हटला पाहिजे. महेश्वराची स्मशानांत मेला तरी एकटा न जाण्याची कोटी चांगली विनोदी आहे. पण त्या एका कल्पनेकरितां स्मसानांतले दोन प्रवेश, व दुरात्म्याच्या पाडावाचें सुलभ साधन घालवें लागलें व मनोहराला ' दगडधोंड्याचा ' अभ्यास करावा लागला. धनेश्वरांशीं मालतीचें लग्न, हा प्रकार निंद्य नाहीं ( धनेश्वराखेरीज ) असें कोणीच म्हणणार नाहीं. परंतु तो बालावृद्ध विवाह ठरत नाहीं. चूल-बोळकीं खेळणारी लहान मुलगी व अगदीं जख्ख म्हातारा ह्या दोन्ही अंत्य टोकांचीं हीं वधूवरें आहेत अशी कल्पना करून प्रभाकर–लतिकांच्या तोंडी पुढील वाक्यें घातलीं आहेत ( पान ७९ ). " प्रभाकर–बाकी एका अर्थी साठीच्या सुमारांतला नवरदेव आणि आठीच्या आटोक्यांतली नवरी मुलगी अशी जोडी परस्परांना अनुरूप तर खरोंच ! बालवधू गुडघ्यांत मान घालून बसलेली आणि वृद्धकाच्या वयोभारामुळें गुडघ्यांत मान आलेली ! कंबरेची कमान झाल्यामुळें दोघांचीही उंची सारखीच ! वराच्या अंगाला वार्धक्यामुळें कंप सुटत असतो तर बापड्या बालिकेचा भीतीनें थरकांप होत असतो ! इकडे वधूचे दुधाचे दांत पडूं लागतात, तरी तिकडे वराचे कायमचे दांत पडत असतात. वधूवरांची अनुरूपता यापेक्षां ती आणखी कोणती असायची ? " म्हाताऱ्याचे वर्णन धनेश्वराला यथायोग्य लागू पडतें कीं नाहीं हें लतिकेला विचारण्याची सोयच राहिली नाहीं. कारण पुढें लगेच ती दुजोरा देते, " वृद्धवराच्या थेरड्या थोबाडाच्या बोळक्याची बालवधूच्या चूल–बोळक्यांच्या चिमुकल्या

साजांत भर पडेल, हा सुद्धां एक लाभच म्हणायचा." विशेषतः या व इतर पुष्कळशा प्रभाकराच्या भाषणांवरून अस्वाभाविकता हा दोष आढळून येतो. मालती–धनेश्वर–विवाहाचें उपहासात्मक वर्णन करितां येईल. परंतु इतके शब्द बोलून, विशेषणें व अनुप्रास जुळवून व गैर लागू कल्पनांसकट झालेलें हें वर्णन, प्रेक्षकांचें प्रसंगाशीं तादात्म्य करणारें नसून विरस उत्पन्न करणारें आहे. पान ४२ वरील प्रभाकराचीं भाषणें व विशेषतः धनेश्वरादेखत त्याला उद्देशून उच्चारलेलें वाक्य प्रभाकराच्या उद्धटपणाचा आणि अस्वाभाविकतेचा नमुना आहे. " प्रभाकर–बरोबर आहे, कोंवळ्या बापाची कोंवळ्या मनाची मुलगीच कीं नाहीं तूं? लतिके, तुझ्या बापाच्या हलक्या प्रकृतीच्या पचनीं पडतील असे पथ्याचे शब्द कोठून आणूं मी?" असले शब्द ऐकून घेणारा व लहान मुलाला गप्प बसवितांना वापरावयाच्या शब्दांत त्याला गप्प बसविणारा धनेश्वर, प्रभाकराच्या सलगीपेक्षां ग्रंथकर्त्याच्या भिडेनें असें करितो असें वाटतें. प्रतिज्ञेच्या करामतीनें उत्पन्न केलेल्या चार घटकांच्या काल्पनिक सृष्टांत ग्रंथकारानें आपलें व्यक्तित्व आणून हा आभास मोडणें हा दोषच म्हणावा लागतो. संभाषणांत होतां होईल तों एक भाषा यावी हा, "प्रेमसंन्यासां"तला स्वतः नाटककारांचें नियमन करणारा नियम चुकवून, 'ओव्हरकोट,' 'प्रॅक्टिस,' 'यस, राईट् बरोबर आहे' इत्यादि शब्द व सबंध वाक्यें ह्या नाटकांत घुसलीं आहेत. इतकेंच नव्हे तर पाश्चात्य पद्धतीचें अनुकरण होऊं नये अशीं वाक्यें लतिकेच्या तोंडीं पान ६७ वर आढळतात. अशा पाश्चात्य तऱ्हेचीं भाषणें, प्रवेश व लतिकेसारखी पाश्चात्य धर्तीची पहिल्या दोन अंकांतील नायिका कां निर्माण केली हें समजणें कठीण आहे (पान ४५ वर). " घनश्याम–पहिल्या पिढींत सुधारणेचा शुकपाठ झाला तो पुरे झाला. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रथमदर्शनकाळीं तिची नुसती तोंडओळख करून घ्यावयाची होती. आतां ग्राह्यांश ठरविण्याची वेळ आली आहे." मग हा नाटककर्त्यांना ग्राह्यांश वाटला की काय? पात्रांच्या स्वभा-

यांतील दोष नाट्याच्या साध्याच्या दृष्टीनें पुष्टिकारक असतात व तसें प्रमुख पात्रांच्या कर्तृत्वहीनेतचेंही समर्थन मागें केलेंच आहे. परंतु ह्या सदरांत आलेल्या दोषांचा नाट्यकलेच्या दृष्टीनें कांहीं उपयोग नव्हता म्हणून येथें दाखविलें आहेत.

गुण

अभ्यासकाच्या दृष्टीनें वाटणारे दोष वर दाखविले आहेत. त्यांना बगल देऊन सुद्धां बरेचसे गुणही सांगावयाचे शिल्लक राहातातच. कै. गडकऱ्यांनीं ज्या गुणदोषांची पात्रें घेतली त्यांच्याकडून विविध साधनांच्या, प्रसंगांच्या व कल्पनांच्या जोरावर नाटयरचना–कौशल्य दाखवून नाटक चांगलेंच रंगविलें आहे. त्याचें सविस्तर वर्णन योग्य ठिकाणीं असून अधिक परिणामकारकपणा त्यांत कसा उत्पन्न झाला असता हेंही अभ्यासकाच्या दृष्टीनें दाखविलें आहे. घनश्याम, धनेश्वर, लतिका, प्रभाकर, मालती व महेश्वर हीं सहा प्रमुख, धुंडीराज मनोहर, इंदू व बिंदू हीं चार दुय्यम व कुसुम, कुमुद व मोरेश्वर हीं तीन गौण पात्रें मिळून तेरा पात्रांचें स्वभावदर्शन व कार्य स्पष्टपणें दाखविलीं असून तीं कोठेंही निरुपयोगीं वाटत नाहींत व संदर्भरहित अशीं लोंबकळण्यासारखींही वाटत नाहींत. हा ह्यांतला प्रमुख गुण म्हटला पाहिजे. कै. गडकऱ्यांच्या दीड–पानी नाटकाचा " मूक–नायक "–विक्रांत हा या नाटकांत मोरेश्वराच्या रूपानें अवतरला असून आपलें पाप लपविण्याकरितां कसल्याप्रकारच्या माणसाला लतिका द्यायला धनेश्वर तयार झाला हें वर्णनापेक्षां जास्त परिणामकारक रीतीनें दाखविलें आहे. संस्कृत नाटकांप्रमाणें ' पताकास्थानकें' या व इतर नाटकांत घातल्याचीं उदाहरणें वर आलींच आहेत. कुसुम

कुसुम–कुमुद

व कुमुद ह्यांना नाटकांत दोनदां आणून त्यांच्याकडून दोन विशिष्ट कार्यें करवून घेतलीं आहेत. धुंडीराजाला आपल्या सांगण्याबरहुकूम वागावयास लावून घनश्याम निघून गेल्यानंतर, " मालतीचा बळी देऊं, कीं कोठेंतरी तोंड काळें करूं, कीं

जीव देऊं ?" वगैरे विचार करावयास वेळ न देतां नाटककारांनीं त्याच्या दुःखाच्या ओघांत, कुसुम-कुमुदच्या, "आहें ना हो बाबा, मी तुमची लाडकी ?" "मी हो बाबा ?" या प्रश्नांनीं, वात्सल्यरसाचा ओघ मिळवून नाइलाजानें त्याला मालतीचा बळी देण्यास भाग पाडलें आहे. त्याचप्रमाणें मालतीला खरी हकीकत सांगून व आशीर्वाद देऊन धुंडीराज गेल्यानंतर मालती ईश्वराला आळविते, "देवा, मला धीर द्या." तोंच कुमुद येऊन तिला म्हणते, "ताइ, कुसुमताईनें हें बघ माझें कुंकू विसकटलें ! नीट रेखून लाव पाहूं ?" "मालती—लावतें बरें बाळ, जा कुंकवाचा करंडा घेऊन ये." "कुमुद--मी नाहीं जात करंडा आणायाला ! वाटेंत कुसुमताई उभी आहे, तुझ्याच कपाळींचें थोडें कुंकू काढून माझें कुंकू नीट कर." अशा रीतीनें ह्या अजाण कुमुदनें तिच्या कपाळच्या सौभाग्यांतलें आपल्या करितां सौभाग्य मागितलें खरें, पण पुढें ती मालतीला म्हणते, "ताइ, अग तुझें कुंकू विसकटलें पण ! करंडा आणून लाव पुन्हा नीट बरें कां ?" हें गूढ पताकास्थानक आहे. त्याचा अर्थ समजून मालतीनें 'तथास्तु' म्हटलें. "शाकुंतलां"त दुष्यंत—शकुंतलेला गौतमी येत असल्याचा इषारा मिळण्याकरितां पडद्यांत चक्रवाकांना उद्देशून गौतमीच्या तोंडीं एक वाक्य घातलें आहे. तसेंच आपल्या गांधर्वविवाहाची आठवण होऊन शकुंतलाविरहानें दुःखी झालेल्या दुष्यंताला सावध करण्याकरितां व करुणरसाला विरोधी अशा शौर्यवीर्याच्या भावना जागृत करून त्याला इंद्रसाहाय्यार्थ नेण्यास आलेला मातली एक विलक्षण युक्ती योजतो. अदृश्य रूपानें मैत्रेयाच्या कुचेष्टा करून त्याच्या रक्षणार्थ रागानें धनुष्यबाण घेऊन दुष्यंत आल्यानंतर तो प्रगट होतो व त्याला इंद्राचा निरोप सांगतो. एकाच विचारांत घुटमळलेल्या मनोवृत्तींचा ओघ इष्ट विचारांकडे वळविण्याचें कार्य ह्या क्षुद्र वाटणाऱ्या प्रसंगांनीं केलें आहे. तसाच वरील प्रसंग घालून त्यांचा उपयोग करून घेतला आहे. नाटकांत आलेल्या उल्लेखांवरून कै. गड-

यांचें इंग्रजी, संकृस्त व मराठी वाचन दांडगें होतें असें दिसून येतें व त्यांचा तसा उपयोगही त्यांनीं करून घेऊन आपलें नाविन्य नव्या राजाच्या शिक्क्याच्या मोहोरांप्रमाणें प्रस्थापित केलें आहे. त्यांच्या सामाजिक नाटकांत उच्चनीच भाव नसतो. कारण बहुतेकांच्या भाषणांत, विनोद, कोट्या, सुबोध वचनें, आढळतात. नेहमींच राजे, राण्या, दासदासी, प्रधान, सेनापतींनीं सजविलेलीं संस्कृत नाटकें वाचीत असतां दरिद्री परंतु दानशूर चारुदत्त, गणिका असूनही सुशील अशी वसंतसेना, शर्वीलकासारखा कलाकुसरी चोरटा, चुकून तोंडीं लावण्यासारखा एखाद्या राजाचा उल्लेख असलेलें व चेट, वीट, जुगारी यांनीं सजविलेलें एखादें " मृच्छकटिक " वाचावयास मिळालें असतांना ठेंचाळल्यासारखें व्हावें तसाच हा समान दर्जाचीं पात्रें पाहून प्रकार होतो. तरी पण रूढ मार्गांत रुळलेल्यांना हा थोरपालट मानवल्यासारखा दिसतो.

---

REFBK-0003284

क्र. 3218